बुधवार ६ ऑगस्ट २०२५

अकोला

पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १५७
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

# अजिंक्य भारत

बातम्यांचा गतिमान पाठलाग



इंग्लंडमध्ये विजय म्हणजे भारतीय क्रिकेटमधील सर्वोच्च क्षण (पान ७ वर)

## महत्त्वाचे

### शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाचे निर्णय - भरणे



**मुंबई :** शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असून राज्यातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सर्वसमावेशक धोरणे राबविणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. कृषिमंत्री भरणे यांनी आजपासून मंत्रालयातून कामकाजास सुरवात केली, त्यावेळी ते बोलत होते. विधिमंडळाचे कामकाज सुरु असताना रमी खेळत असलेल्या व्हिडीओमुळे अडचणीत सापडलेल्या माणिकराव कोकाटे यांची कृषीमंत्रिपदावरून उचलबांगडी करत दत्तात्रय भरणे यांना राज्याचे नवे कृषिमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. आज दत्तात्रय भरणे यांनी कृषीमंत्री पदाचा पदभार स्वीकारला आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी मला कृषीमंत्री म्हणून काम करण्याची संधी दिली आहे. आज मी कृषीमंत्री पदाचा पदभार स्वीकारला आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी मला माहिती आहेत, त्यामुळे मला हे खातं मिळालं आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय मी घेणार आहे, असंही पुढे भरणेंनी म्हटलं आहे.

### यात्री ॲपवर करा एसटीचे बुकींग!



**मुंबई :** चालकाला सन्मानजनक मोबदला आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देणारे राज्य शासनाचे अधिकृत यात्री ॲप लवकरच एसटी महामंडळामार्फत सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते मंत्रालयातील आपल्या दालनामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या ॲग्रीगेटेड पॉलिसीच्या (समुच्चयक धोरण) आधीन राहून राज्य शासनाचे यात्री ॲप बनवण्याच्या अंतिम मसुद्यावरील चर्चेवेळी बोलत होते. मंत्री सरनाईक म्हणाले, राज्य सरकारने मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, भरमसाठ नफा कमवून प्रवासी व चालकांना वेठीस धरणाऱ्या खाजगी कंपन्यांच्या जोखंडातून मुक्त करण्याच्या प्रमाणित हेतूने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रवासी ॲप बस, रिक्षा , टॅक्सी व ई-बस या वाहन सेवा करीता सुरू करण्याचे निश्चित केले आहे.

## ३४ सेकंदात सगळे उद्धवस्त : ५ जणांचा मृत्यू, १०० हून अधिक अडकले

# उत्तरकाशीत आभाळ फाटले..!



**देहरादून, दि. ५** वृत्तसंस्था

उत्तरकाशीमध्ये झालेल्या ढगफुटीमुळे सर्वत्र हाहाकार उडाला आहे. मंगळवारी (दि. ५ ऑगस्ट) दुपारी १:४५ वाजता उत्तरकाशीतील हर्सिल येथील भारतीय लष्कराच्या कॅम्पपासून सुमारे ४ किमी अंतरावर धारली गावात ढगफुटी झाली. यामुळे भूस्खलन होऊन किमान ५ जणांचा मृत्यू झाला. तर सुमारे १०० लोक बेपत्ता आहेत. ३४ सेकंदात सगळं उद्धवस्त झाले आहे. ढगफुटी आणि भूस्खलनामुळे पवित्र गंगोत्री धामशी संपर्क तुटला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे पाण्यासोबत मातीचा ढिगारा सगळीकडे पसरला आहे. आर्मी आणि एनडीआरएफ पथके बचावकार्यासाठी तत्काळ घटनास्थळी रवाना झाली.

धारली गावात खीर गंगा नदीच्या वरच्या पाणलोट क्षेत्रात ढगफुटीची झाली. यात चार जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी उत्तरकाशीचे जिल्हा दंडाधिकारी प्रशांत आर्य यांनी केली आहे. लष्कर, एनडीआरएफ आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) यांची पथके शोध आणि बचाव कार्यासाठी या भागात तैनात करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. येथील धारली गावात आलेल्या अतिवृष्टीमुळे एक नाला ओसंडून वाहू लागला. ज्यांचे पाणी डोंगरावरून अतिशय वेगाने खाली वाहत आले, या पाण्यासोबत भरपूर कचरा असेच (पान २ वर)

### आर्मी कॅम्पलाही तडाखा; १० जवान बेपत्ता!

■ हर्षिल येथील भारतीय लष्कराच्या छावणीलाही याचा तडाखा बसला आहे. धारली गावातील प्रलयानंतर १० मिनिटांच्या वेळेतच लष्कराचे पथक तेथे पोहोचले आणि तातडीने बचावकार्य सुरु केले. लष्कराच्या पथकाला २० गावकऱ्यांना तरी जीवघेण्या प्रलयातून वाचवण्यास यश आले. पण दुसरीकडे मात्र हर्षिल आर्मी कॅम्प परिसरात ढगफुटी झाल्यानंतर ८ ते १० सैनिक बेपत्या झाल्याचे वृत्त समोर आले आहे. सुमारे १५० सैनिक, विशेष वैद्यकीय उपकरणे, बचाव उपकरणे आणि डॉक्टर बचाव कार्यासाठी तैनात करण्यात आले आहेत. पण यातत हर्षिल येथील लष्करी छावणीत ढगफुटी झाली, परंतु लष्कर या परिस्थितीचा सामना करत आहे.

### बचावकार्य युद्धपातळीवर सुरू

■ केंद्रीय मंत्री अजय टमटा म्हणाले की, ढगफुटीमुळे हे नुकसान झाले आहे. ही मोठी घटना उत्तराखंडच्या धाराली भागात घडली आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले की, मोठ्या प्रमाणात बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. बचावकार्यात एनडीआरएफ-एसडीआरएफ तैनात करण्यात आले आहे.

### अनेक लोक जखमी होण्याची भीती

■ ढगफुटी ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, परंतु नदीकाठावर असे बांधकाम विनाशाला आमंत्रण देत आहे. पाणी येताच खूप आरडाओरडा झाला, पण लोकांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. पुरासोबतच मोठे दगड आणि लाकडेही वाहून गेली आणि त्यांचा फटका बसल्याने अनेक लोक जखमी होण्याची भीती आहे.

### नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केल्या संवेदना



■ उत्तरकाशीतील धराली येथील या दुर्घटनेतील बाधित लोकांबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संवेदना व्यक्त केल्या आहेत. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्याशी बोलून मी तेथील परिस्थितीची माहिती घेतली. राज्य सरकारच्या देखरेखीखाली मदत आणि बचाव पथके सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. लोकांपर्यंत मदत पोहोचवण्यासाठी कोणतीही कसर सोडलेली नाही. असे पीएम मोदी यांनी वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

### हिमालयीन प्रदेश धोक्याच्या विळख्यात

■ धारलीजवळ गंगोत्रीचे हिवाळी निवासस्थान आहे. पर्वतांमधून वाहणाऱ्या नदीला खीर गंगा म्हणतात. ही संपूर्ण आपत्ती धारली गावावर आली आहे. उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री हरीश रावत म्हणतात, की हा संपूर्ण हिमालयीन प्रदेश धोक्याच्या विळख्यात आहे. अशा सततच्या नैसर्गिक आपत्ती संकटाचे कारण आहेत. राष्ट्रीय पातळीवर याबद्दल विचार करण्याची गरज आहे.

# पुणे-नागपूर-पुणे 'वंदे भारत एक्सप्रेस'ला रेल्वे मंत्र्यांची मंजुरी

## अकोला, बडनेरा, वर्धा, अजनी (नागपूर) या ठिकाणी थांबे प्रस्तावित

**पुणे, दि. ५** वृत्तसंस्था



पुणे-नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसला केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडून मंजुरी देण्यात आली आहे. येत्या महिनाभरात ही रेल्वे गाडी सुरू करण्याचे नियोजन मध्य रेल्वेच्या बोर्डाकडून करण्यास सुरुवात झाली आहे. या रेल्वे गाडीमुळे पुणे-नागपूर प्रवास सुमारे दीड ते दोन तासांनी कमी होणार आहे. रेल्वे बोर्डाचे प्रधान सचिव सतीश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी दृकश्राव्य माध्यमातून उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत मध्य आणि पश्चिम रेल्वे प्रकल्पांतर्गत 'वंदे भारत एक्सप्रेस' आणि 'अमृत भारत एक्सप्रेस' तसेच या योजनेतील स्थानकांच्या पुनर्बांधणीचा आढावा घेण्यात आला. यावेळी पुणे- नागपूर-पुणे या मार्गावर वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली. सध्या पुण्यातून सोलापूर, कोल्हापूर आणि हुबळी या तीन मार्गांवर वंदे भारत एक्सप्रेस धावत आहे.

पुणे -नागपूर-पुणे या रेल्वे मार्गावर वंदे भारत एक्सप्रेस सुरू करावी, ही (पान २ वर)

# डोनाल्ड ट्रम्प यांची भारताला पुन्हा धमकी

## टॅरिफमध्ये मोठी वाढ करण्याचा दिला इशारा

**वॉशिंग्टन, दि. ५** वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला पुन्हा एकदा धमकी देत टॅरिफमध्ये आणखी मोठी वाढ करण्याचा इशारा दिला आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करण्याच्या मुद्यांवरून ट्रम्प हे भारतावर टीका करत आहेत. आज पुन्हा याच मुद्यांवरून ट्रम्प यांनी भारतावर घणाघाती टीका केली आहे. तसेच पुढील २४ तासांत भारतावर पुन्हा अतिरिक्त कर लादण्याचा इशारा एका मुलाखतीत बोलताना दिला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांची जगात चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी भारतावर देखील २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली. एवढंच नाही तर भारताकडून दंड वसूल करण्याचाही इशारा ट्रम्प यांनी दिला. भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करत असल्याच्या मुद्यांवरून डोनाल्ड ट्रम्प हे आक्रमक होत आहेत. यावरून ट्रम्प सातत्याने भारतावर आयात शुल्क (टॅरिफ) लादण्याची धमकी देत आहेत. भारत हा एक चांगला व्यापारी भागीदार नाही. भारत आमच्याबरोबर व्यापार करतो. मात्र, अमेरिका भारताबरोबर व्यापार करत नाही. भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, आता मला वाटतं की, पुढील २४ तासांत भारतावर आणखी जास्त टॅरिफ आकारावं. कारण भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे, म्हणजेच युद्ध यंत्रणेला इंधन देत आहे, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ट्रम्प सातत्याने भारताला अतिरिक्त टॅरिफ लागू करण्याची धमकी देत आहेत. काही दिवसांपूर्वीच भारतावर २५ टक्के टॅरिफ आणि अतिरिक्त दंड आकारला जाईल, असं ट्रम्प यांनी जाहीर केलं होतं. सोमवारी संध्याकाळी केलेल्या सोशल पोस्टमध्ये रशियाकडून भारत तेल खरेदी करतो म्हणून आणखी टॅरिफ आकारले जाईल, अशी नवी धमकी ट्रम्प यांनी दिली होती. त्यानंतर भारत सरकारने रशियाचंच उदाहरण देत ट्रम्प यांना प्रत्युत्तर दिलं होतं. (पान २ वर)



## देशासाठी सर्वस्व गमावले | पण सन्मानासाठी आजही संघर्ष सुरूच!

# शहीद वीर जवानांचे कुटुंब लढते करमाफीसाठीचा लढा!

। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. ५ :** शहरातील तारफैल लेबर कॉलनी येथील वीर जवान शेषराव श्रीराम म्हैसने हे मराठा लाईफ इन्फंट्री या रेजिमेंटमध्ये कार्यरत असताना १९६५ साली पाकिस्तानसोबत चाललेल्या युद्धात २९ सप्टेंबर १९६५ रोजी शत्रूंनी पेरून ठेवलेल्या सुरुंगाच्या स्फोटात शहीद झाले. देशाच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या या वीर जवानाचा मृतदेहही आजतागायत सापडलेला नाही. वीर शहिदांच्या कुटुंबीयांना शासनाने भरभरून दिले; मात्र महानगरपालिकेने मालमत्ता कराची सवलत देण्यासाठी हात वर केले आहेत. शौर्य आणि बलिदान देणाऱ्या शहिदांच्या कुटुंबीयांवर हा एक प्रकारचा अन्याय म्हणावा लागेल. शेषराव म्हैसने यांचा जन्म ३ डिसेंबर १९४० रोजी झाला. लहानपणापासूनच धाडसी आणि देशसेवेसाठी तत्पर असलेले शेषराव १९६२ साली भारतीय लष्करात भरती झाले. मराठा लाईफ इन्फंट्रीमध्ये कार्यरत असताना त्यांनी १९६५ च्या युद्धात अपार धैर्य दाखवत सीमाभागात (पान २ वर)



■ शासनाने आम्हाला भरभरून दिले; पण नियमानुसार सवलत असूनही महापालिकेने करमाफी नाकारणे, हे समजण्यापलीकडे आहे. आमची मालमत्ता वीरमातेच्या नावाने असूनही टॅक्स मात्र त्यांच्या पतीच्या नावाने येतो. आम्ही सर्व कागदपत्रे सादर केली आहेत, तरीही अडवणूक केली जात आहे.

- **संजय म्हैसने,** शहीद शेषराव म्हैसने यांचे नातू




तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांचे पत्र



PRIME MINISTER'S HOUSE
NEW DELHI

श्रीमती कलावतीबाई

मैं भारत की जनता की ओर से और अपना, हमदर्दी और सांत्वना का सन्देश भेज रही हूं। आपके शोक और रंज में सारा देश शरीक है। देश की रक्षा में इस बलिदान के लिये आपके करोड़ों भाई बहन कृतज्ञ हैं और हमारी प्रार्थना है कि आपको धीरज और शान्ति मिले।

इन्दिरा गांधी

### वीरमाता कलावतीबाई यांची जबाबदारी

■ शेषराव हे अविवाहित होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या वीरमाता कलावतीबाई श्रीराम म्हैसने यांनी घराची जबाबदारी खांद्यावर घेतली. त्यांचे दोन भाऊ केशव आणि मोहन म्हैसने यांचे कुटुंब आजही एकत्र राहते.

### शासनाची मदत: जमीन व नोकरी

■ शहिदांच्या कुटुंबाला शासनाने १९७० मध्ये बाळापूर तालुक्यातील बारलिंग येथे १५ एकर ८ गुंठे जमीन, तसेच केशव म्हैसने यांना एस.टी. महामंडळात नोकरी दिली होती. त्यांच्या मृत्यूनंतर संजय म्हैसने यांना अनुकंपावर नोकरी देण्यात आली आणि ते आजही कर्तव्य बजावत आहेत.



## पान 1 वरून...

### उत्तरकाशीत आभाळ फाटले...

गाळ देखील वाहून आल्यामुळे लोकवस्तीची प्रचंड हानी झाली आहे. पाण्याचा प्रवाह जोरदार असल्यामुळे अनेक घरं वाहून गेली. उत्तर काशीमध्ये ढगफुटीमुळे मोठे नुकसान झाले आहे. धारली खीर गड येथे पाण्याची पातळी वाढल्याने धारली बाजारपेठ परिसरात हे नुकसान झाले आहे. सैन्य, पोलिस आणि एसडीआरएफची टीम घटवाडी येथे पाठवण्यात आली आहे. धारली गावावर ढगफुटी झाल्याने धारली बाजारपेठेसह संपूर्ण गाव प्रभावित झाले आहे. यामध्ये १०० लोक बेपत्ता असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उत्तराखंडमधील धारली गावात ही विध्वंसक घटना घडली आहे. येथे ढगफुटीमुळे नदीकाठावर अचानक मोठा पूर आला. त्यामुळे नदीकाठावर बांधलेली घरे माचीसच्या काड्यांसारखी वाहून गेली. गंगोत्री धामला जाणाऱ्या मार्गावर धाराली हा एक महत्त्वाचा थांबा आहे. धारली येथील खीर गंगा नदीत ढगफुटी झाल्यामुळे हे विनाशकारी दृश्य पाहायला मिळाले. यामध्ये १०० लोक बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे. नदीकाठावर अचानक आलेल्या पुरामुळे डझनभर हॉटेल्स आणि होमस्टेचे नुकसान झाले आहे. त्यात अनेक कामगार गाडले जाण्याची शक्यता आहे. गंगोत्री धाम आणि मुखवा जवळील धारली गावात मंगळवारी अचानक झालेल्या ढगफुटीमुळे तेथील एक नाला ओसंडून वाहू लागला. या नाल्याचे पाणी डोंगरावरून सखल भागात खूप वेगाने वाहत आले, ज्यामुळे अनेक घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. ही घटना अतिशय गंभीर आहे आणि त्यामुळे स्थानिक लोक चिंतेत आहेत. नाल्याच्या पाण्यासोबत कचरा आणि गाळदेखील आला आहे, ज्यामध्ये अनेक लोक गाडले जाण्याची भीती आहे. प्रभावित क्षेत्र गंगोत्री धाम जवळ आहे. ढगफुटीनंतर नाल्यात पाणी भरून वाहू लागल्याने संपूर्ण परिसरात घबराट पसरली होती, आता परिसरात मदत आणि बचाव कार्यालय सुरुवात झाली आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाने अपघाताची पुष्टी केली आहे आणि परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याचे सांगितले आहे. ज्या भागात भूस्खलन झाले आहे तिथे अनेक लहान अतिथीगृहे, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स आहेत. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी धराली भागातील ढगफुटीच्या घटनेबाबत मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्याशी चर्चा करुन तेथील परिस्थितीचा आढावा घेतला.

पूर पाहून लोक ओरडू लागले पूर गावाकडे येताच लोक ओरडू लागले. अनेक हॉटेलमध्ये पाणी आणि ढिगारा शिरला आहे. धराली बाजारपेठ पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. अनेक हॉटेल आणि दुकाने कोसळली आहेत. गेल्या २ दिवसांपासून येथे मुसळधार पाऊस पडत आहे.

४०२ गावे पुराच्या विळख्यात!

उत्तर प्रदेशात, प्रयागराज, वाराणसीसह १७ जिल्ह्यांमधील ४०२ गावे पुराच्या विळख्यात सापडली आहेत. आतापर्यंत पावसामुळे ३४३ घरे कोसळली आहेत. गेल्या २४ तासांत पूर-पावसाशी संबंधित अपघातांमध्ये १६ जणांचा मृत्यू झाला आहे. जौनपूर, चंदौली, सुलतानपूर, कानपूर, पिलीभीत आणि सोनभद्र येथे ५ ऑगस्टपर्यंत, वाराणसी, हमीरपूर आणि लखीमपूर येथे ६ ऑगस्टपर्यंत, तर प्रयागराज आणि मिर्झापूरमध्ये ७ ऑगस्टपर्यंत शाळांच्या सुट्ट्या वाढविण्यात आल्या आहेत.

उत्तर प्रदेश-बिहारमध्ये पूरसदृश परिस्थिती

मान्सूनच्या पावसामुळे उत्तर प्रदेश-बिहारमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. मुंगेर, बक्सर, पूर्णिया, भोजपूर, पटना यासह बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये शेकडो गावे पाण्याखाली गेली आहेत. बिहारमधील पूर्णियामध्ये ३८ वर्षांनंतर विक्रमी पाऊस पडला. रविवार ते सोमवार या काळात येथे २७०.६ मिमी पाऊस पडला. यापूर्वी १९८७ मध्ये १९४.९ मिमी पाऊस पडला होता.

३१० रस्ते बंद

हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळे ३१० रस्ते बंद आहेत. सोमवारी झालेल्या पावसानंतर शिमला येथे ३ घरांवर भूस्खलन झाले. एक दिवस आधी लोक घराबाहेर पडले होते. काल रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे चंदीगड-मनाली चार लेन मार्गही बंद आहे. उत्तराखंडमधील हल्द्वानी येथे नदीत वाहून ३ जणांचा मृत्यू झाला.

### पुणे-नागपूर-पुणे 'वंदे भारत...

मागणी दोन वर्षांपासून करण्यात येत होती. याबाबत रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही लवकरच या मार्गावर ही गाडी सुरू करण्यात येईल, असे आश्वासन देऊन रेल्वे बोर्डाला सूचना केल्या होत्या. मध्य विभागांतर्गत पश्चिमेकडून उत्तरेकडे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी अधिक आहे. पुण्यातून अकोला, अमरावती, नागपूर या मार्गावर दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. या रेल्वे गाडीमुळे या प्रवाशांचा प्रवासाचा कालावधी सुमारे दीड ते दोन तासांचा कमी होणार आहे. वंदे भारत एक्सप्रेसच्या थांब्यांचे विशेष नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे पुणे ते नागपूर हे सुमारे ९०० किलोमीटरचे अंतर नऊ ते साडेनऊ तासांत पार करता येणार आहे. पुण्यावरून ही गाडी निघाल्यानंतर दौंड, अहिल्यानगर, कोपरगांव, मनमाड, जळगांव, भुसावळ, अकोला, बडनेरा, वर्धा, अजनी (नागपूर) या ठिकाणी थांबे प्रस्तावित करण्यात आले आहे, अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

### डोनाल्ड ट्रम्प यांची भारताला...

ज्या रशियाचं नाव घेऊन डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला धमकावलं आहे, त्याच रशियाकडून अमेरिका व युरोपियन युनियन कच्चा माल आयात करत असल्याचा दाखला भारतानं दिला आहे. यासंदर्भात परराष्ट्र मंत्रालयाकडून सोमवारी संध्याकाळी उशीरा निवेदन जारी करण्यात आलं होतं. परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी आपल्या अधिकृत एक्स हँडलवरून हे निवेदन शेअर केलं होतं. ''युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिका व युरोपियन राष्ट्रे रशियाकडून तेल आयात करतो म्हणून भारतावर सातत्याने टीका करत आहेत. पण युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून तेलाचे उपलब्ध पुरवठा पर्याय हे युरोपकडे वळवण्यात आले. त्यामुळेच भारतानं रशियाकडून तेल आयात करायला सुरुवात केली. त्यावेळी जागतिक स्तरावरील ऊर्जा बाजारपेठेतील समतोल टिकवण्यासाठी अशा प्रकारची आयात करण्यास अमेरिकेने भारताला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिलं होतं, असं भारताने निवेदनात म्हटलं होतं.

### शहीद वीर जवानांचे कुटुंब...

शत्रूशी तोंड देत प्राणार्पण केले.

शहीद शेषराव म्हैसने यांच्या कुटुंबाला शासनाने सन्मानाने मदत केली; पण स्थानिक प्रशासनाकडून मिळणाऱ्या सवलतीसाठी मात्र ते आजही लढा देत आहेत. ''देशासाठी जीव गमावला, आता प्रशासनाकडून सन्मानाची प्रतीक्षा.'' या वशोगाथेला पूर्णत्व मिळेल, जेव्हा स्थानिक प्रशासन या वीर परिवाराच्या हक्काचा सन्मान ओळखेल. हे एका वीर शहिदाच्या कुटुंबाची कहाणी आहे. दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी वीर माता कलावतीबाई म्हैसने यांना पत्र पाठवून शहीद शेषराव म्हैसने यांनी देशासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाबाबत शोक संवेदना व्यक्त करीत कुटुंबीयांचे सांत्वन केले होते. देशासाठी बलिदान देणाऱ्यांना केवळ युद्धभूमीवर नव्हे, तर त्यांच्या घरातही सन्मान मिळायला हवा.

पण... अजून एक लढा सुरूच आहे

शासनाने भरभरून मदत केली असली तरी, आज महानगरपालिकेकडून मालमत्ता कर माफ करण्याची कायदेशीर सवलत या कुटुंबाला नाकारली जात आहे. पात्रता असूनही करमाफी नाकारली

संजय म्हैसने यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्याकडून शहिदांच्या कुटुंबांसाठी लागणारे पात्रता प्रमाणपत्र मिळविले. मालमत्ता आजही वीरमाता कलावतीबाई म्हैसने यांच्या नावाने नोंदणीकृत असून, घराची हिस्सेवाटीही झालेली नाही. पण तरीही अकोला महानगरपालिका वेगवेगळ्या दस्तावेजांची मागणी करीत आहे, त्रुट्या काढत आहे आणि करमाफीसाठी टाळाटाळ करीत आहे.

# महादेवी हत्ती परत करण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात पुनरावलोकन याचिका दाखल करणार- फडणवीस

कोल्हापूर, दि. ५ वृत्तसंस्था



कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी जिनसेन मठाची माधुरी उर्फ महादेवी हत्ती परत करा या मागणीसाठी सुरू असलेल्या लढ्यामध्ये जनतेच्या तीव्र जनभावना लक्षात आल्या आहेत. यामुळे राज्य सरकारच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात पुनरावलोकन याचिका दाखल करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी सांगितले.

नांदणी येथून महादेवी हत्ती नेत असताना जमावाकडून दगडफेक झाली. या प्रकरणी पोलिसांनी धरपकड चालवली आहे. या प्रकरणातील संशयितावर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात यावेत, अशी मागणी आमदार राहुल आवडे यांनी केली. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल असे स्पष्ट केले. नांदणी मठातील महादेवी उर्फ माधुरी हत्ती संदर्भात निर्णय घेण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्या मंगळवारी मुंबई येथे तातडीची बैठक बोलविली होती. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही भूमिका मांडली.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, धनंजय महाडिक, धैर्यशील माने, विशाल पाटील हे खासदार, विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील, विनय कोरे, अमल महाडिक, विश्वजित कदम, राजेंद्र पाटील-यड्रावकर, अशोक माने, राहुल आवाडे हे आमदार ,माजी खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री प्रकाश आवाडे, अपर मुख्य सचिव (वने), प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव), जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा पोलिस अधिक्षक योगेशकुमार गुप्ता, भालचंद्र पाटील, सागर शंभुशेटे, आप्पासो भगाटे, सागर पाटील, ॲड. मनोज पाटील उपस्थित होते.

बैठकीत पेटा ही संस्था आर्थिक अमिष दाखवून वनतारा येथे पाळीव हत्ती देण्याची सुपारी घेतली आहे, असा आरोप करून बोलताना राजू शेट्टी म्हणाले कि, महाराष्ट्र सरकारने ज्या हत्ती वनतारा येथे पाठविण्यात आले आहेत. त्यांची सध्या काय परिस्थती आहे ,याबाबत कोणतीही तपासणी राज्य सरकारने केलेली नाही. विटा येथील श्री नाथ मठाचा हत्ती २०२३ साली वनतारा येथे घेऊन गेले आहेत. पेटा व वनतारा यांच्याकडून माधुरी हत्ती घेऊन जाण्यासाठी षडयंत्र रचून न्यायव्यवस्था व प्रशासनाला वेठीस धरून वनतारा येथे पाठविण्यात आले आहेत. माधुरी हत्तीचे ११ वेळा वैद्यकीय तपासणी केली हे सर्व ११ अहवाल नकारात्मक आहेत. त्याबरोबरच कर्नाटक व महाराष्ट्रातील अनेक मठांना हत्ती घेऊन जाण्याबाबत नोटीसा देण्यात येत आहेत. यामुळे चांगल्या पध्दतीने देखभाल करूनही समाजाच्या भावना दुखावल्या जात आहेत.

आज तो हत्ती तिथे आहे कि नाही याबाबत संशय निर्माण झालेला आहे.

या घटनेची दखल घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही राज्यातील जवळपास ४ ते ५ पाळीव हत्ती मयत झाले असल्याचे सांगितले. सदरची गंभीर गोष्टीबाबत राज्य सरकारने सखोल चौकशी करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वनविभागास दिले.

# सोलापूर जिल्ह्यात लम्पीची साथ; ३७ जनावरे मृत्युमुखी, ४३९ बाधित



सोलापूर, दि. ५ वृत्तसंस्था

सोलापूर जिल्ह्यात गोवंशीय जनावरे अर्थात गुरांमध्ये लम्पी हा साथीचा आजार फैलावत आहे. त्याने आतापर्यंत ३३ जनावरे दगावली आहेत. तर ४३९ जनावरांना लम्पी आजाराचा विळखा पडला आहे. त्याबाबतची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. लम्पी आजाराची साथ प्रामुख्याने त्वचेशी संबंधित असते. सर्वाधिक फैलाव माळशिरस तालुक्यात असून, तेथे एकूण ६८५ जनावरांना या आजाराची लागण झाली होती. त्यांपैकी सध्या ५४२ जनावरे आजारमुक्त झाली आहेत. मात्र, ११ जनावरे दगावली असून, १३२ जनावरे अजूनही आजारी आहेत. करमाळा तालुक्यातील १७७ जनावरे आजाराने संशयित होती. त्यांपैकी १२५ जनावरे आजारमुक्त झाली. १० जनावरे मृत्युमुखी पडली असून, अद्यापि ४२ जनावरे आजाराने ग्रस्त आहेत. मंगळवेढा तालुक्यातील आजारी १४७ जनावरांपैकी ७ दगावली आहेत. ८७ जनावरांनी आजारावर मात केली आहे, तर ५३ जनावरे अद्यापि आजाराने ग्रस्त आहेत. माढा तालुक्यात ३२ जनावरांना या आजाराचा संशय होता. त्यांपैकी ९ जनावरे आजारमुक्त झाली आहेत. तर अद्यापि २३ जनावरे या आजाराने सक्रिय आहेत.पंढरपूर तालुक्यातील ३८५ जनावरे संशयित आजारी म्हणून मोजण्यात आली होती. त्यांपैकी ३१२ जनावरे आजारातून बरी झाली आहेत. तीन जनावरांचा मृत्यू झाला आहे. तर ७० जनावरे अद्यापि लम्पी आजाराने ग्रस्त आहेत.

# सर्व शाळांमध्ये १४ ऑगस्टला म्हटले जाणार पसायदान

## मुख्यमंत्र्यांच्या महत्त्वपूर्ण सूचना

मुंबई, दि. ५ वृत्तसंस्था

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंतीनिमित्त राज्यात सर्व शाळांमध्ये पसायदानाचे सामूहिक पठण करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यानुसार, शालेय शिक्षण विभागाने १४ ऑगस्ट रोजी हा उपक्रम राबवण्याचे निर्देश दिले आहेत. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी पुणे येथील शिक्षण आयुक्तालयाला याबाबत पत्र पाठवले आहे. पसायदान करणे अनुदानित, विना अनुदानित, खासगी, महापालिका, जिल्हा परिषद तसेच संस्थात्मक शाळांसाठी हे पठण बंधनकारक आहे. गोकुळाष्टमीच्या दिवशी, १५ ऑगस्ट रोजी, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या जयंतीनिमित्त, झेंडावंदन, प्रभातफेरी यांसारखे पारंपरिक कार्यक्रम होणार असल्याने, पसायदान पठणाचा कार्यक्रम १४ रोजी घेण्याचे आदेश आहेत. अनेक शाळांनी याची तयारी सुरू केली असून, काही शाळांत पाठ मिळताच पसायदान पठण सुरू होईल.

सर्व समाजस्तरातून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २९ जुलै रोजी या उपक्रमाची घोषणा केली होती. त्यानुसार, शिक्षण विभागाने ३१ जुलै रोजी सर्व शाळांना पसायदान पठण करण्याचे सर्व शाळांना पूर्वसूचना द्यावी

केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व शाळांना पूर्वसूचना द्यावी आणि शिक्षकांना योग्य प्रशिक्षण दिले जावे. शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण करण्यासाठी अभिनव प्रयोगांना प्रोत्साहन देण्याच्याही त्यांनी सूचना काही दिवसांपूर्वीच दिल्या आहेत.

आदेश दिले. अलीकडेच हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून राजकीय वादंग उठले होते. सरकारला तो निर्णय मागे घ्यावा लागला. या पार्श्वभूमीवर पसायदान पठण उपक्रमाला मात्र समाजातील सर्व स्तरांतून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या विविध योजना, उपक्रम आणि कार्यक्रम मिशन मोडवर राबवण्याचे निर्देश शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिले आहेत. मंत्रालयातील बैठकीत मंत्री भुसे यांनी विभागाचा आढावा घेतला. जिथे शिक्षणाच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि नवीन शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी वेळेत करण्यावर भर देण्यात आला. यावेळी शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# नगरमध्ये पाणी योजना ठेकेदारांसह अधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्याची मागणी

अहिल्यानगर, दि. ५ वृत्तसंस्था

सुमारे ४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करूनही अमृत पाणी योजना व फेज-२ पाणीपुरवठा योजना १५ वर्षांपासून अपूर्णच राहिल्याने ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव म्हणजे केवळ धूळफेक व जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे ठेकेदार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पालिकेचे अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर दीप चव्हाण यांनी केली



आहे. योजनेत भ्रष्टाचार, अंमलबजावणीत ढिसाळपणा, निधीचा दुरुपयोग व जबाबदारीपासून पळणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भूमिका स्पष्ट झाल्या. त्यामुळे केवळ सर्व संबंधितांवर जबाबदारीही निश्चित झाली पाहिजे. टक्केवारी खाणाऱ्यांनाही अडकवले जावे, अशी मागणी चव्हाण यांनी केली आहे. योजना अपूर्ण असतानाही ९० टक्के निधी प्रशासकीय कार्यकाळात अदा करण्यात आला, रहिवाशांना नवीन नळजोड देण्यासाठी ५ हजार रुपये नागरिकांकडून परस्पर घेण्यात आले. हे पैसेही पालिकेत जमा न करता ठेकेदाराला देण्यात आले. तरीही आयुक्तांनी एकाधिकारशाही वापरून पाणीपट्टीला विरोध असतानाही ९०० रुपयांचा भुर्दंड नागरिकांवर लादला. त्यामुळे पाणीपट्टीतील वाढही बेकायदेशीर ठरते.

### पुण्यात उच्च न्यायालय खंडपीठाची गरज- सुप्रिया सुळे

**पुणे :** शासनाने नुकतीच कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाला मंजुरी दिल्याने पश्चिम महाराष्ट्रातील कायदेशीर प्रक्रियांना गती मिळणार आहे. या निर्णयाचे स्वागत करताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आता पुणे येथेही उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची स्थापना करण्याची मागणी केली आहे. पुण्याच्या वाढत्या लोकसंख्या, प्रलंबित खटल्यांची संख्या आणि शहराचे शैक्षणिक, प्रशासकीय व औद्योगिक महत्त्व लक्षात घेता ही मागणी अत्यंत गरजेची असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. महाराष्ट्र शासनाने कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाला मंजुरी दिल्याने तेथील नागरिकांना स्थानिक पातळीवर कायदेशीर सेवा मिळण्यास मदत होईल. सुप्रिया सुळे यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्या म्हणाल्या, ''कोल्हापूर खंडपीठाच्या मंजुरीमुळे स्थानिकांना मुंबईला जाण्याचा त्रास कमी होईल आणि खटल्यांचा निपटारा जलद होईल.

# पोषण आहार आधी मुख्याध्यापक अन् शिक्षक खाणार, मगच विद्यार्थ्यांना देणार

पुणे , दि. ५ वृत्तसंस्था

## विषबाधा टाळण्यासाठी नवा नियम

राज्यातील शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारे परिणाम रोखण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने नवे नियम लागू केले आहेत. यापुढे विद्यार्थ्यांना अन्न देण्याआधी मुख्याध्यापक, शिक्षक यांनी त्या आहाराची चव घेणे आणि दर्जा तपासणे अनिवार्य करण्यात आले आहे. याबाबतची मानक कार्यपद्धती (एसओपी) जाहीर करण्यात आली आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या जेवणाची गुणवत्तेसाठी आता अधिक दक्षता घेतली जाणार आहे.

भोजन तयार झाल्यानंतर अर्धा तास आधी शिक्षक, मुख्याध्यापक, स्वयंपाकी यांनी चव घेणे अनिवार्य, चव आणि दर्जाविषयी अभिप्राय नोंदवहीत नोंदवणे बंधनकारक, जेवणाचे नमुने हवाबंद डब्यात २४ तास



### उल्लंघन केल्यास कठोर कारवाई

कोणत्याही प्रकारची विषबाधा झाल्यास आणि प्रयोगशाळा तपासणीत दोष आढळल्यास संबंधित पुरवठादारावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाणार आहे. शिक्षण अधिकारी दरमहा पुरवठादार गोदामांची पाहणी करणार असून, तालुका पातळीवर दर महिन्याला किमान दोन शाळांतील भोजन नमुने तपासले जाणार आहेत.

ठेवणे आवश्यक, अन्नधान्य आणि साहित्य एक वर्ष मुदतीचे असणे आवश्यक आणि स्वच्छ हात आणि साबण-पाण्याची उपलब्धता बंधनकारक करण्यात आले.शाळा व्यवस्थापन समितीने धान्याचा दर्जा तपासूनच स्वीकृती द्यावी, तसेच जेवणानंतर कोणत्याही विद्यार्थ्याला त्रास झाल्यास आरोग्य केंद्राशी तत्काळ संपर्क साधावा, असेही आदेश देण्यात आले आहेत.

जलसाठा | बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे असलेल्या पाच धरणांमध्ये सुमारे ९६.२४ टक्के पाणीसाठा

# राज्यातील धरणे जुलैअखेर तुडूंब

मुंबई, दि. ५ वृत्तसंस्था

यंदाच्या पावसाळ्यात राज्यात सर्वदूर चांगली पर्जन्यवृष्टी झाली आहे. परिणामी राज्यभरातील धरणे तुडूंब भरली आहेत. लहान, मध्यम आणि मोठ्या धरण प्रकल्पांमध्ये सरासरी ७२.३८ टक्के इतका उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. कोकण विभाग आघाडीवर असून पाणीसाठा तब्बल ८४.८३ टक्क्यांवर गेला आहे. जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात लहान, मध्यम व मोठे, अशी एकूण २९९७ धरणे आहेत. सोमवारअखेर या सर्व धरणांमध्ये सुमारे ७२.३८ टक्के म्हणजे १०३६.१५१ टीएमसी इतका उपयुक्त पाणीसाठा निर्माण झाला आहे. कोकण विभागात एकूण १७३ धरणे असून, त्यांमध्ये सुमारे ११२.४०३ टीएमसी, ८४.८३ टक्के इतका उपयुक्त पाणीसाठा आहे. नाशिक विभागात ५३७ इतकी धरणे असून, त्यामध्ये १४१.६७१ टीएमसी, ६७.५८ टक्के इतका उपयुक्त पाणीसाठा आहे.

पुणे विभागात एकूण ७२० धरणे असून, ४४३.७५२ टीएमसी, ८२.६२ टक्के पाणीसाठा आहे. मराठवाडा विभागामध्ये ९२० धरणे असून, त्यामध्ये १५१.२०९ टीएमसी, ५८.९७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. अमरावती विभागामध्ये २६४ धरणे असून, त्यामध्ये ८३.३६४ टीएमसी, ६२.४२ टक्के पाणीसाठा आहे. नागपूर विभागात ३८३



धरणे असून, या धरणांमध्ये १०५.१६४ टीएमसी, ६४.१३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. राज्यातील प्रमुख मोठी तीन धरणेही तुडूंब भरली आहेत. उजनी धरण ९८.८८ टक्के भरले असून, ११५.९३ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. कोयना धरण ८३ टक्के भरले असून, ८७.३८ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. जायकवाडी धरण ९३.६४ टक्के भरले असून, ९६.२० टीएमसी पाणीसाठा झाला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे असलेल्या पाच धरणांमध्ये सुमारे ९६.२४ टक्के पाणीसाठा झाला असून, १७.१० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. ठाणे महानगरपालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या बारवी धरणात सुमारे ११.२५ टीएमसी पाणीसाठा आहे. नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे आणि हेटवणे धरणात ९.९१८ टीएमसी पाणीसाठा आहे.

यंदाच्या पावसाळ्यात आजपर्यंत सर्वात जास्त पाऊस मुळशी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झाला असून, मुळशीत ४९१४ मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे. घाटघर धरणाच्या पाणलोटात ३५६९ मिमी, महाबळेश्वरमध्ये ३५६२ मिमी आणि लोणावळा येथे ३१९० मिमी पावसाची नोंद झाली आहे, अशी माहिती जलसंपदा विभागाचे निवृत्त अभियंता हरिश्चंद्र चकोर यांनी दिली आहे.

### महिलेसह वृद्ध वडिलांना रॉडने मारहाण

**मुंबई:** मुंबई महानगरपालिकेच्या कबुतरखान्यांवरील कारवाईने शहरात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. दादरच्या कबुतरखान्याला ताडपत्रीने झाकून बंद केल्याने आणि कबुतरांना खाद्य देण्यास बंदी घातल्याने जैन आणि गुजराती समाजात नाराजी पसरली आहे.याच वादाच्या पार्श्वभूमीवर मीरा-भाईंदरमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. कबुतरांना दाणे टाकण्यास मनाई केल्याने संतप्त झालेल्या व्यक्तीने एका ६९ वर्षीय वृद्ध आणि त्यांच्या मुलीवर लोखंडी रॉडने हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणाने कबुतरखाना वादाने नवे वळण घेतले आहे. मीरा रोड येथील डी.बी. ओझोन इमारतीजवळ रविवारी (२ ऑगस्ट) सकाळी घडलेल्या या घटनेत ६९ वर्षीय महेंद्र पटेल आणि त्यांची मुलगी प्रेमल पटेल (४६) यांना मारहाण झाली.

## महत्त्वाचे

### हजसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत वाढविली



**नवी दिल्ली:** हज-२०२६ साठी ऑनलाइन अर्ज भरण्याची अंतिम तारीख आता ७ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे. दिल्ली राज्य हज समितीच्या अध्यक्षा कौसर जहाँ म्हणाल्या की, हज अर्जदारांकडून सातत्याने येणाऱ्या विनंत्या आणि राज्य हज समित्यांच्या विनंतीच्या आधारे अंतिम मुदत वाढवणे स्वागतार्ह आहे. आता काही कारणास्तव आतापर्यंत अर्ज करू न शकलेले सर्व इच्छुक अर्जदार या संधीचा फायदा घेऊन लवकरच त्यांचे फॉर्म भरू शकतील. यासाठी, दिल्ली राज्य हज समिती, हज मंझिलच्या कार्यालयात हज फॉर्म भरण्याची सुविधा पूर्वीप्रमाणेच सुरू राहील.आतापर्यंत, दिल्ली राज्य हज समितीमध्ये एकूण ३,८९२ हज अर्ज सादर करण्यात आले आहेत.

### नायजेरियामध्ये सशस्त्र गटाकडून ६० जणांचे अपहरण

अबुजा (नायजेरिया) : नायजेरियाच्या वायव्येकडील भागात मोटर सायकलवरून आलेल्या सशस्त्र हल्लेखोरांनी तब्बल ६० लोकांचे अपहरण केले आहे. यामध्ये महिला आणि मुलांचेही अपहरण करण्यात आले आहे, असे साक्षीदारांनी सांगितले. झामफारा राज्यातील न्यू टाउन डमरी या भागामध्ये यापुर्वी देखील मोठ्या प्रमाणावर सामान्य नागरिकांचे अपहरण करण्यात आले आहे.शनिवारी गावामध्ये मोटर सायकलवरून काही लोक हवेत गोळीबार करत घुसले होते. त्यांनी गावातील महिलांना आणि लहान मुलांना बळजबरीने आपल्याबरोबर नेले. तेंव्हापासून या सर्वांबद्दल कोणतीही माहिती मिळाली नाही, असे स्थानिक रहिवाशांनी सांगितले. स्थानिक पातळीवर डाकू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गटांनी अलिकडच्या काळात राज्यभरात शेकडो लोकांना ठार मारले आहे आणि हजारो लोकांना बळजबरीने ताब्यात घेतले आहे. ते अनेकदा महिनोनमहिने लोकांना आपल्या ताब्यात ठेवतात आणि त्यांच्या सुटकेसाठी खंडणीची मागणी करतात.

### पुराला महाराष्ट्र जबाबदार- एम. बी. पाटील



**बेंगळूर** : कोयना, राजापूर आणि महाराष्ट्रातील इतर धरणांमधून एकाचवेळी मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यामुळेच कृष्णा नदीच्या खोऱ्यातील सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण होत आहे. राज्यातील अलमट्टी आणि हिप्परगी धरणांच्या उंचीचा यात काहीही संबंध नाही. महाराष्ट्रानेच नियुक्त केलेल्या तज्ञ समितीच्या अहवालातून हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे, अशी माहिती विजापूर जिल्हा पालकमंत्री तथा अवजड उद्योग मंत्री एम. बी. पाटील यांनी दिली.

याबाबत रविवारी त्यांनी पत्रक प्रसिद्ध केले आहे. अलमट्टी धरणाची उंची ५१९.६० मीटरवरून ५२४.२५६ मीटर करण्याची परवानगी कृष्णा ट्रिब्युनलनेच आम्हाला दिली आहे. आतापर्यंत यावर प्रश्नचिन्ह उपस्थित न करणाऱ्या महाराष्ट्र सरकारने आता धरणाची उंची वाढवण्यावर आक्षेप घेतला आहे. दुर्भावनापूर्ण हेतूने केंद्र सरकारला पत्र लिहिले आहे.

## ट्रम्पच्या धमकीला सरकारचे जोरदार प्रत्युत्तर | भारताची भूमिका स्पष्ट

# भारतावर टीका करणारे स्वत: रशियासोबत व्यवसाय करीत आहेत

**नवी दिल्ली, दि.५ वृत्तसंस्था**

भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिका आणि युरोपियन युनियनने भारतावर केलेल्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. रशियाकडून तेल खरेदी करण्याबाबत ही टीका केली जात होती, परंतु भारताने ती अन्याय्य आणि निराधार असल्याचे म्हटले आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी अधिकृत निवेदन जारी करून, भारताला लक्ष्य करणे केवळ चुकीचेच नाही तर या देशांच्या स्वतःच्या शब्द आणि कृतीतील फरक देखील उघड करते'' असे म्हणत पलटवार केला आहे.




### अमेरिकेचे पितळ उघड

परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने सांगितले की, ''युरोप आणि रशियामधील व्यापार केवळ ऊर्जेपुरता मर्यादित नाही, तर त्यात खते, खनिज उत्पादने, रसायने, लोह-पोलाद, यंत्रसामग्री आणि वाहतूक उपकरणे यांचा समावेश आहे. त्याच वेळी, अमेरिकेबाबत, भारताने म्हटले की ते रशियाकडून अणुऊर्जेसाठी युरेनियम हेक्साफ्लोराइड, त्याच्या ईव्ही उद्योगासाठी पॅलेडियम, खते तसेच रसायने देखील आयात करते.

**❑ भारताची भूमिका स्पष्ट**

परराष्ट्र मंत्रालयाने भर दिला की, भारताला लक्ष्य करणे बेकायदेशीर आणि अवास्तव आहे. भारत, एक प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून, नेहमीच आपल्या राष्ट्रीय हिताचे आणि आर्थिक सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी आवश्यक पावले उचलेल.

### संसदीय पक्षाच्या बैठकीत मोदींचा सन्मान

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील सर्व घटकपक्षांची बैठक आज मंगळवारी (दि. ५ ऑगस्ट) संसद भवनमध्ये सुरु आहे. या बैठकीत ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेव यशस्वीपणे राबविल्याबद्दल एनडीए खासदारांनी एकमताने ठराव मंजूर केला. यावेळी ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल एनडीए खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सन्मानित केले. तसेच पहलगाम दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांप्रति संवेदनाही व्यक्त करण्यात आल्या. यावेळी नवीन खासदारांची पंतप्रधानांशी ओळखही करून देण्यात आली.

पीएम मोदी एनडीए बैठकीत पोहोचल्यानंतर खासदारांनी हर हर महादेव आणि भारत माता की जयच्या घोषणा दिल्या.

## उद्धव ठाकरे दिल्लीत पोहोचण्याआधीच खा.प्रियंका चतुर्वेदी मोदींच्या भेटीला; राजकीय वर्तुळात खळबळ

**नवी दिल्ली, दि.५ वृत्तसंस्था**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेली भेट राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. मात्र, ही भेट पूर्णपणे सहज होती आणि तिचा कोणताही राजकीय अर्थ काढू नये, असे स्पष्टीकरण चतुर्वेदी यांनी दिले आहे.

इंडिया आघाडीच्या महत्त्वाच्या बैठकीपूर्वी आणि उद्धव ठाकरे यांच्या दिल्ली दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीमुळे अनेक तर्कवितर्क लढवले जात होते, ज्यावर आता स्वतः चतुर्वेदी यांनी पडदा टाकला आहे. सोमवारी (दि.४) पंतप्रधान मोदींना भेटण्यापूर्वी आपण खासदार संजय राऊत यांची भेट घेतल्याचेही त्यांनी सांगितले. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी विविध राजकीय विषयांवर आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

**❑ महाराष्ट्राच्या राजकारणाची दिल्लीत खलबतं**

देशाच्या राजधानीतील राजकीय वातावरण चांगलेच तापलेले दिसत आहे. एकाच वेळी दोन कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी, उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दिल्लीत दाखल होत असल्याने राजधानीतील घडामोडींना वेग आला आहे. एकीकडे उद्धव ठाकरे इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी बुधवारी (दि.५) दिल्लीत पोहोचत असतानाच, दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज (दि.५) रात्रीच दिल्लीत दाखल होत आहेत. या राजकीय योगायोगामुळे चर्चांना उधाण आले असून, त्यातच ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी पंतप्रधान मोदींची घेतलेली सहज भेट या घडामोडींना नवी किनार देत आहे.



❑ पंतप्रधान मोदींसोबत झालेली भेट ही राजकीय नव्हती, असे उबाठा पक्षाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी ठामपणे सांगितले आहे. ''पंतप्रधान यांच्यासोबत माझी चांगली चर्चा झाली. मात्र, यामध्ये महाराष्ट्राच्या अनुषंगाने किंवा इतर कोणताही राजकीय संवाद झाला नाही. त्यामुळे या भेटीचा राजकीय अर्थ लावण्यात काहीही तथ्य नाही,'' असेही त्या म्हणाल्या. उद्धव ठाकरे इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी दिल्लीत येत असतानाच ही भेट झाल्याने तिला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.दिल्लीत होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीसंदर्भातही त्यांनी माहिती दिली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आघाडीतील नेत्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन केले आहे.

### इमारतीचे छत कोसळले ; ढिगाऱ्याखाली ५ जण गाडले

**हैदराबाद : दि. ५ वृत्तसंस्था**

हैदराबादच्या मेडचल पोलिस स्टेशन परिसरात काल रात्री एक धक्कादायक घटना घडली. मेडचलच्या मुख्य बाजारपेठेत असलेल्या एका जुन्या तीन मजली इमारतीचे छत अचानक कोसळले. या भीषण अपघातात पाच जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. या घटनेमुळे परिसरात तणाव आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.पोलिस, अग्निशमन दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) पथके बचाव कार्यात गुंतली आहेत. स्थानिकांच्या मते, ही घटना रात्री ८:३० च्या सुमारास बाजारात सामान्य कामकाज सुरू असताना घडली. इमारतीत एक किराणा दुकान आणि काही निवासी फ्लॅट होते. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, छत कोसळण्यापूर्वी मोठा आवाज ऐकू आला, त्यानंतर धुळीचे लोट उठले आणि लोक ओरडू लागले. स्थानिक रहिवासी रमेश यादव म्हणाले, ''काय झाले ते आम्हाला समजले नाही.

## ब्राझीलचे माजी राष्ट्रपती 'हाऊस अरेस्ट'

### सत्तापालटाचा कट रचल्याच्या आरोपाखाली कारवाई

**बोल्सोनारो, दि. ५ वृत्तसंस्था**



ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाने काल देशाचे माजी राष्ट्राध्यक्ष जैर बोल्सोनारो यांना नजरकैदेत पाठवण्याचे आदेश दिले. २०२२ च्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर सत्तेत राहण्यासाठी त्यांनी बंडाचा कट रचल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. दरम्यान , संपूर्ण दक्षिण अमेरिकेत या प्रकरणाची चर्चा सुरू आहे, विशेषतः जेव्हा अमेरिका आणि ब्राझीलमधील व्यापार युद्धही तीव्र होत आहे.

या प्रकरणाचे निरीक्षण करणारे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अलेक्झांडर डी मोरेस यांनी त्यांच्या आदेशात,''७० वर्षीय बोल्सोनारो यांनी न्यायालयाने आधीच लागू केलेल्या सुरक्षा सूचनांचे उल्लंघन केले आहे. त्यांनी त्यांच्या तीन खासदार मुलांच्या अकाउंटद्वारे सोशल मीडियावर सामग्री पोस्ट केली, जी नियमांविरुद्ध होती'' असे म्हटले. रविवारी, बोल्सोनारो यांनी त्यांचा मुलगा आणि सिनेटर फ्लेव्हियो बोल्सोनारो यांच्या मोबाईल फोनवरून रिओ डी जानेरोमध्ये त्यांच्या समर्थकांना संबोधित केले.

आता हा खटला अधिक चर्चेत आला आहे कारण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ब्राझीलमधून आयात केलेल्या वस्तूंवर ५०% कर लावण्याचे कारण बोल्सोनारोविरुद्ध सुरू असलेल्या न्यायालयीन प्रक्रियेचा थेट उल्लेख केला आहे. ट्रम्प हे बोल्सोनारो यांचे जवळचे मानले जातात. त्यांनी या खटल्याला ''विच हंट'' म्हटले आहे, ज्यामुळे ब्राझीलच्या राजकारणात राष्ट्रवादी प्रतिक्रिया आणखी तीव्र झाल्या आहेत.

ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांच्यासह सर्व प्रमुख नेते यावर उघडपणे बोलत आहेत. बोल्सोनारो यांच्याविरुद्ध सुरू असलेल्या खटल्यात असा आरोप आहे की त्यांनी निवडणूक निकाल उलथवण्याची योजना आखणाऱ्या गुन्हेगारी संघटनेचे नेतृत्व केले. असेही म्हटले जात आहे की अध्यक्ष लुला आणि न्यायमूर्ती डी मोरेस यांच्या हत्येचा कट रचण्यात आला होता.सोमवारी घर नजरकैदेत ठेवण्याच्या आदेशाची बातमी समोर आल्यानंतर, ब्राझीलच्या फेडरल पोलिसांच्या एका कर्मचाऱ्याने सांगितले की एजंट ब्राझिलियातील बोल्सोनारो यांच्या घरी मोबाईल फोन जप्त करण्यासाठी पोहोचले आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई केली जात आहे. बोल्सोनारो आता ब्राझिलियामध्ये नजरकैदेत राहतील आणि त्यांना प्रवास करण्याची परवानगी नाही. त्यांचे रिओ डी जानेरोमध्ये एक घर देखील आहे, जिथे ते तीन दशके संसद सदस्य होते.

## जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे निधन

**दिल्ली : दि.५ वृत्तसंस्था**



जम्मू आणि काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे आज (दि. ५) वयाच्या ७९ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. दुपारी १ वाजता नवी दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

मलिक यांनी ऑगस्ट २०१८ ते ऑक्टोबर २०१९ पर्यंत जम्मू आणि काश्मीर राज्याचे शेवटचे राज्यपाल म्हणून काम पाहिले. त्यांच्याच कार्यकाळात ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० रद्द करण्यात आले आणि राज्याचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला. आज या निर्णयाला सहा वर्ष झाली आहेत. नंतर त्यांना गोव्याचे राज्यपाल म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यानंतर ऑक्टोबर २०२२ पर्यंत मेघालयाचे राज्यपाल म्हणून त्यांनी काम पाहिले.

## शिक्षक भरतीत आता बिहारी फर्स्ट; मुख्यमंत्री नितीशकुमार यांची घोषणा

**पाटणा : दि.५ वृत्तसंस्था**



आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील शिक्षक भरती प्रक्रियेत अधिवास (डोमिसाईल) धोरण लागू करण्याची घोषणा बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी सोमवारी केली.

''शिक्षक भरती प्रक्रियेत बिहारच्या स्थानिक रहिवाशांना प्राधान्य देण्यासाठी संबंधित नियमांमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे निर्देश शिक्षण विभागाला देण्यात आले आहेत.'टीआरई-४' (शिक्षक भरती परीक्षा) पासून हा नियम लागू करण्यात येईल,'' असे नितीशकुमार यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये सांगितले आहे.

यानुसार शिक्षक भरतीत आधी बिहारी नागरिकांना प्राधान्य मिळणार असून नंतर अन्य नागरिकांना संधी मिळणार आहे. नितीशकुमार म्हणाले, की नोव्हेंबर २००५ मध्ये सत्तेवर आल्यानंतर आम्ही शिक्षण क्षेत्रात सुधारणांसाठी सतत प्रयत्न करीत आहोत.शिक्षण व्यवस्था बळकट करण्यासाठी मोठ्या संख्येने शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यंदा होणाऱ्या शिक्षक भरती परीक्षा-४ पासून हा आदेश अमलात येईल. त्यानंतरची भरती परीक्षा पुढील वर्षी म्हणजे २०२६ मध्ये होणार आहे.




## धावत्या बसमध्ये तरुणीचा मृत्यू; शरीरावर लपविले होते २६ आयफोन

**ब्राझील , दि. ५ वृत्तसंस्था**

ब्राझीलमध्ये एका २० वर्षीय मुलीचा धावत्या बसमध्ये धक्कादायकरित्या मृत्यू झाला आहे. सार्वजनिक बसमधून प्रवास करणारी मुलगी अचानक बेशुद्ध पडली आणि खाली पडली. त्यानंतर काही वेळातच तिचा मृत्यू झाला. पण त्यानंतर जे घडले ते आणखी गूढ होते. मृत्यूनंतर मुलीच्या मृतदेहाची तपासणी केली असता तिच्या शरीरावर सुमारे दोन डझन आयफोन अडकलेले आढळले. मुलीने टेपच्या मदतीने हे मोबाईल फोन तिच्या शरीरावर चिकटवले होते, जे पाहून अधिकारी आश्चर्यच व्यक्त करत आहेत. स्थानिक वृत्तांनुसार, ही घटना २९ जुलै रोजी घडली. ब्राझीलच्या गुआरापुआवा शहरातील एका रेस्टॉरंटजवळ बस थांबली असता तरुणीचा मृत्यू झाला. बसमध्ये तिची प्रकृती अचानक बिघडली, त्यानंतर आपत्कालीन मदत मागवण्यात आली.

मृत्यूनंतर मृतदेहाची तपासणी केली असता डॉक्टरांना तरुणीच्या शरीरावर अनेक पॅकेट अडकलेले दिसले. जेव्हा हे पॅकेट उघडले तेव्हा त्यात एक-दोन नव्हे तर २६ आयफोन आढळले. शरीराच्या वेगवेगळ्या भागांवर फोन चिटकवण्यात आले होते. तरुणीजवळील सामानात दारूच्या अनेक बाटल्याही सापडल्या. तरुणीची ओळख अद्याप उघड झालेली नाही. अधिकाऱ्यांना संशय आहे की तरुणी मोबाईल फोनची तस्करी करत होती.

मुलीने टेपच्या मदतीने हे मोबाईल फोन तिच्या शरीरावर चिकटवले होते, जे पाहून अधिकारी आश्चर्यच व्यक्त करत आहेत. स्थानिक वृत्तांनुसार, ही घटना २९ जुलै रोजी घडली. ब्राझीलच्या गुआरापुआवा शहरातील एका रेस्टॉरंटजवळ बस थांबली असता तरुणीचा मृत्यू झाला.

## आगळे-वेगळे

### ओरिजिनच्या -३४ मोहिमेतून अंतराळातून पृथ्वीचे दृश्य पाहिले

# आग्र्यात जन्मलेल्या उद्योजकाची अंतराळात ऐतिहासिक झेप

**आग्रा : दि. ५ वृत्तसंस्था**



❑ अंतराळातून पृथ्वी पाहणे हे माझे स्वप्न पूर्ण झाले. हा एक अविस्मरणीय आणि दृष्टीकोन बदलणारा अनुभव होता.'' त्यांच्या या प्रवासाने अंतराळ पर्यटनाची वाढती लोकप्रियता आणि मानवी कुतूहलाची अतृप्त भावना दिसून येते. बहाल यांचा हा प्रवास भविष्यातील अंतराळ साहसांना प्रेरणा देईल, यात शंका नाही.

आग्रा येथे जन्मलेले आणि आता अमेरिकन नागरिक असलेले रिअल इस्टेट उद्योजक अरविंदर ''अर्वी'' सिंग बहाल यांनी रविवारी एक ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. जेफ बेझोस यांच्या ब्ल्यू ओरिजिन कंपनीच्या -३४ या अंतराळ पर्यटन मोहिमेत सहभागी होत त्यांनी पृथ्वीपासून १०० किलोमीटर उंचीवरून अंतराळातून पृथ्वीचे विहंगम दृश्य अनुभवले. या मोहिमेने खासगी अंतराळ प्रवासाच्या क्षेत्रात एक नवे पर्व सुरू झाल्याचे अधोरेखित केले आहे.

वेस्ट टेक्सासमधील ब्ल्यू ओरिजिनच्या लाँच साइट वन येथून भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ६ वाजता ही मोहीम सुरू झाली. न्यू शेपर्ड या अंतराळयानाने करमन रेषा ओलांडली, जी १०० किलोमीटर उंचीवर अंतराळाची सीमा मानली जाते. या थरारक प्रवासाचे थेट प्रक्षेपण ब्ल्यू ओरिजिनच्या वेबकास्टवरून जगभरातील प्रेक्षकांनी पाहिले. बहाल यांच्यासह इतर साहसी प्रवाशांनी या क्षणाची उत्सुकता आणि उत्साह अनुभवला.

जगातील प्रत्येक देशाला भेट देण्याचे स्वप्न बाळगणारे बहाल एक कुशल वैमानिक देखील आहेत. त्यांच्याकडे खासगी विमानचालक परवाना आणि हेलिकॉप्टर प्रशिक्षण आहे. त्यांच्यासाठी ही अंतराळ मोहीम म्हणजे आयुष्यभराच्या साहसी प्रवासाची पराकाष्ठा होती. अंतराळयान पृथ्वीपासून वर गेल्यावर काही मिनिटांसाठी प्रवाशांना वजनरहित अवस्थेचा अनुभव घेता आला. यावेळी त्यांनी पृथ्वीच्या वक्रतेचे आणि तिच्या निळ्या वातावरणाचे अप्रतिम दृश्य कॅमेऱ्यात टिपले. प्रवासी एकमेकांशी हसत-खेळत हा अनुभव साजरा करत होते.

उतरल्यानंतर बहाल यांनी आनंद व्यक्त करताना सांगितले, ''अंतराळातून पृथ्वी पाहणे हे माझे स्वप्न पूर्ण झाले. हा एक अविस्मरणीय आणि दृष्टीकोन बदलणारा अनुभव होता.'' त्यांच्या या प्रवासाने अंतराळ पर्यटनाची वाढती लोकप्रियता आणि मानवी कुतूहलाची अतृप्त भावना दिसून येते.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्षणगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

## संपादकीय...

# मोदींचा पुन्हा स्वदेशीचा नारा

जागतिक आर्थिक अनिश्चितता असल्याने जनतेने स्वदेशी भावना स्वीकारावी आणि स्थानिक पातळीवर तयार झालेल्या उत्पादनांना पाठिंबा द्यावा, असे पुन्हा आवाहन करण्याची वेळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताची अर्थव्यवस्था मृतवत असल्याचा उल्लेख केला होता. खरे तर, भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करीत आहे. अशावेळी भारतीय अर्थव्यवस्थेबाबत अनुद्गार काढणे, संतापजनकच आहे. देशाची खरी सेवा स्वदेशी वस्तूंना प्रोत्साहन देण्यात आहे. नागरिकांनी पुढील सण-उत्सवांत स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन मोदी यांनी दोन वर्षांपूर्वी केले होते. राजधानी दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय हातमाग दिनाच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे आवाहन केले होते. स्वदेशीचा उद्देश केवळ विदेशी कपड्यांच्या बहिष्कारापुरता मर्यादित नव्हता, तर आर्थिक स्वातंत्र्याला मिळालेले ते एकप्रकारचे बळ होते. मुख्यत्वे भारतीयांनी विणकरांसोबत जोडण्याची ती एक मोहीम होती, याकडे त्यांनी लक्ष वेधले होते. मागील १० वर्षांत देशांतर्गत खादीच्या उत्पादनात तिपटीपेक्षा अधिक वाढ झाली, त्याच्या विक्रीत पाचपट वाढ झाली. 'आमच्याकडे गणपतीची मूर्तीही विदेशातून येते, होळीचे रंग आणि पिचकारीही चीनसारख्या देशातून येते, याकडे लक्ष वेधत, पंतप्रधानांनी विदेशी वस्तू वापरू नका. देशातील वस्तूच खरेदी करा,' असे आवाहन याआधीही केले असून, त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. स्वदेशी उपक्रमाचाच एक भाग म्हणजे 'मेक इन इंडिया' योजना. २०१४ मध्ये देशात मोबाईलची निर्मिती करणारे केवळ दोन कारखाने होते. आज ही संख्या २०० हून अधिक झाली. भारताची मोबाईल निर्यात १ हजार ५५६ कोटींवरून १ लाख २० हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. जागतिकस्तरावर भारत दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मोबाईल उत्पादक बनला. आता देश पूर्णतः प्रक्रिया केलेल्या पोलादाचा निर्यातदार बनला आहे. २०१४ पासून पोलादाच्या उत्पादनात ५० टक्क्यांहून अधिक वाढ झाली. सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्राने दीड लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित केली असून, रोज ७ कोटींचे उत्पादन घेण्याची क्षमता असलेल्या पाच प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. नवीकरणीय ऊर्जेच्या बाबतीत देश जागतिक पातळीवर चौथ्या क्रमांकाचा सर्वात मोठा उत्पादक ठरला आहे. इलेक्ट्रिक वाहन उद्योग क्षेत्र, जे २०१४ मध्ये अस्तित्वातच नव्हते, ते आता तीन अब्ज डॉलर इतक्या उलाढालीचे झाले. संरक्षण उत्पादनात भारताने आत्मनिर्भरता प्राप्त केली असून, निर्यात १ हजार कोटी रुपयांवरून वाढून २१ हजार कोटी रुपयांवर पोहोचली. पूर्वी भारतात खेळण्यांची आयात होत असे. आता खेळण्यांची निर्यात २३९ टक्क्यांनी वाढली आणि आयातही निम्मी झाली. इलेक्ट्रॉनिक्सपासून ते अंतराळ क्षेत्रापर्यंतचे यश स्वदेशीची प्रेरणा किती जागी आहे, याचेच निदर्शक. आज ट्रम्प यांच्या धोरणामुळे संपूर्ण जग अस्वस्थ असून, भारतीय शेअर बाजारही कोसळला आहे. अमेरिकी प्रशासनाने २५ टक्के आयात कर लागू केलाच आहे आणि त्यासोबतच भारत-रशिया व्यापारी संबंधांबद्दल नाराजी व्यक्त करीत, भारतावर दंड लागू करण्याची घोषणा केली. भारतात २५ टक्के आयात कर असून, पाकिस्तानवर मात्र केवळ १९ टक्के, तर बांगला देशवर २० टक्के आयात कर लागू केला आहे. याचा अर्थ दक्षिण आशियात भारताचे स्थान जे उंचावलेले आहे, ते खाली जावे असाच अमेरिकेचा हेतू असावा. ट्रम्प यांच्या निर्णयाने त्याबद्दल बरीचशी स्पष्टता आली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या स्वदेशी नाऱ्यामागे ही पार्श्वभूमी महत्त्वाची आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. कॅनडाने पॅलेस्टाईनला राजकीय मान्यता दिल्यामुळे, इस्रायलप्रमाणेच अमेरिकाही संतापली असून, कॅनडावर ३५ टक्के कर लावला आहे. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे अमेरिकेला पसंत नाही; पण भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे थांबवल्यास, ते अन्य देशांकडून खरेदी करावे लागेल आणि त्यासाठी ९ ते ११ अब्ज डॉलर इतकी ज्यादा रक्कम मोजावी लागू शकेल. रशिया-युक्रेन युद्धानंतर पाश्चात्त्य देशांनी रशियावर निर्बंध लावले. युद्धापूर्वी भारत रशियाकडून एक टक्काही तेल खरेदी करीत नव्हता. आज भारताच्या तेल खरेदीचे हे प्रमाण ३५ ते ४० टक्क्यांपर्यंत वाढले. याचे कारण भारताला रशियाकडून कमी दराने तेल मिळते. मुळात भारतात ८५ टक्के कच्चे तेल आयात केले जाते. अशावेळी जेथून स्वस्त मिळते, तेथून खरेदी का करू नये? अशा कच्च्या तेलाचे शुद्धीकरण करून, रशियाने निर्बंध घातलेल्या देशांनाच पेट्रोलियम पदार्थांची निर्यात करून भारतीय कंपन्यांनी तुफान नफा कमावला; पण आता युरोपीय महासंघाने रशियन तेलापासून तयार झालेल्या उत्पादनांच्या आयातीवर बंदी घातली आहे. तसेच, अमेरिकेनेही भारतावर ज्यादा कर आणि दंड आकारण्याचा इशारा दिला आहे. वास्तविक, ही शुद्ध दादागिरी असून, भारत सरकार ती सहन करेल, असे दिसत नाही. अमेरिकेने कोणत्याही अटी घालाव्यात आणि भारताने त्या मान्य कराव्यात, अशी वस्तुस्थिती नाही; पण देशांतर्गत उत्पादन क्षेत्रास चालना देण्यासाठी केंद्राने राज्यांनाही अधिक प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच, जीएसटी कर प्रणालीचीही फेररचना व्हायला हवी. देशांतर्गत खासगी गुंतवणूक अलीकडील काळात मंदावली. थेट अर्थव्यवस्थेशी संबंधित प्राधान्याचे अनेक विषय आहेत. नव्या आर्थिक बदलात विकासाची गती वाढविण्याचे मोठे आव्हान आहे. त्याचा धांडोळाही घ्यावा लागेल. १९०३ मध्ये ब्रिटिशांनी बंगालच्या फाळणीचा निर्णय जाहीर केल्यानंतर भारतीयांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. त्याला प्रतिसाद म्हणून ७ ऑगस्ट १९०५ रोजी कोलकाता येथील टाऊन हॉलमधून स्वदेशी चळवळीचा आरंभ झाला. देशांतर्गत उत्पादनावर अवलंबून राहून, विदेशी वस्तूंच्या वापरास आळा घालणे, हा त्यामागील उद्देश होता. महात्मा गांधी यांनी त्याचे वर्णन 'स्वराज्याचा आत्मा', म्हणजेच 'स्वराज्य' असे केले होते. आज १२० वर्षांनंतर पुन्हा तीच हाक देण्याची वेळ आली आहे. खरेतर ही वेळ मुळात भारतीय नागरिकांनीच येवू द्यावयास नको होती परंतु पाश्चात्यांचे अनुकरण करण्याची भारतीयांची सवय जेव्हा जाईल तेव्हाच हे शक्य होईल.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### कबूतर खाना



राज्याच्या राजधानीत
वाद कबूतर खान्याचा
कसे राहतील सुरक्षित
निर्णय त्या झाकण्याचा

मुंबईतील दादरचा हाच
त्यांचा हक्काचा निवारा
घास भरविण्यास त्याच
मज्जावच झाला सारा

कबूतर कमी झाल्याने
काय फरक पडणार?
कबूतरबाजी वाढल्याने
फक्त राजकारण होणार

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

भोळा दाखवितो
चेहरा खुबीने ।
तो मूर्ख खुबीने
बनवितो ॥

तू नजरेतून ।
जर उतरला
तर जगण्याला
त्रासशील ॥

म्हणुनी सांगतो
सांभाळून राहा ।
सुयोग्य तू राहा
विश्वासाने ॥

लोकं फसतात
एक दोन वेळा ।
असे कळवळा
तो पर्यंत ॥

तुझ्यावर कोण ?
विश्वास ठेवेल ।
अयोग्य ठरेल
तू तेथेही ॥

खोटे मुखवटे
काढूनिया फेक ।
विचार तू नेक
मनी ठेव ॥



## आंतरराष्ट्रीय

भालचंद्र ठोंबरे
९८३४३५०८९५

# 'रीक'च्या पुनरुज्जीवनातील अडचणी, फायदे, तोटे

रिक ट्रोईका ! रिक म्हणजे रशिया, इंडिया, चायना, ट्रोईका म्हणजे तीन देशांची संघटना . म्हणून रशिया इंडिया व चायना या तीन देशांच्या संघटनेचे हे संक्षिप्त नांव आहे.१९९० च्या दशकात या संघटनेची स्थापना झाली. स्थापनेची मूळ कल्पना रशियाची होती. रशियाचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री येव्हगेनी प्रिमाकोव्ह यांनी अशा प्रकारच्या संघटनेचा विचार व्यक्त केला. अशा प्रकारच्या संघटनेमुळे या तीन जागतिक शक्तिशाली देशामध्ये राजकीय आर्थिक व सामाजिक सहकार्य वाढून बहु ध्रुवीय जागतिक सत्ता निर्मिती करण्यास मदत होईल, हा उद्देश होता. यासंदर्भात या देशांच्या बऱ्याच बैठकाही झाल्या. मात्र जून २०२० मध्ये भारत व चीन यांच्या दरम्यान उद्भवलेल्या सीमा वादा नंतर या संदर्भात बैठका झाल्या नाहीत. आणि पंधरा वर्षापासून बैठका नसल्याने संघटन जणू निष्क्रिय झाली आहे.

मात्र आताही रशियानेच पुढाकार घेऊन रीकच्या पुनरूज्जीवनाचा मनोदय जाहीर केला आहे. पुनरुज्जीवना मागील पार्श्वभुमी : डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेच्या राष्ट्रपती पदासाठी दुसऱ्या वेळेस निवडून आले. त्यावेळेसच त्यांनी यापुढील राजकारणात ''अमेरिका प्रथम,'' हे धोरण राबविल्या जाईल असे जाहीर केले. कोणत्याही राष्ट्र प्रमुखाने स्वतःच्या राष्ट्राच्या विकासाला व उन्नतीला प्राधान्य देणे यात गैर काहीच नाही. परंतु आपल्या ध्येयप्राप्तीसाठी त्यांनी अन्य देशांना धमकावण्याचे धोरण सुरू केले. जी राष्ट्रे आपले म्हणणे ऐकणार नाहीत त्यांच्या बाबतीत आपण अतिरिक्त आयात शुल्क आकारू अशी त्यांनी कल्पना देऊन तसेच याबाबत काही राष्ट्रांना लेखी सूचना देऊन एक प्रकारे टैरिफ युद्धाला सुरुवात केली आहे.

युक्रेन रशिया युद्धाला सुरुवात झाल्यानंतर अमेरिकेने रशियावर आर्थिक बंधने लादली होती. तसेच रशियाकडून तेल व गॅसच्या संदर्भात कोणीही व्यवहार करू नये अशी बंधने अन्य देशावरही घातली. असे असतानाही तेव्हा भारताने रशियाकडून तेल व गॅस स्वस्त दरात मिळत असल्याने व्यापार सुरू ठेवला. डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या निवडणुकीचा प्रचार करताना आपण पुन्हा राष्ट्रपती झाल्यास युक्रेन रशियामधील युद्ध पंधरा दिवसात थांबावू अशी वल्गनाही केली होती. मात्र त्याप्रमाणे घडले नाही. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन, भारत व ब्राझील यांच्यावर युक्रेन रशिया युद्ध थांबविण्यासाठी रशियावर दबाव आणावा अन्यथा त्यांच्यावर शंभर टक्के अतिरिक्त शुल्क आकारल्या जाईल अशी ही धमकी दिली. ब्राझील रशिया भारत हे ब्रिक्स संघटनेचे प्रमुख देश आहेत हे ब्रिक्स देश आपसातील आर्थिक व्यवहारासाठी एक वेगळे चलन ठरवण्याच्या विचारात आहेत.

याचीही कूणकूण लागल्याने यामुळे आपल्या डॉलरचा प्रभाव कमी होण्याची शक्यता आहे हे लक्षात घेऊन ट्रम्प यांनी ब्रिक्स संघटनेने वेगळे चलन निर्माण केल्यास संबंधित देशांची आर्थिक व्यवस्था डबघाईला आणू अशी धमकी दिली. तसेच नाटो चे प्रमुख असलेले मार्क रुट्टे यांनीही भारताने रशियाशी व्यापार करु नये, तसेच रशियाचे युक्रेनशी असलेले युद्ध थांबवण्यासाठी रशियावर दबाव आणावा असे म्हटले आहे. आणि तसे न केल्यास त्यांचेवर अतिरिक्त आयात शुल्क आकारला जाईल अशी धमकी दिली आहे. नाटो हे ३५ राष्ट्राचे संघटन असल्याने ही धमकी ३५ राष्ट्रांतर्फेच आहे असे मानल्यास वावगे ठरू नये. या पार्श्वभूमीवर मार्क रुटे यांच्या धमकीवर प्रतिक्रिया देताना भारताने आपल्या देशासाठी व देशातील नागरिकांसाठी जे हिताचे ठरेल तसा व्यापार केल्या जाईल असे स्पष्ट केले. वास्तविक पाहता भारत रशियाकडून तीन महिन्यात जेवढे तेल खरेदी करतो तेवढे तेल युरोपीय देश एका दिवसात खरेदी करतात.अशी चर्चा आहे. मात्र अमेरिका व मार्क रुटे भारताला टारगेट करीत आहेत. हे सर्व भारताने रशियाशी व्यापार करू नये यासाठी वापरण्यात येत असलेले दबाव तंत्र आहे हे स्पष्ट होते. पश्चिमेकडील राष्ट्रांच्या दृष्टिकोनातून जागतिक राजकारणात एकटा परंतु सैनिक दृष्ट्या समर्थ असलेला रशिया, आर्थिक व्यवहारातून आपला दबाव निर्माण करणारा चीन, आणि वेगाने वाढणारी आर्थिक अर्थव्यवस्था असणारा भारत यांचा एकत्रित संघ पून्हा सक्रीय झाल्यास अमेरिकेसाठी प्रबळ प्रतिस्पर्धी निर्माण होईल .या संभाव्य भीतीमुळेच भारताला धमकावून या संभाव्य संघटनेपासून दूर ठेवण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे.



१) रशिया भारत व चीन राष्ट्रीय एकत्र आल्यास बहुपक्षीय संवादाचे व्यासपीठ तयार होऊन द्विपक्षीय हिताऐवजी त्रिपक्षीय हित जोपासता येईल अशी शक्यता आहे.

२) तीन राष्ट्रांच्या एकत्रित गुंतवणूक व व्यापारीक धोरणामुळे आर्थिक सहकार्य वाढेल. विशेषतः ऊर्जा तंत्रज्ञान इन्फ्रास्ट्रक्चर आदी क्षेत्रात संयुक्त प्रकल्पांना उत्तेजन मिळण्याची शक्यता आहे.

३) या राष्ट्रांच्या माध्यमातून बहुधृवीय जागतिक व्यवस्था निर्माण होऊ शकते. तसेच संयुक्त राष्ट्र संघा च्या सुधारणेसाठी सहकारी ठरू शकते.

४) रिकच्या पुनरुज्जीवनाने ब्रिक्स व शांघाय सहकार्य संघटना अधिक प्रभावी होण्यास मदत होऊ शकते. मात्र या सोबत भारतासाठी काही प्रकारचे तोटे सुद्धा होण्याची शक्यता आहे.

१) भारत, रशिया चीन यांच्या एकत्रित संघटनेमुळे रशिया व चीन मधे सहकार्य वाढून भारत चीन सीमा प्रश्नासाठी ते घातक ठरू शकते.

२) वैचारिक धोरणात्मक विरोधाभास- भारताचे पश्चिम राष्ट्रातील असलेले संबंध धोक्याची येण्याची शक्यता आहे. रीक मध्ये भारत रशिया चीन एकमेकांशी सहकार्यासाठी बद्ध असतील तर अमेरिके सोबत भारत क्वाडमधे असून इंडो पॅसिफिक महासागरात चीनच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणे हा क्वाडचा उद्देश आहे. एकाच वेळी चीनला सहकार्य करणे व त्याच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणे या वैचारिक विरोधामुळे कोणत्यातरी एका संघटनेत भारताचे सहकार्य मर्यादित होऊ शकते.

३) त्रिपक्षीय संघटनेत रशिया चीनच्या वाढत्या लष्करी व आर्थिक सामर्थ्या मुळे निर्णय प्रक्रियेत त्यांचा प्रभाव राहून भारतासाठी ते धोक्याचे ठरू शकते. मात्र हे संघटन पूनरज्जीवित होवून सक्रिय होण्यास खालील प्रमुख अडचणी आहेत या अडचणीवर तोडगा निघाल्यासच हे संघटन होण्याची शक्यता आहे.

अडचणी : १) हे संघटन निर्माण होण्यास प्रमुख अडचण म्हणजे चीनचा विश्वासघातकी स्वभाव व त्याचे विरोधी धोरण. भारत एक वेळेस रशियावर विश्वास ठेवू शकतो, कारण रशिया भारताचा जुना मित्र आहे. मात्र चीन संदर्भात भारताला नेहमीच विश्वासघतकी पणाचा अनुभव आलेला आहे. १९६२ युद्धाचा अनुभव,बळकावलेला अक्साई, सतत अरुणाचल प्रदेशाबद्दल निर्माण करीत असलेला सीमावाद, भारता शेजारील नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तान आदी राष्ट्रांना भारत विरोधात चिथावणी देऊन सतत भारत विरोधात सहकार्य करणे, भारत वगळून शेजारील राष्ट्राची सार्क संघटना निर्मितीचा प्रयत्न, भारत पाक संघर्षामध्ये पाकिस्तानला शस्त्रासह मदत करणे, अशा कितीतरी विश्वासघातकी घटनांचा अनुभव भारतासमोर आहे. यामुळे चीन कितपत बदलला व चीनवर कितपत विश्वास ठेवावा यावरच भारताचे रिक मध्ये सामील होणे अवलंबून असेल. शेवटी राजकारणात काहीही घडवू शकते.

२) जागतिक राजकारणाच्या संदर्भात भारत आजपर्यंत कोणत्याही गटात सामील न राहता भारताचे धोरण तठस्थतेचे राहिले आहे. परंतु या त्रिपक्षीय संघटनेत सामील झाल्यास भारताचा हा तटस्थपणा अडचणीत येऊ शकतो.

३) भारत इजराइल संबंधावर याचा परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. एकंदरीत रीक चे पुनरुज्जीवन अमेरिकेच्या जागतीक प्रभावाला एक समर्थ पर्याय ठरून एक जागतिक समांतर सत्तासंरचना उभी राहू शकते. परंतु त्यासाठी चीन भारत व रशिया यांच्यात परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे.



## कृषी जगत

अशोक वानखेडे
यवतमाळ

# कृषीप्रधान देशात शेतीवरील निष्ठा का हरवली?

विश्व जगतात देव साक्षात आहे का? या प्रश्नावर प्रत्येक संस्कृतीतून एक अदृश्य देवरूपी शक्ती ज्ञात असल्याची जाणीव करून दिल्या जाते. पण त्याच देवाने निर्माण केलेल्या साक्षात देवरूपी शेतकरी जेव्हा ईश्वराला प्रश्न करण्याचा प्रयत्न करतो. देवा या जगात तुम्ही सर्व सजीवाला जन्म देऊन पाठवता. पण त्याच्या अन्नधान्याची सोय मात्र शेती संस्कृती जपवताना मीच करतो. अशा वेळेस मात्र माझ्या मनात सुद्धा या बाबीवर लाजुर्वाने विचार निर्माण होतो. याच देवाने पाठवलेले राजकारणी पुतळे सत्तेसाठी आपसात मांडतात आणि आम्ही शेतकऱ्यांनी निर्माण केलेल्या अन्नधान्यावर जगतात. मात्र सारा जनसमुदाय या राजकारणी सत्तेला झोपून सलाम करतो मात्र मी साक्षात एवढं जग जगत असताना सुद्धा कोणी आम्हा शेतकऱ्यांना त्याच्या उन्नतीसाठी एखादा राज्यवापी निस्वार्थी नवस करीत नाही.



मात्र सत्ता प्राप्तीचा काळ जवळ आला की, हे पांढरे पुतळे दिशाभूल करणाऱ्या आश्वासनाचा नैवेद्य आम्हा शेतकऱ्यांसमोर ठेवतात. मंदिरातील ईश्वरासमोर नवसाचा ठेवलेला नैवेद्य खाताना साक्षात देव कोणा शास्त्रात दिसला नाही. शेतात नवरात्र काम करणारा साक्षात असलेल्या आम्ही शेतकरी ईश्वराला ठेवलेला नैवेद्य हे राजकारणी विरोधक खाऊ देत नाही. सत्तेसाठी या देवाच्या तोंडातून घास ओढून घेतात ही कृषी प्रधान देशातली शोकांतिका आहे.

शेतकऱ्यांनी मात्र आता या साऱ्या खेळायला बाजूला ठेवून स्वावलंबी स्वाभिमानी जीवन जगण्यासाठी आपली शेती निष्ठेने''सर्वात आधी शेतीचा''अवलंब करण्याची गरज आहे. शेती करताना शेतीतून रोज कमी जास्त प्रमाणात पैसा कसा घरी येईल या ध्येयवादी विचार समोर ठेवून शेती करण्याचा प्रयत्न आपल्या सर्व शेतकऱ्यांनीच करावा. शेती व्यवसायात सर्व व्यवसायांपैकी सर्वात जास्त ९०% सर्व दिशेने संकटे निर्माण होत असतात. कारण हा व्यवसाय करताना तो आपल्या श्रमनिष्ठा व अनुभव यापेक्षा दुसरे काहीच शेतकऱ्याच्या हातात नसते. ह्या बाबीची जाण ठेवून प्रत्येक शेतकऱ्याने कृषी तंत्रज्ञानाच्या आधारे कृषी विभागाच्या योजनेचे नियोजनबद्ध पद्धतीने उपयोग घेऊनच शेतीतून''सर्वात आधी शेती, दररोज अर्थप्राप्ती''हा मंत्र कृतीत आणण्यासाठी सर्वच शेतकऱ्यांनी आपले विचार बदलण्याची गरज आहे. आपल्या अनुभवाच्या आणि श्रमाच्या निष्ठेशिवाय कोणावरही अवलंबून न राहता शेतीच्या संस्कृतीची जोपासना करण्याचा स्वाभिमान समोर ठेवावा. कोणाच्या आशादायी धोरणाच्या अपेक्षा वर विसंबून न राहता ध्येयवादी शेती निष्ठेची स्वप्नपूर्ती करावी तेव्हाच संतवाणी लिहिलेले सर्व काही साक्षात शेतकरी रुपी ईश्वर या जगाला दिसेल.

सध्यातरी या पांढऱ्या पुतळ्याने सत्तेसाठी सोन्याचे सिंहासन शोधताना आपल्या जवळचा साक्षात शेतकरी हिरा हरवून बसला आहे. (क्रमशः)



## समीक्षण

प्रा. डॉ. अंकिता वाघ
९४०३६५०७२२

# विचार मंथन : विचारांच्या भावविश्वात नेणारे पुस्तक

सुरेश मंत्री हे मागील काही वर्षापासून वर्तमानपत्रांमार्फत वाचकांपर्यंत आपले साहित्य पोहचविणारे स्तंभलेखक. त्यांचा विचारमंथन हा नुकताच प्रकाशित झालेला लेखसंग्रह. पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत बोलके असून मलपृष्ठावर लेखकाचा अल्पपरिचयआहे. या पुस्तकास प्रा.डॉ. श्रीमती शैलजा बरुरे यांची प्रस्तावना लाभलेली असून यात एकूण ३४ निवडक लेखांचा संग्रहकरण्यात आला आहे. या पुस्तकाची अनुक्रमणिका चाळल्यानंतर वाचकांच्या सर्वप्रथम लक्षात येते की, विविध विषयावरीललेखांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

अजूनही भारतात लोक काय म्हणतील ? या आजाराने लोक त्रस्त असतात विशेषतः युवक, युवती आणि स्त्रियायाची शिकार बनलेले असतात. लोक काय म्हणतील ? या लेखामध्ये लेखकाने लोकांच्या इच्छा आकांक्षांचे ओझे मनावर नबाळगता विविध दाखले देत त्यातही अंबाजोगाई सारख्या शहरातील स्थानिक लोकांची विशेषत: धीमंत राष्ट्रपाल यांच्यालोकजागर या संस्थेची ओळख आणि उदाहरण देऊन लोक काय म्हणतील ? या आजारावरचे उत्तर सांगितले आहे. आजचेयुग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत आपण सर्वजण तंत्रस्नेही झालोआहोत. जगण्यासाठी आपल्याला संगणक, मोबाईल, इंटरनेट यासारखी साधने आणि फेसबुक, व्हाट्सअप, ट्विटर यासारखीसमाज माध्यम अत्यावश्यक ठरत आहेत. ही साधने वापरता वापरता आपण या साधनांच्या अधीन झालो आहोत आणित्यातून नव्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. लेखकाने या सगळ्या प्रश्नांचा वेध घेण्यासाठी या पुस्तकामध्ये जीवघेणीसेल्फी, मोबाईलचे युग, इंटरनेटच्या बाहेर सुद्धा जीवन आहे या लेखांचा समावेश केलेला आहे. आज माणसाचा भोवतालविविध भौतिक साधने व सुख-सुविधा यांनी ग्रासलेला आहे. माणसाकडे सर्व साधने उपलब्ध असताना त्याला जगण्यासाठीचाआत्मविश्वास अथवा अश्वस्त करणारा अवकाश मात्र मिळत नाही. तो सातत्याने साधनांमध्येच गुंतून पडलेला आहे.आत्मविश्वास सारख्या छोट्या लेखामध्ये आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली आहे, असे सांगत असतानाच आजच्या युगामध्येतंत्रज्ञानापासून दूर राहात नकारात्मक भावना व अपप्रवृत्ती पासून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी विविध उपायांची चर्चा यालेखामध्ये केली गेली आहे. प्लास्टिक पासून रस्ते निर्मिती या लेखामध्ये लेखकाने प्लास्टिकच्या उपयोगाबदूल लिहून एकीकडेप्लास्टिक पासून निर्माण होणा-या कच-याचे निर्मूलन व त्याचबरोबर सर्वसामान्यांची पक्के रस्ते ही गरजही भागवण्याचा मार्गसुचविला आहे. लेखक विज्ञान शिक्षक आसल्यामुळे प्रत्येक प्रश्नाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन हा वैज्ञानिक दृष्टिकोन आहे.




विचार मंथन विचारांच्या भावविश्वात नेणारे पुस्तक मानवी जीवन ह अमूल्य अआहे. त्याची जपणूक करणे है प्रत्येकाचे आणि त्याच्या आणि अवतीभवती असणार्या सर्वाचीजबाबदारी आहे. ही जाणीव करून देणारे लेख या पुस्तकामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. भारतीय युवकांमध्येआत्महत्येचे वाढते प्रमाण, सावधान शाळकरी मुलांमध्ये तंबाखूचे व्यसन वाढतेय, सैनिकावरच्या मानसिक परिणामांचा विचारकरायला हवा अशा विविध लेखांमधून लेखक एकाच आयुष्यात केवळ स्तंभ लेखांमधून किती वेगवेगळ्या मानवी घटकांच्याजीवनाचे संवर्धन व समृद्धीसाठी विचार करतो, याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. विज्ञान शिक्षकाने केवळ वैज्ञानिकदृष्टिकोन रुजविला तरी सुद्धा तो कर्तव्यदक्ष ठरू शकतो मात्र अतिशय महत्त्वाची कामगिरी करणारा पण अतिशय दुर्लक्षितअसा सैनिकही लेखकाच्या विचारांचा केंद्रबिंदू आहे. सांख्यिकी माहितीच्या आधारे लेखकाने आपले म्हणणे मांडण्यासाठीविविध मुक्वांचा उहापोह केला आहे. कामाचे अनियमितता, वरिष्ठांकडून मिळणारी तुच्छ वागणूक, संसाधनांची कमतरता,बदली आणि बढती मध्ये होणारा भ्रष्टाचार, असंवेदनशील नेतृत्व, दीर्घधकाळ न मिळणाच्या रजा, तसेच दैनंदिन जीवनात होणारीआबाळ, धोकादायक ठिकाणी तासंतास चालणारी ड्युटी आणि सर्वच बाबतीतली अनिश्चितता. यामुळे सैनिकांच्या शारीरिक वमानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. याकडे लेखकाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. विचारमंथनच्या लेखकाने हरवतचाललेलं बालपण, नकोशी, फक्त नाव नाही दृष्टिकोन बदलायला हवा, बालमजुरी थांबणार कधी ?, केवळ शाळेमुळे मुलंघडतात ?, स्वप्न विकणाच्या शाळा, आयुष्यावर बोलू काही अशा विविध लेखांमधून लहान मुलांचे भाव विशव बालकांच्याविविध मनो व भावनिक अवस्था, बालकांचे प्रश्न यावरती प्रकाश टाकला आहे. मानवी विकासाने लहान मुलांचे बालपण आणिमोठ्यांची निरागसता संपवून टाकलेली आहे. ज्या वयात मुलांना आजोबा, काका, मामा यांच्या खांद्यावर बसून रखेळायला हवंअशा वयातच दप्तराचं न पेलणारे ओझं त्यांच्या खांद्यावर पालक लादत आहेत. याशिवाय विविध प्रकारच्या शिकवण्या, स्पर्धाआणि ताण-तणाव यामुळे बालपण करपून गेले आहे. लेखकाने नैतिक मूल्यांच्या हासाला लहानपणीच व्यक्तिगत स्वाथाचंबीज लहान मुलांमध्ये पेरलं जात आणि तो वृक्ष फोफावत जातो असा अप्रत्यक्ष दावाच केला आहे. विचार मंथन च्या निमित्याने

लेखकाने अनेक स्त्री प्रश्नांचा आढावा घेतला आहे. नकोशी सारख्या लेखामधून भारतात व विशेषत: महाराष्ट्रातीलमराठवाड्यामध्ये स्त्री जन्माची होत असलेली अवहेलना वर्णन केली आहे. अनेक मुलीं जन्मानंतर नकोशी असतात म्हणून त्यानकोशी नावानेच संबोधल्या जातात. परंतु भारतात जन्माला आलेल्या प्रत्येक जीवाची काळजी घेणे हे भारतीय संविधानानेसोपवलेली जबाबदारी एक शिक्षक म्हणून पार पाडताना श्री. सुरेश मंत्री यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. केवळआपल्या लेखनाची गरज म्हणून हा माणूस स्तंभ लेखन अथवा पत्रकारिता करत नाही तर आपल्या अवतीभवती त्याला जेदुरुस्त करता येणे शक्य आहे तो त्या सगळ्या व्यवस्था दुरुस्तीचे काम करतो आहे. सुरेश मंत्री यांच्या विचार विश्वामध्ये शैक्षणिक, सामाजिक, राजकिय, आर्थिक, विज्ञान व तंत्रज्ञान अशा मानवी जीवनातीलअत्यावश्यक विविध क्षेत्र व त्यात निर्माण झालेले प्रश्न-समस्या, त्यावरील उत्तरांची चर्चा यांना स्थान आहे. ही केवळ समकालीनप्रश्नांची चर्चा असली तरी सुद्धा मानवाच्या भविष्यासाठी, भावी पिढ्यांसाठी, शाश्वत विकासासाठी कोणती पावले उचललीजाणे आवश्यक आहे आणि संपूर्ण मानवी समूहासाठी उत्तरे शोधणारी ही लेखमाला आहे. त्यामुळे हे पुस्तक केवळ तत्कालीनसमस्यांचा आढावा घेणारे लेखन ठरत नाही. याची उपयुक्तता सर्वकालिन आहे. विचारमंथन हे पुस्तक व्यिक्तमत्व विकास,नेतृत्व विकास, सुजाण पालकत्व, जबाबदार नागरिकत्व अशा कोणत्याही अंगाने वाचकाने पुस्तक हातात धरल्यानंतर त्यालाहवे ते मुद्दे या पुस्तकात मिळू शकतात. आता आपण लेखकाच्या आशावादाला वाचक व संवेदनशील माणूस म्हणून प्रतिसाददेऊया. आपण हे पुस्तक विकत घेऊन शाश्वत विकासासाठीचे वाटाडे होऊया.

# किशोर : प्रसिद्धीसाठी नव्हे, तर कलेसाठी जगणारा कलाकार- अमिताभ बच्चन



बॉलीवूडचे सदाबहार गायक म्हणजे किशोर कुमार आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेक सुपरहिट गाणी दिली आणि लाखो लोकांना वेड लावले. आजही त्यांची अनेक गाणी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत.किशोर कुमार यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त जगभरातील अनेक चाहत्यांकडून सोशल मीडियावर त्यांच्या काही जुन्या आठवणींना उजाळा दिला जात आहे. अनेक चाहते त्यांना सोशल मीडियावर श्रद्धांजली अर्पण करत आहेत. अशातच बॉलीवूड अभिनेते अमिताभ बच्चन यांनीसुद्धा किशोर कुमार यांच्याबद्दल भावना व्यक्त केल्या होत्या.

किशोर कुमार यांचं कौतुक करत अमिताभ बच्चन 'किशोर कुमार केवळ गायक नव्हते; तर ते खऱ्या अर्थानं एक सच्चे कलाकार होते' असं म्हटलं होतं. 'खाइके पान बनारसवाला' आणि 'रिमझिम गिरे सावन' या गाण्यांमध्ये अमिताभ बच्चन यांचा उत्तम अभिनय आणि किशोर कुमार यांचा आवाज अगदी उत्तम जुळून आला होता.

याबद्दल अमिताभ असं म्हणाले होते की, ''किशोर कुमार यांची प्रतिभा फक्त गाण्यापुरती मर्यादित नव्हती. किशोरदांविषयी बोलायला गेलो तर कितीतरी तास कमी पडतील.'' किशोर कुमार यांना सिनेमा आणि कला याची उपजतच जाण होती. याबद्दल अमिताभ यांनी असं म्हटलं होतं की, ''किशोरदा पार्श्व-गायनाकडे अगदी योगायोगाने वळले. गायन किंवा संगीताशिवाय त्यांचे दिग्दर्शकीय विचार, त्यातले कलात्मक दृष्टिकोन फारच प्रगल्भ होते, ज्याबद्दल लोकांना फारसं माहीत नव्हतं.''

यानंतर अमिताभ असं किशोर कुमार यांच्याबद्दल असं म्हणालेल की, ''किशोर कुमार यांच्या आवाजामागे एक असा कलाकार होता, जो फक्त प्रसिद्धीसाठी नव्हे, तर कलेसाठी जगत होता. त्यांच्यातली माणुसकी कायम जिवंत होती. ते कितीही व्यग्र असले किंवा त्यांच्या आयुष्यात काहीही आनंदी किंवा त्रासदायक घडत असो, ते कायम प्रेमाने आणि आपुलकीनेच वागायचे.''

# तांब्याच्या भांड्यात दध उकळवू नका; शरीरात पसरेल विष!



जेव्हा जेव्हा अन्न शिजवण्याचा विचार येतो तेव्हा स्वच्छतेसोबतच भांडी कोणती वापरावी हा देखील महत्त्वाचा विषय असतो. कारण जेवण बनवताना त्या भांड्यांचे कणही त्या भाज्यांमध्ये उतरत असतात. त्यामुळे आपण सर्व भाज्या पूर्णपणे स्वच्छ करतो. तसेच ते हेल्थी कसे बनेस याकडेही लक्ष देतो. पण हे बऱ्याच जणांना माहिती नसेल की ज्या धातूच्या भांड्यांमध्ये तुम्ही अन्न शिजवता, त्याचा तुमच्या आरोग्यावरही मोठा परिणाम होतो.

भाज्यांप्रमाणेच कधी दूधाबद्दल विचार केला आहे का? कारण भाज्यांपेक्षाही दूध हे सर्वात लवकर खराब होणारा पदार्थ आहे. त्यामुळे दूध तापवताना त्यात काही पडलं तरी देखील ते लगेच खराब होण्याची शक्यता असते. म्हणू दुधाच्याबाबतीत फार काळजी घ्यावी लागते. पण त्यासाठी भांड्यांचा पण तेवढा विचार गेला केला पाहिजे. नाहीतर असे दूध प्यायल्याने शरीरात विष पसरण्याची शक्यता असते. प्रत्येक घरात दूध हे उकळवलं जातं. पण ते नक्की कोणत्या भांड्यात उकळवणे चांगले आहे जेणेकरून प्यायलानंतर कोणताही धोका निर्माण होणार नाही. चला जाणून घेऊयात.तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी पिण्याचे अनेक फायदे आहेत. पण चुकूनही दूध किंवा दुधाचे पदार्थ तांब्याच्या भांड्यात शिजवू नयेत किंवा ठेवू नयेत. तांब्यात दूध गरम करताच त्याचे कण दुधात विरघळते आणि दूध विषारी बनते. जर पितळ्याच्या भांड्यांना आत कलई केलेली नसेल आणि पितळ्याचाच थेट पृष्ठभाग असेल तर चुकूनही त्यात दूध शिजवू नका. पितळ्याच्या भांड्यात बनवलेला कोणताही प्रकारचा दुधाचा चहा किंवा दुधाची खीर खराब होते किंवा ते विषासारखे असते. ॲल्युमिनियमच्या भांड्यांमध्ये दूध उकळणे किंवा शिजवणे सुरक्षित मानले जाते. पण तसे नाही. ॲल्युमिनियमच्या भांड्यांमध्ये दीर्घकाळ दूध उकळवल्याने दुधात ॲल्युमिनियमचे प्रमाण वाढते. ज्यामुळे अल्झायमर रोगासारखे आजार होण्याचा धोका वाढतो. ॲल्युमिनियमच्या भांड्याची नीट स्वच्छचा देखील फार गरजेची असते अन्यथा त्याचे घटक दुधात उतरतात त्यामुळे असे दूध पिणे शरीरासाठी हानिकारक असते.

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 123

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ■ | | | | | | ■ | | | | | ■ | लां |
| | | | | ■ | ■ | | | | ■ | | ■ | | ड |
| | ■ | | | ■ | | ■ | | | ■ | | | ■ | गा |
| | | | ■ | | | | ■ | ■ | | ■ | | ■ | आ |
| | ■ | | | ■ | | | | | | | ■ | | ला |
| | | ■ | | ■ | | ■ | | ■ | | ■ | | ■ | रे |
| ■ | | | ■ | | | | ■ | | ■ | | | ■ | आ |
| | | | | ■ | नी | ळ | कं | ठ | ■ | ■ | | ■ | ला |
| | ■ | ■ | | ■ | ■ | ■ | | | | ■ | | | ■ |
| | | ■ | | | | | ■ | | | ■ | ■ | | |
| | ■ | | | ■ | | ■ | | | ■ | | | ■ | |
| ■ | | ■ | ■ | ग | | ■ | | ■ | व्य | व | हा | र | ज्ञ |
| | | | ■ | म | | ■ | | ■ | ■ | | | ■ | ■ |
| | ■ | | | न | ■ | | | | ■ | | ■ | | |

### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः—**

**तीन अक्षरी**

अग्नि, कद, कोय, कंठ, खाक, खीर, गज, गर्व, चर, चिंच, ठसा

तन, तात, तिथी, तीळ, तोंड, दाट, नग, नस, प्राण, मठ, मय, मर्म, मला, माळी

मीन, रज, रेखा, लटा, लाही, वर, व्यस्त, स्तन, हीन

**तीन अक्षरी**

अत्तर, कुलटा, गमन, गंधर्व

चिंतक, जनन, ठराव, दमन, दशक, नरेश, मटका, माहिती, रहाट, विद्युत, सर्वज्ञ, हंगाम

**चार अक्षरी**

अग्निदिव्य, चवदार, दलभार, दहीहंडी, नीळकंठ, प्रायश्चित, पुण्यतिथी, पुनर्वसु, भावजय, वनपाल, सुर्योदय

**पाच अक्षरी**

गोपालकाला, गोकुळाष्टमी, पाठराखण, व्यवहारज्ञ

**सहा अक्षरी**

तन मन धन, विद्युत वाहिनी, सवती मत्सर

**अन्य अक्षरी**

लांडगा आला रे आला

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | ग | द | नी | ति | ■ | श्री | म | न | ये | गी | ■ | ■ | म | क |
| ग | ज | ब | ■ | ट | र | ■ | य | द | ग | र | ■ | म | ह्य | ल |
| वि | ■ | द | ब | क्क | व | पे | ■ | ■ | ये | ■ | घे | ■ | र | व |
| क्ष | ■ | ब | ज | रा | ■ | ■ | पि | ■ | ग | बा | ळ | ग्रं | थी | ■ |
| प | रि | ■ | रं | ■ | क | र | त | ल | ■ | ल | ■ | थ | ■ | स |
| ■ | ऐ | ढ | ग | स्त | ■ | वा | र | ■ | सं | क | ल्प | ■ | क | र |
| क | ढ | ■ | ब | र | ग | ळ | ■ | पे | त | ■ | ■ | रु | बा | ब |
| दा | पे | ■ | ली | ■ | री | ■ | अ | र | ती | ■ | ग | ■ | बा | रा |
| ■ | ■ | अ | ■ | उं | ब | र | ■ | स | ■ | स | वं | त | ■ | ई |
| रा | ज | हं | स | ■ | प | ति | त | ■ | ढ | ळ | ढ | ळी | त | ■ |
| ■ | का | क | ■ | चा | र | ■ | ■ | ब | ल | ■ | ळ | ■ | प | ळ |
| वि | त | र | क | ■ | व | ■ | ग्रा | ह | पी | ड | ■ | मा | शी | ■ |
| ड | ■ | ■ | स | स | र | ■ | ह | र | ■ | ■ | पें | ग | ल | ■ |

Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 504

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | ■ | 4 | ■ | 5 | 6 | 7 | | 8 | ■ | ■ | 9 | 10 | 11 |
| 12 | | | ■ | | ■ | 13 | | | ■ | | ■ | 14 | ■ | 15 | |
| | ■ | 16 | | | | ■ | 17 | | ■ | 18 | 18अ | | | ■ | |
| ■ | 19 | ■ | ■ | | ■ | 20 | ■ | ■ | 21 | ■ | 21अ | | ■ | 22 | |
| 23 | | 24 | | ■ | 25 | | 26 | | | | ■ | | ■ | ■ | |
| 27 | | | ■ | 28 | ■ | ■ | | ■ | | ■ | 29 | ■ | ■ | 30 | ■ |
| | ■ | | ■ | 31 | 32 | | ■ | 33 | | 34 | | 35 | | | ■ |
| ■ | 36 | | 37 | | | ■ | 38 | | ■ | 39 | | | ■ | | ■ |
| 40 | ■ | ■ | | ■ | | ■ | 41 | | | ■ | | ■ | 42 | ■ | 43 |
| 44 | | ■ | | ■ | | ■ | | ■ | ■ | 45 | | 46 | | | |
| | ■ | 47 | ■ | 48 | | 49 | | ■ | ■ | | ■ | | ■ | ■ | |
| 50 | 51 | | 52 | | ■ | | ■ | 53 | 54 | | 55 | | | ■ | |
| ■ | | ■ | 56 | | | | ■ | 57 | | ■ | | ■ | ■ | 58 | ■ |
| 59 | | 60 | ■ | ■ | ■ | ■ | 61 | | ■ | 62 | | 63 | | | ■ |
| 64 | | | 65 | | 66 | | ■ | ■ | 67 | | ■ | | ■ | 68 | |
| | ■ | ■ | | ■ | | ■ | 69 | | ■ | 70 | | | ■ | | ■ |

**आडवी विधानेः—**
1) अग्निसंस्कार, जाळणे
5) मनोरंजन, मौज
9) घराच्या कुंपणाचे दार
12) पुरावा, आधार
13) सर्व, सकळीक
15) झोक, ओढा
16) इंग्रजी कालगणनेत ज्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात 29 दिवस असतात ते वर्ष
17) महाभारतात पांडवांसाठी चमत्कारिक सभागृह बांधणारा राक्षस
18) नगर सोडून वनात राहणे
21अ) सोबती, मित्र
22) व्यवसाय, रोजगार
23) चेहऱ्यावरील हावभाव, अंगविक्षेप
25) आश्विन शुद्ध 10, या दिवशी रावणाच्या पुतळ्याचे दहन केल्या जाते
27) अडचण, कठीण प्रसंग
31) पति जीवंत असलेली स्त्री, सौभाग्यवती
33) ...........पर्यंत, आरंभापासून शेवटपर्यंत
36) परमेश्वराच्या दशावतारापैकी सहावा अवतार
38) वाचून, शिवाय
39) वडिलोपार्जित संपत्तीवर हक्क असलेला
41) स्वच्छ, शुद्ध
44) चूक, अपराध
45) बाळंत होतांना पोटात येणाऱ्या कळा
48) श्रीगणेशाचे वडिलबंधू
50) झोके खाणारा, डळमळीत
53) नवरात्रीत अष्टमीच्या दिवशी घागरीत तोंडाची फुंकर घालून देवीसमोर खेळण्याचा एक विशेष कार्यक्रम
56) भयंकर
57) समुद्रातील शिंपेत सापडणारे एक रत्न
59) समुद्रातील पाणी ओसरणे
61) बगिच्यामध्ये फुलझाडांची काळजी घेणारा
62) बाण आणि धनुष्य यांची जोडी
64) लहान बालकाचे नाव ठेवण्याचा विधी
67) लहान मुलांच्या कल्पनेतील पंख असलेली काल्पनिक सुंदर स्त्री
68) दुसऱ्यांपाशी सुरक्षितपणे ठेवण्यासाठी दिलेले द्रव्य किंवा वस्तू
69) महाभारतात नकुल–सहदेवची माता
70) श्रेष्ठ, उत्कृष्ट, उच्च

**उभी विधाने :—** 1) पाषाण
2) अमिताभ बच्चन, रजनीकांत व गोविंदाचा एक हिंदी चित्रपट
3) कृत्रिम, बनावटी
4) मृतदेह, मृत शरीर
5) धातूची परीक्षा, तत्वांश
6) ऐवज, द्रव्यसंख्या
7) एक पर्वत
8) दया, करूणा
10) एकाग्र दृष्टी
11) दौत, लेखणी ठेवण्याची लहानशी पेटी
14) रोग्याचे रोगनिदान करुन औषधी मिळण्याचे ठिकाण
18अ) शीर, नाडी
19) ढोंगी, लबाड
20) पण, शर्यत
21) रामायणात श्रीरामचंद्राचे पिताश्री
23) अगणित
24) नटात श्रेष्ठ असलेला
26) यज्ञ
28) नवरा किंवा बायकोचे वडील
29) विवाहीत स्त्रीला सासरी होणारा जाच
30) अंत, समाप्ती
32) लाक्षणिक अर्थाने ठेंगणी व्यक्ति
33) निराश्रित, ज्याचे पालन पोषण करायला कुणी नाही असा
34) श्रीकृष्णाचे आवडते वाद्य, बांसरी
35) तपकीर
37) रोग्याची सेवा
38) पैसे किंवा वस्तूंची देवघेव, अदलाबदल
40) देवीचा जागर..'अंबाबाईचा .... .....
42) सोबत, बरोबर
43) हाताच्या करंगळी शेजारचे बोट
45) तऱ्हा, भेद 46) धाक, दरारा
47) गरम दुधावर येणारा पापुद्रा 48) अरण्य, जंगल
49) सिंहाची आयाळ, फुलांतील तंतू
51) लग्न समारोहात वधुवरांच्या हातून करण्यात येणारा लाह्यांचा होम
52) हिंदू वर्षातील अकरावा महिना
53) अति उष्णतेमुळे अंगावर उठणारे पुरळ
54) वेग
55) तोंडाने घातलेला वारा
58) रिकामी खटपट
59) पहिला धडा, प्रारंभ
60) डोळ्यातील बाहुलीवर येणारा पांढरा ठिपका
62) सुर्याची किरणे तिरपे येण्याने होणारी सौम्य उष्णता
63) एका झाडापासून दुसरे झाड लावण्यासाठी तोडलेली पहिल्या झाडाची फांदी
65) स्वर, नाद 66) ज्ञान

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| र | ■ | क्र | र | भा | री | ■ | क | लं | क | ■ | ■ | वै | त | र | णी | ■ |
| क्ष | ■ | न | ■ | ■ | पु | का | रा | ■ | ■ | बे | जा | र | ■ | वि | ■ | भा |
| क | व | डी | मो | ल | ■ | त | र | ■ | म | ■ | व | ■ | क्षु | द्र | ■ | ट |
| ■ | सं | ■ | ल | ■ | पा | र | ■ | ■ | दि | न | क | र | ■ | ना | ट | क |
| पु | त | ना | ■ | द | र | वे | श | ■ | रा | ■ | ■ | ■ | प | थ | क | ■ |
| ■ | रा | म | दा | स | ■ | ळ | ■ | ज | ल | त | रं | ग | ■ | टा | ■ | ■ |
| से | व | क | ■ | रा | ■ | ■ | रा | मा | य | ण | ■ | ग | ण | गो | त | ■ |
| ■ | ना | र | द | ■ | इं | द्र | जा | ल | ■ | स | मा | न | ■ | र | म | णी |
| सु | ई | ण | ■ | स | ■ | वि | ■ | गो | ध | डी | ■ | चुं | ■ | ■ | स | ■ |
| रं | क | ■ | सु | र | कां | डी | ■ | टा | ■ | ■ | क | बी | र | ■ | ■ | द |
| ग | ■ | वा | र | स | ■ | प्रा | ची | ■ | अ | तू | ट | ■ | ■ | सु | दा | मा |
| ■ | शा | र | दा | ■ | ■ | णा | ■ | द | क्ष | ■ | पु | न | र्वि | वा | ह | ■ |
| ■ | का | ■ | स | वि | न | य | ■ | ला | ■ | पा | त | ळ | ■ | स | ■ | आ |
| आ | हा | र | ■ | रं | ग | म | हा | ल | ■ | वा | ली | ■ | उ | ■ | ह | त्या |
| प | री | ■ | अं | गु | र | ■ | तो | ■ | पा | ■ | ■ | उ | च्चा | ट | न | ■ |
| दा | ■ | पु | त | ळा | ■ | क | टी | सू | त्र | ■ | सु | मा | र | ■ | न | ख |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** शत्रूंचा पराभव होईल. तुमचा राग नियंत्रित करा. नवीन करार होऊ शकतात. तुमची प्रतिष्ठा वाढेल. वैवाहिक जीवनात विश्वास वाढेल.

**वृषभः** थकबाकी वसूल करण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. प्रवास फायदेशीर ठरणार नाही. तुम्हाला तुमच्या घराची चिंता असेल.

**मिथून :** काही अडचणी येऊ शकतात. व्यवहारात सावधगिरी बाळगा. अनावश्यक खर्च होतील. जोखीम घेऊ नका.

**कर्क :** काही मोठ्या कामामुळे तुम्ही आनंदी व्हाल. कठोर परिश्रम आणि समर्पणाने तुम्ही कामाच्या क्षेत्रात चांगले यश मिळवू शकाल.तुम्ही तुमच्या व्यसनांवर नियंत्रण ठेवावे.

**सिंह :** व्यवहारात सावधगिरी बाळगा. पाहुणे येतील. तुम्हाला चांगली बातमी मिळेल. तुमचा आदर वाढेल. पैसे मिळणार नाहीत.

**कन्या :** प्रयत्न यशस्वी होतील. कामाचे कौतुक होईल. व्यस्तता असेल. आनंद वाढेल. व्यवसायात अपेक्षित वाढ होण्याची शक्यता आहे.

**तुळ :** वाईट लोक नुकसान करू शकतात. खूप धावपळ होईल. तुम्हाला दुःखद बातमी मिळू शकते. धीर धरा. इतरांच्या कामात दोष शोधू नका.

**वृश्चिक :** तुम्हाला स्वादिष्ट जेवण मिळेल. विद्यार्थी यशस्वी होतील. पैसा मिळेल. भांडवली गुंतवणुकीशी संबंधित कामांमध्ये सावधगिरी बाळगा.

**धनु :** शत्रू सक्रिय असतील. घरात आणि बाहेर तणाव असेल. तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. मालमत्तेशी संबंधित कामे फायदेशीर ठरतील.

**मकर :** शत्रू सक्रिय असतील. घरात आणि बाहेर तणाव असेल. तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. मालमत्तेशी संबंधित कामे फायदेशीर ठरतील. वादात पडू नका.

**कुंभ :** शत्रू सक्रिय राहतील. वाहने आणि यंत्रसामग्री वापरताना काळजी घ्या. रागावर नियंत्रण ठेवा.जुन्या मालमत्तेच्या देखभालीवर पैसे खर्च होऊ शकतात.

**मीन :** आनंदाचे साधन उपलब्ध होईल. धर्मात रस असेल. नफा वाढेल. वाईट संगत टाळा. कुटुंबात शुभ घटनांची चर्चा शक्य आहे.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन | जिल्हास्तरीय निवड समिती गठित

# सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव स्पर्धेत जिल्ह्यातील अधिकाधिक मंडळांनी सहभागी व्हावे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ५ :** सांस्कृतिक कार्य विभागातर्फे, सन २०२५ च्या गणेशोत्सवात सहभागी होणाऱ्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. राज्यातील पहिल्या तीन विजेत्या क्रमांकांना अनुक्रमे पाच लाख, अडीच लाख आणि एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व मंडळांनी सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेसाठी अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या Mahotsav.plda@gmail.com या ईमेलवर स्पर्धेचे परिपूर्ण अर्ज गणेश चतुर्दशीच्या एका दिवसापूर्वीपर्यंत पाठवावेत, असे आवाहन समितीने केले आहे. राज्य समितीकडे जिल्हास्तरीय निवड समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या ४ जिल्ह्यातून प्रत्येकी ३ आणि अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ४४ प्राप्त शिफारशींमधून गुणांकन आणि संबंधित कागदपत्रांच्या आधारे पहिल्या तीन विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड केली जाणार आहे. तर उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांना सहभागी होता येईल. गुणांकनात गायन, वादन, नृत्य, नाट्य, लोककला, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कला, हस्तकला, चित्रकला, शिल्पकला, माहितीपट/चित्रपट आदींसाठी प्रत्येकी २ नुसार एकूण २० गुण आहेत. संस्कृतीचे जतनअंतर्गत संस्कृती संवर्धन, पारंपरिक भांडी, नाणी, शस्त्र आदी प्रदर्शन, वाङ्मयीन उपक्रम, लुप्त होणा-या कलाविष्कारांचे संवर्धन आदींसाठी प्रत्येकी २ असे एकूण १० गुण आहेत. राज्यातील गडकिल्ले, तसेच राष्ट्रीय, राज्य स्मारक यांच्या जतन, संवर्धनासाठी प्रत्येकी ५ नुसार एकूण १० गुण आहेत.

सामाजिक उपक्रमात महिला उपक्रम, पर्यावरण रक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार, व्यसनमुक्ती, ज्येष्ठ नागरिक उपक्रम, शैक्षणिक, कृषी उपक्रम, वंचित घटकांसाठी उपक्रम आदींसाठी प्रत्येकी २ याप्रमाणे २५ गुण आहेत. त्यात आरोग्य सेवा, ग्रंथालय, वृध्दाश्रम, एखादे गाव दत्तक घेणे अशा प्रकारचे कायमस्वरूपी उपक्रम राबवणाऱ्या मंडळांना ५ गुणांचा समावेश आहे. पर्यावरणपूरक मूर्तीसाठी ५ व पर्यावरणपूरक सजावटीला ५ गुण आहेत. , ध्वनीप्रदूषणरहित वातावरण असल्यास ५ गुण व पारंपरिक किंवा देशी खेळांच्या स्पर्धेसाठी १० गुण आहेत.

### जिल्हास्तरीय निवड समिती गठित

जिल्ह्यातील मंडळांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समिती गठित करण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे समितीच्या अध्यक्षपदी असून, चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन बोबडे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी प्रादेशिक अधिकारी संजय पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, पोलीस उपअधिक्षक आनंद महाजन हे सदस्य आणि जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर हे सदस्य सचिव आहेत.

## बेनोडा (शहीद) येथे शेतमजुराची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बेनोडा, दि. ५ :** बेनोडा येथील वार्ड क्र. ६ मध्ये राहणारे दिलीप शामराव गजवे (वय ५५) यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलून ग्रामस्थांमध्ये खळबळ उडवली आहे. दिलीप गजवे हे ४ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे ४ वाजताच्या सुमारास कोणालाही न सांगता घरातून निघून गेले होते. त्यांनी गावातीलच सार्वजनिक हद्दीतील विहिरीत उडी घेऊन जीवन संपवल्याचे समोर आले आहे.

आज दिनांक ५ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास काही नागरिक पाणी भरण्यासाठी विहिरीवर गेले असता, त्यांना विहिरीत मृतदेह दिसून आला. ग्रामस्थांनी तातडीने पोलीस प्रशासनाला याबाबत माहिती दिली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि मृतदेह बाहेर काढण्यात आला.

दिलीप गजवे हे शेती मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समोर आले नसले तरी आर्थिक अडचणीमुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच त्यांचे पुत्र कृतिक बाबूराव गजवे यांनी बेनोडा पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली. पोलिसांनी मृतदेह ग्रामीण रुग्णालयात नेऊन उत्तरीय तपासणीसाठी पाठवला असून, त्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.बेनोडा पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करत पुढील तपास सुरू केला आहे. शेतमजुराच्या आत्महत्येने गावात हळहळ प्रशासनाकडून मदतीची अपेक्षा.

## महत्त्वाचे

### शेतकऱ्यांच्या शेतातील हैदोस घालणारे वन्यप्राणी वनतारामध्ये घेऊन जावे - शैलेश सावजी

**डोणगाव :** शेतकऱ्यांच्या शेतातील हैदोस घालणारे वन्यप्राणी वनतारामध्ये घेऊन जावे असे पत्रच काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी वनतारा चे संकल्पक उद्योग पती अनंत अंबानी यांना दि. ४ऑगस्ट दिले आहे. त्यांनी आपल्या पत्रात आपण महादेवी माधुरी हत्तीनी कोर्टाच्या आदेशाने आपले कडे सांभाळ करण्याकरिता घेतली याचप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शेतात हैदोस घालणारे रानडुकरे , हरीण , रोही याप्रमाणे इतरही जनावरे आपण पकडून आपले वन तारा ह्या आपल्या शौका खातर उभारलेल्या वनतारा या अभयारण्यात घेऊन जाऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी केली आहे.



### निविदा घोटाळ्यातील निलंबित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा -फुले ,आंबेडकरी संघटनेची मागणी



**अकोला :** जिल्हा महिला रुग्णालयातील नवजात शिशु अतिदक्षता विभागातील परिचारिका भरतीसाठी झालेल्या ई-निविदा प्रक्रियेत भ्रष्टाचार केल्याच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आलेल्या डॉ. तरणतुषार वारे (जिल्हा शल्यचिकित्सक), डॉ. जयंत पाटील (अधीक्षक, स्त्री रुग्णालय) आणि ए.एन. डांबरे (प्रशासकीय अधिकारी) यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी फुले आंबेडकरी राष्ट्रीय विद्यार्थी युवक संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. महेंद्र रमेश भोजने, जिल्हाध्यक्ष (अकोला) यांच्या नेतृत्वाखाली निवेदन सादर करताना संघटनेने आरोप केला की, या अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून मर्जीतील ठेकेदाराला लाभ मिळवून दिला. यामुळे शासन आणि जनतेची फसवणूक झाली आहे. या तिन्ही अधिकाऱ्यांविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल न झाल्यास संघटनेच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनाची प्रत आरोग्य आयुक्त (मुंबई), उपसंचालक आरोग्य सेवा (अकोला) व जिल्हा पोलीस अधीक्षक (अकोला) यांनाही देण्यात आली आहे.यावेळी सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे, उल्हास सरदार, संतोष ढोले, संजय वानखडे, श्रीकांत खेडकर आदि निवेदन देतेवेळी उपस्थित होते.

### संतोष काळे यांचे दु:खद निधन



**अकोला:** अकोला नगर परिषदेचे माजी सभापती रामभाऊ काळे यांचे ज्येष्ठ चिरंजीव तथा शिवसेना (उबाठा गटाचे) जिल्हाप्रमुख मंगेश काळे यांचे मोठे बंधू संतोष रामभाऊ काळे (वय ५३) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. केशवनगर रिंग रोड अकोला येथील त्यांचे मातोश्री निवासस्थानवरून अंत्ययात्रा बुधवार, दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता निघणार आहे. अंत्यसंस्कार कौलखेड येथील स्मशानभूमी येथे होणार आहेत. ते अत्यंत मनमिळाऊ, स्नेही आणि सर्वांचे लाडके होते. त्यांच्या निधनाने काळे कुटुंबियांसह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो हीच प्रार्थना.ॐ शांती.

## सरपंच व सचिवाला कायमस्वरूपी पदमुक्त करा अन्यथा स्वातंत्र्यदिनी आत्मदहनाचा इशारा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**डोणगाव, दि. ०५ :** मौजे विठ्ठलवाडी येथील ग्रामपंचायतचे सरपंच धनराज मानसिंग राठोड व सचिव बी.एस. काळे यांनी संगनमत करुन सत्येंद्र आत्माराम इंगळे यांच्या जागेच्या ८ अ च्या रजिष्टर मध्ये खोडतोड केली असुन याबाबत मेहकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१/१२/२०२४ रोजी तक्रार करुन ही गटविकास अधिकारी दिनकर खरात यांनी सरपंच सचिवाला व रस्तात अतिक्रमण करणा-या विठ्ठल जयराम शेवाळे यांना पाठीशी घातले असुन दिनकर खरात गटतिकास अधिकारी व सरपंच व सचिव हे सत्येंद्र आत्माराम इंगळे यांना आर्थिक मानसिक व शारिरीक त्रास देत असल्याने दिनकर खरात गटविकास अधिकारी पं.स. मेहकर तसेच सरपंच धनराज मानसिंग राठोड सचिव बी.एस. काळे यांची जिल्हा परिषद चे मुख्यकार्यकारी अधिकाऱ्या मार्फत चौकशी करून ग्रामपंचायतच्या रेकॉर्ड ची खोड तोड केल्याने सरपंच सचिवाला व गटविकास अधिकाऱ्याला कावभस्वरुपी पद मुक्त करुन फौजदारी गुन्हे दाखल न झाल्यास दिनांक १५/०८/२०२५ रोजी महाराष्ट्रात कोठेही आत्मदहन करीत असल्या बाबतचा इशारा विठ्ठलवाडी येथील सत्येंद्र आत्माराम इंगळे यांनी दि. ६ऑगस्टला मुख्यमंत्री यांना दिला आहे. त्यांनी आपल्या तक्रारीत मी अर्जदार सत्येंद्र आत्माराम इंगळे रा. विठ्ठलवाडी ता. मेहकर जि. बुलढाणा. कायम रहीवासी असुन शेती व्यवसाय करतो. माझी मालकीची व प्रत्यक्ष ताब्यात असलेली जागा हि खरेदी खता प्रमाणे ६५३१ अशी असुन ग्रामपंचायतचे सरपंच धनराज मानसिंग राठोड व सचिव बी. एस. काळे व माझ्या जागेजवळ ग्रा.पं. च्या रस्तावर विठ्ठल जयराम शेवाळे यांनी अतिक्रमण केल्याने ग्रा.पं. ने चक्क सिमेटचा रस्ताच माझ्या जागेतून केल्याने माझी जागा क्षेत्र कमी झाले असुन मला माझ्या जागेचे माझ्या रजिष्टर खरेदीखता प्रमाणे क्षेत्र मिळालायला पाहीजे परंतु सरपंच व सचिव यांनी ग्रामपंचात कार्यालयाच्या नमुना ८. अ च्या रजिष्टर मध्ये खोडतोड करुन माझी जागा ६५३१ ऐवजी ५०३१ अशी केली आहे. याबाबतची मी रितसर तक्रार लोकशाही मार्गाने पंचायत समितीस अधिकारी दिनकर खरात यांच्या कडे दिनांक ३१/१२/२०२४ रोजी केली होती. ८ महिने उलटुनही अतिक्रमण करणाऱ्या विठ्ठल जयराम शेवाळे व ग्रा.पं. कार्यालयातील नमुना ८ अ च्या रेकॉर्ड मध्ये संगनमताने सरपंच व सचिवाने खोडतोड करुन माझ्यावर अन्याय केला आहे. माझ्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मी अनेक वेळा मेहकर पं.स. गटविकास अधिकारी यांना प्रत्यक्ष भेट व विस्तार अधिकारी पंडागळे यांना अनेक वेळा भेटही माझ्या तक्रारीचे निवारण केले नाही. उलट मेहकर पं.स.गटविकास अधिकारी दिनकर खरात यांनी सरपंच धनराज मानसिंग राठोड सचिव बी. एस. काळे व सिमेंट रस्तावर अतिक्रमण करणाऱ्या विठतल जयराम शेवाळे यांना पाठीशी घालून माझ्यावर अन्याय केला मेहकर पं.स. गटविकास अधिकारी दिनकर खरात विस्तार अधिकारी पंडागळे सरपंच धनराज मानसिंग राठोड सचिव बी.एस. काळे व विठ्ठल जयराम शेवाळे हे मला आर्थिक मानसिक व शारिरिक छळ करीत असल्याने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी हि जि.प.चे मुख्यकार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी प्रत्यक्ष चौकशी करुन दोषींना कायम स्वरुपी पदमुक्त करुन फौजदारी गुन्हे दिनांक १४/०८/२०२५ पर्यंत दाखल न झाल्यास व माझ्यावर झालेल्या अन्यायाला न्याय न मिळाल्यास व माझ्या जागेच्या रजिष्टर खरेदीखताप्रमाणे जागा मोजून न मिळाल्यास माझ्यावर अन्याय करणाऱ्या मेहकर पं. स. गटविकास अधिकारी दिनकर खरात, विस्तार अधिकारी पंडागळे, सरपंच धनराज मानसिंग राठोड व सचिव बी.एस. काळे अतिक्रमण करणारे विठ्ठल जयराम शेवाळे या लोकांन मुळेच मी दिनांक १५/०८/२०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत महाराष्ट्रात कोठेही आत्मदहन करीन होणाऱ्या परिणामास मेहकर पं. स. गटविकास अधिकारी दिनकर खरात, विस्तार अधिकारी पंडागळे, सरपंच धनराज मानसिंग राठोड व सचिव बी.एस. काळे अतिक्रमण करणारे विठ्ठल जयराम शेवाळे हेच जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

## अर्चना तायडे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मूर्तिजापूर , दि. ५ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व बहुउद्देशीय संस्था मूर्तिजापूर द्वारा संचालित सिद्धार्थ विद्यालय व कनिष्ठ कला महाविद्यालय व गोल्डन किड्स इंग्लिश कॉन्व्हेंट अध्यक्ष/प्राचार्य अर्चनाताई तायडे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

गोरगरिबांच्या, अनाथ मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन बी. सी . वसतिगृह चालविणाऱ्या, , बहुजनाच्या हितासाठी, सुखासाठी सतत झिंजणाऱ्या, एक आदर्श व्यक्तिमत्व अर्चनाताई संजय तायडे यांना दिनांक ३/८/२०२५ रोजी मधुराम सभागृह, विदर्भ हिंदी साहित्य संमेलन श्री फ तेचंद भवन, राणी झाशी चौक वर्धा रोड, नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी डॉ. नामदेव कि रसान, ,सुप्रसिद्ध समाजसेवक पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, प्रा. डॉ. बी . एन. खरात, सोशल वर्कर डॉ. मोनिका, फिल्म म्युझिक डायरेक्टर अमृत प्रतिष्ठान नागपूरचे डॉ. मोरेश्वर निस्ताने सह सिनेसृष्टीतील कलावंत समाजसेवक यांची उपस्थिती होती.त्यांनी आपल्या पुरस्कारांचे श्रेय गुरुवर्य, आई वडील, भाऊ बहीण, कुटुंबातील सर्व सदस्य, शहरातील सर्व नगरवासी, यांना दिले असून शिक्षण महर्षी कालकती दिवंगत संजय विजयकुमार तायडे यांच्या स्मृतीस पुरस्कार समर्पित केला.

## यवतमाळमधील सात ग्रामीण रस्त्यांच्या कामांना हिरवी झेंडी

### पालकमंत्र्यांच्या प्रयत्नांना यश, ३९ कोटींची विकासकामे मंजूर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ०५ : पालकमंत्री संजय राठोड यांच्या प्रयत्नांमुळे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत जिल्ह्यातील सात प्रमुख ग्रामीण रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. या कामांच्या निविदा स्वीकृत झाल्या असून, ३९ कोटी ५९ लाख रुपयांच्या या विकासकामांना शासनाने मान्यता दिली आहे. ही कामे तात्काळ सुरू करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले आहेत.

ग्रामीण भागातील रस्ते मजबूत आणि दर्जेदार करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबवली जाते. या योजनेतून, पालकमंत्री संजय राठोड यांच्या सूचनेवरून सात ग्रामीण रस्त्यांचे प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आले होते. ग्रामविकास विभागाने १८ जुलै रोजी या कामांना प्रशासकीय मान्यता दिली होती.

या मंजूर कामांमध्ये राज्य मार्ग २८२ रामगाव रामेश्वर धामणगाव देव ते चौसाळ तालुका बॉर्डर रस्ता, राज्य मार्ग २५७ ते देऊळगाव अंतरगाव डोल्हारी ते ब्रह्मनाथ रस्ता, प्रमुख राज्य मार्ग १४ ते खंडाळा रस्ता, सारंगपूर कापसी बोरगाव लिंगा कामठवाडा रस्ता, मोख ते रामगाव रस्ता, ईसापूर पेळू राहटी सावली पोहरादेवी रस्ता आणि प्रमुख जिल्हा मार्ग २४ नेताजी नगर ते जोगलदरी रस्ता या सात कामांचा समावेश आहे.

### १० वर्षांच्या देखभाल-दुरुस्तीची तरतूद

या सात ग्रामीण रस्त्यांच्या दर्जोन्नतीसाठी एकूण ३९ कोटी ५९ लाख ८ हजार ४०८ रुपये खर्च केले जाणार आहेत. विशेष म्हणजे, रस्ते तयार झाल्यानंतर संबंधित कंत्राटदाराला १० वर्षे या रस्त्यांची देखभाल आणि दुरुस्ती करावी लागणार आहे. यासाठी १ कोटी ८८ लाख ५२ हजार १८३ रुपयांची अतिरिक्त रक्कम मंजूर करण्यात आली आहे. यामुळे रस्त्यांचा दर्जा टिकून राहण्यास मदत होईल.

त्यानंतर, निविदा प्रक्रिया राबवून पात्र संस्थेच्या दरास शासनाने ४ ऑगस्ट रोजी मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील वाहतुकीला मोठी गती मिळणार असून, शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या सर्व रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्यात येणार असल्याने, पर्यावरणाच्या संवर्धनालाही हातभार लागणार आहे. पालकमंत्री संजय राठोड यांनी सर्व कामांचे कार्यारंभ आदेश तात्काळ देऊन, कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या कार्यकारी अभियंत्यांना दिले आहेत.

## कोरपणा शहरातील अतिक्रमण हटविले; आता चारचाकी वाहने हटणार का?

### अवैद्य वाहतुकीमुळे कोरपण्यात रस्त्यांची पुन्हा गोंधळीकडे वाटचाल!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कोरपणा , दि.५:** कोरपणा शहरात अलीकडेच अतिक्रमणविरोधी मोहीम राबवून रस्त्यांचे मोकळीकरण करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी त्याच रस्त्यांवर पुन्हा एकदा अवैद्य चारचाकी वाहनांच्या गर्दीमुळे वाहतूक व्यवस्था कोलमडू लागली आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या पुलाखाली आणि कोरपणा बस स्थानक चौकात अवैद्य वाहने रस्त्यांवर उभी राहत असून, प्रवाशांच्या हालचालींना अडथळा निर्माण करत आहेत.



बस स्थानक चौक हा चौफुलीचा मुख्य मार्ग आहे. येथे दररोज प्रवाशांची व वाहनांची मोठी गर्दी दिसून येते. मात्र, प्रवाशांसाठी निवारा नसल्याने रस्त्याच्या मध्यभागी उभे राहूनच त्यांना वाहतुकीची वाट पाहावी लागते. त्यातच रस्त्यावरच प्रवासी भरले जात असल्याने अपघाताचा धोका वाढत आहे. अनेक दुकानदार दुकानाबाहेरील साहित्य थेट रस्त्यावर ठेवून विक्री करत आहेत, त्यामुळे रस्ता आणखी अरुंद होत आहे. वाहतूक पोलिसांची भूमिका मात्र यामध्ये उदासीन दिसून येत असून, काही रिक्षाचालकांकडून प्रवाशांशी उद्धटपणा, शिवीगाळ व वादविवाद होत असल्याच्या तक्रारीही वाढल्या आहेत. महिलांसाठी हे अधिक असुरक्षित वातावरण निर्माण करत आहे.

नागरिकांच्या मते, फक्त अतिक्रमण हटवून उपयोग नाही, तर रस्त्यांवरील अवैद्य वाहतूक रोखणे, सायलेन्सरमुळे होणारा ध्वनी व धूळ प्रदूषण कमी करणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे आता प्रशासनाने केवळ पाहणी न करता ठोस कृती करावी, अशी मागणी होत आहे. याशिवाय, काही व्यापाऱ्यांचे अतिक्रमण अद्यापही हटवले गेलेले नाही. त्यामुळे त्यांना स्थानिक लोकप्रतिनिधींचा आशीर्वाद आहे का, अशी कुजबूज शहरात सुरू आहे. नगरपंचायतीने अशा व्यापाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.जशी कारवाई फेरीवाल्यांवर झाली, तशीच कारवाई अवैद्य वाहतूक आणि प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर होणे गरजेचे आहे. दुचाकी वाहनांसाठी योग्य पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी. वाहतूक विभागाने शहरासाठी नव्याने आराखडा तयार करून राबवावा, अशी अपेक्षा आता नागरिक व्यक्त करत आहेत.

## निराधारांना आधार | प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ योजनेची यशस्वी अंमलबजावणी

# जिल्ह्यातील पाच हजारांवर बेघरांना मिळाले हक्काचे घरकुल

। श्रीकांत पाचकवडे ।

**अकोला, दि. ५ : केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ ची जिल्ह्यात यशस्वी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मंजुर ३९ हजार ५९८ लाभार्थ्यांपैकी ५ हजार ९६५ लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले असुन या बेघरांना हक्काचे घरकुल मिळाले आहे.**



सर्वांसाठी घर हे केंद्र शासनाचे धोरण असून, त्यानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न आहे. त्यानुसार राज्यात ग्रामीण भागातील बेघरांना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येतात. राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान योजना राबविण्यात येत आहेत. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या धर्तीवर विविध प्रवर्गाकरीता राज्य पुरस्कृत आवास योजना राबविण्यात येत असून त्यामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांकरीता रमाई आवास योजना, अनुसूचित जमाती करीता शबरी आवास योजना व आदिम आवास योजना तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती करीता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, इतर मागास वर्ग प्रवर्गासाठी मोदी आवास योजना इत्यादींचा समावेश आहे. या सर्व योजनांची अंमलबजावणी ग्राम विकास विभागांतर्गत स्थापित राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयामार्फत करण्यात येते. केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ सन २०२४-२५ ते सन २०२८-२९ या कालावधीसाठी सुरु केला आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यात ३९ हजार ५९८ घरकुलांना मंजुरी दिली असुन त्यापैकी ५ हजार ९६५ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असुन या बेघरांना त्यांचे हक्काचे घरकुल मिळाले आहे. तर ३१ हजार ७०६ लाभार्थ्यांना पहिला हप्ता णि १८ हजार ५० लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्ताच्या निधीचे वितरण करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी प्रकल्प संचालक विनय ठमके यांनी दिली.

### लाभार्थ्यांना चावीचे वितरण

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या मार्गदर्शनात प्रधानमंत्री आवास योजनेची जिल्ह्यात यशस्वी अंमलबजावणी सुरू आहे. जिल्ह्यातील बेघर लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या घरकुलाच्या चावीचे वितरण जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्या हस्ते करण्यात आले.

## निबंधक कार्यालयातील अनियमितता थांबविण्याची जय शिवसंग्राम संघटनेची मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**देऊळगाव राजा , दि.५:** येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी प्रक्रियेत शेतकरी व नागरिकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याची तक्रारी वाढत आहेत. या संदर्भात जय शिवसंग्राम संघटनेच्या वतीने दुय्यम निबंधक कार्यालयास निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात खाजगी व अनधिकृत कर्मचाऱ्यांचा हस्तक्षेप, असल्याने तसेच दस्त नोंदणीसाठी घेतले जाणारे अनधिकृत शुल्क या वर तीव्र नाराजगी व्यक्त करण्यात आली आहे. जय शिवसंग्राम संघटनेने अशा प्रकारच्या अनियमितता थांबवण्यासाठी ६ ठळक मागण्या मांडल्या आहेत.१) अतिरिक शुल्क आकारू नये.२) शासकीय दरपत्रक आपल्या कार्यालयात लावावे.३) अनधिकृत व्यक्तींना कार्यालयातील कामात सहभागी होऊ देऊ नये.४) नागरिकांना शुल्क बाबत स्पष्ट माहिती द्यावी.५) खरेदी दस्त नियम बाह्य असल्यास लेखी कारण द्यावे.६) नागरिकांना सन्मानाने सेवा द्यावी. तसेच १५ दिवसांत लेखी उत्तराची मागणी केली असून योग्य ती कारवाई न झाल्यास जय शिवसंग्राम संघटनेचे वतीने दुय्यम निबंधक कार्यालयात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल.

यात कायदा सुव्यवस्था निर्माण झाल्यास आपण व आपले कार्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

असा इशारा तालुकाध्यक्ष जहीर खान, शहराध्यक्ष अजमत खान, युवक शहराध्यक्ष शंकर वाघमारे, मुबारक चाऊस, शेख इम्रान, असलम खान, साजिद खान, राजेश भाग्यवंत, राजू गव्हाणे, अनिस शहा, किशोर वाघ, शेख अहमद यांनी दिला आहे.

**महत्त्वाचे**

## सुनील गावस्करांनी खेळाडूंना खडसावले



**लंडन** : भारत विरुद्ध इंग्लंड कसोटी मालिकेतील अखेरच्या सामन्यात ९ बळी घेत भारताच्या ऐतिहासिक विजयात मोलाचा वाटा उचलणाऱ्या मोहम्मद सिराजवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. संपूर्ण मालिकेत तब्बल १८५.२ षटके गोलंदाजी करणाऱ्या सिराजच्या अथक परिश्रमाचे कौतुक करताना, भारताचे महान फलंदाज आणि माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी 'वर्कलोड' अर्थात कामाच्या ताणाच्या संकल्पनेवरच सडकून टीका केली आहे. सिराजने आपल्या कामगिरीतून 'वर्कलोड' ही केवळ एक मानसिक बाब असल्याचे सिद्ध केले आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.लंडनच्या केनिंग्टन ओव्हल मैदानावर झालेल्या या कसोटी सामन्यात मोहम्मद सिराजने आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांना प्रभावित केले.

## काव्याने केले पाकिस्तानी खेळाडूंना करारबद्ध



**नवी दिल्ली** : प्रीमिअर लीगमधील फ्रँचायझी सनरायझर्स हैदराबाद संघाची मालकिण काव्या मारन हिच्या एका निर्णयाने क्रिकेटविश्वात चर्चा रंगली आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातील वाढलेला तणाव लक्षात घेता भारताने शेजाऱ्यांसोबत क्रिकेट सामनाही खेळू नये, अशी तीव्र भावना निर्माण झाली आहे. जनभावना लक्षात घेऊनच युवराज सिंगच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या इंडियन चॅम्पियन्स संघाने मध्ये पाकिस्ताविरुद्ध खेळण्यास नकार दिला. असं सर्व घडत असताना काव्या मारनने तिच्या संघात दोन पाकिस्तानी खेळाडूंना करारबद्ध करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे.
काव्या मारनच्या सन ग्रुपने इंग्लंडमध्ये होणाऱ्या लीगमध्येही गुंतवणूक केली आहे आणि ही स्पर्धा आजपासून सुरू होत आहे आणि फायनल ३१ ऑगस्टला खेळवली जाणार आहे.

# आशिया कपसाठी बांगलादेश संघाची घोषणा

नवी दिल्ली, दि.५ प्रतिनिधी

टीम इंडियाने इंग्लंड दौऱ्याची सांगता विजयाने केली. भारताने केनिंग्टन ओव्हलमध्ये झालेल्या सामन्यात ६ धावांनी थरारक विजय मिळवला. भारताने यासह ५ सामन्यांची मालिका २-२ ने बरोबरीत राखली. आता टीम इंडिया महिन्याभराच्या विश्रांतीनंतर थेट सप्टेंबर महिन्यात मैदानात उतरणार आहे. टीम इंडिया ऑगस्ट महिन्यात बांगलादेश दौऱ्यावर जाणार होती. मात्र बीसीसीआयने बांगलादेश दौरा वर्षभरासाठी स्थगित केला. त्यामुळे आता क्रिकेट चाहत्यांना बहुप्रतिक्षित आशिया कप २०२५ स्पर्धेचे वेध लागले आहेत. या स्पर्धेत एकूण ८ संघांमध्ये एका ट्रॉफीसाठी चुरस पाहायला मिळणार आहे. त्याआधी बांगलादेश क्रिकेट टीमच्या गोटातून मोठी बातमी समोर आली आहे.बांगलादेश क्रिकेट बोर्डाने नेदरलँड विरुद्ध होणाऱ्या टी २० मालिकेसाठी आणि आशिया कप स्पर्धेसाठी प्राथमिक संघाची घोषणा केली आहे. निवड समितीने या प्राथमिक संघात २५ खेळाडूंना संधी दिली आहे. तसेच लिटन दास याला कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. नेदरलँड विरूद्धच्या टी २० मालिकेतील कामगिरीव काही खेळाडूंना आशिया कपसाठी मुख्य संघात संधी दिली जाऊ शकते. त्यामुळे बांगलादेशच्या खेळाडूंचा नेदरलँड विरुद्ध चमकदार कामगिरी करत आशिया कपसाठी दावा मजबूत करण्याचा प्रयत्न असणार आहे.क्रिकबझच्या रिपोर्ट्सनुसार, या प्राथमिक संघात नूरुल हसन याला संधी देण्यात आली आहे. नुरूल याने गेल्या काही महिन्यांत सातत्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यामुळे नुरूलला ही संधी मिळाली आहे. तसेच मेहदी हसन मिराज यालाही संधी मिळाली आहे. मिराजला श्रीलंका आणि अफगाणिस्तान विरूद्धच्या टी २० मालिकेत काही विशेष करता आलं नव्हतं. मात्र त्यानंतरही मिराजला संघात कायम ठेवण्यात आलं आहे.बांगलादेशचे खेळाडू ६ ऑगस्टला मीरपूरमधील एसबीएनसीएस कॅम्पमध्ये एकत्र जमतील. त्यानंतर १५ ऑगस्टपर्यंत बांगलादेशचे खेळाडू सराव सत्रात तयारी करतील. त्यानंतर साल्हेटमध्ये २० ऑगस्टपासून सराव कॅम्प आयोजित करण्यात येणार आहे. त्यानंतर नेदलँड्स विरूद्धच्या टी २० मालिकेचा थरार ३० ऑगस्ट ते ३ सप्टेंबर दरम्यान रंगणार आहे



**९ ते २८ सप्टेंबरदरम्यान यूएईमध्ये आशिया कप स्पर्धेचा थरार रंगणार आहे. या स्पर्धेतील ८ संघांना ४-४ नुसार २ गटात विभागण्यात आलं आहे. बांगलादेश टीम बी ग्रुपमध्ये आहे. तसेच बांगलादेश व्यतिरिक्त या ग्रुपमध्ये श्रीलंका, अफगाणिस्तान आणि हाँगकाँगचा समावेश आहे.**

## इंग्लंडमध्ये विजय म्हणजे भारतीय क्रिकेटमधील सर्वोच्च क्षण- राहुल

लंडन : दि.५ प्रतिनिधी

भारतीय संघाने सोमवारी यजमान इंग्लंड संघावर सहा धावांनी रोमहर्षक विजय मिळवला आणि पाच कसोटी सामन्यांची मालिका २-२ अशा बरोबरीत राखली. विराट कोहली, रोहित शर्मा, रवीचंद्रन अश्विन या अनुभवी व महान खेळाडूंच्या निवृत्तीनंतर टीम इंडियाने इंग्लंडमधील कसोटी मालिकेत नेत्रदीपक खेळ साकारला.
याच पार्श्वभूमीवर या भारतीय संघाचा शिलेदार के. एल. राहुल या वेळी भावुक झाला अन् म्हणाला, या मालिकेत आमच्याकडून कोणतीही अपेक्षा बाळगली जात नव्हती, मात्र भारतीय संघाने कमाल करून दाखवली. माझ्यासाठी भारतीय क्रिकेटमधील हा सर्वोच्च क्षण आहे.



**इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत ५३२ धावा फटकावणाऱ्या के. एल. राहुल याने कसोटी क्रिकेटच्या अस्तित्वाबद्दल म्हटले की, भारतीय संघाने विश्वकरंडक पटकावल्याचे आपण सर्वांनी अनुभवले आहे.**

## जनाईची मोहम्मद सिराजसाठी खास पोस्ट

भारतीय संघाने इंग्लंड विरूद्धच्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटीत रोमांचक विजय मिळवला. पहिल्या डावात भारताने २२४ तर इंग्लंडने २४७ धावा केल्या होत्या. त्यानंतर भारताने दुसऱ्या डावात ३९६ धावा करत इंग्लंडला ३७४ धावांचे आव्हान दिले. या आव्हानाचा पाठलाग करताना हॅरी ब्रूक आणि जो रूट यांच्या शतकांमुळे इंग्लंडचा विजय दृष्टीपथात होता. पण शेवटच्या दिवशी इंग्लंडला ३५ धावांची गरज असताना, भारतीय गोलंदाजांनी ४ गडी बाद करत संघाला विजय मिळवून दिला. त्यात ४ पैकी ३ बळी घेत मोहम्मद सिराजने सिंहाचा वाटा उचलला. सिराजच्या या विजयश्री खेचून आणणाऱ्या गोलंदाजीचे चहुबाजूंनी कौतुक होत आहे.



**तशातच लोकप्रिय गायिका आशा भोसले यांची नात जनाई भोसले हिने खास पोस्ट केली.जनाई भोसले ही उत्तम गायिका आहेच. मात्र जनाईच्या गाण्यापेक्षा तिच्या ग्लॅमरस लूकमुळे ती अधिक वेळा चर्चेत येत असते. जनाईने जेव्हा २३वा वाढदिवस साजरा केला, त्यावेळी क्रिकेटर मोहम्मद सिराजसोबतच्या फोटोमुळे ती चर्चेत आली होती. त्या चर्चांना लगेचच पूर्णविराम मिळाला. पण सिराज आणि जनाई यांच्यात चांगली मैत्री असून, ती नेहमी त्याचे कौतुक करणाऱ्या पोस्ट सोशल मीडियावर शेअर करत असते.**

**आजही सिराजने ५ बळी घेत सामना जिंकवल्यानंतर तिने खास पोस्ट केली. सिराजला चाहते प्रेमाने मियाँ मॅजिक म्हणतात. त्याच अनुषंगाने तिने पोस्टवर कॅप्शन लिहिले. जेव्हा कुठलीही गोष्ट चांगली घडत नाही, तेव्हा जादू () घडते अशी इन्स्टास्टोरी तिने पोस्ट केली.**

## मुरली श्रीशंकर याने कोसानोव स्पर्धेत मारली ७.९४ मीटरची झेप

नवी दिल्ली, दि.५ प्रतिनिधी

भारताचा लांबउडीपटू मुरली श्रीशंकर याने सलग तिसऱ्या स्पर्धेमध्ये विजेता होण्याचा मान संपादन केला. कझाकस्तान येथील अल्माटी येथे झालेल्या कोसानोव मेमोरियल ॲथलेटिक्स स्पर्धेत त्याने यश संपादन केले.मागील वर्षी एप्रिल महिन्यात मुरली श्रीशंकर याच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. यामुळे पॅरिस ऑलिंपिकलाही तो मुकला होता. दुखापतीवर मात केल्यानंतर त्याने झोकात पुनरागमन केले.पुणे येथे झालेल्या इंडियन ओपन स्पर्धेमध्ये त्याने ८.०५ मीटर लांब उडी मारत विजेतेपदकावर नाव कोरले होते. पोर्तुगालमधील स्पर्धेमध्ये त्याने ७.७५ मीटर लांब उडी मारत पुन्हा एकदा विजयी होण्याचा मान मिळवला. आता त्याने कझाकस्तान येथील स्पर्धेमध्ये ७.९४ मीटर लांब उडी मारत पहिले स्थान पटकावले.



## भारतामध्ये प्रथमच तिरंदाजी लीगचा श्रीगणेशा

### नवी दिल्लीत ऑक्टोबर महिन्यात स्पर्धा होण्याची शक्यता



नवी दिल्ली, दि.५ प्रतिनिधी

क्रिकेट, कबड्डी, बॅडमिंटन या खेळांप्रमाणे आता तिरंदाजी या खेळाची लीगही भारतामध्ये खेळवण्यात येणार आहे. भारतीय तिरंदाजी संघटनेकडून सोमवारी याबाबतची माहिती देण्यात आली. भारतामध्ये यावर्षी ऑक्टोबर महिन्यात ११ दिवसांमध्ये तिरंदाजी लीगचे आयोजन करण्यात येणार आहे. नवी दिल्ली येथील यमुना क्रीडा संकुलात ही स्पर्धा पार पडणार आहे.
जागतिक तिरंदाजी, आशियाई तिरंदाजी आणि केंद्रीय क्रीडा मंत्रालय यांचे सहकार्य या तिरंदाजी लीगला लाभले आहे.तिरंदाजी लीग ही पुरुष व महिला अशा दोन्ही विभागांत खेळवली जाणार आहे. तसेच रिकर्व्ह व कंपाउंड अशा दोन्ही प्रकारांत तिरंदाजांचा कस लागणार आहे. आगामी तिरंदाजी लीगमुळे भारतासह जगामध्ये या खेळाचा प्रसार व प्रचार होणार आहे. असे संकेत संयोजकांकडून याप्रसंगी देण्यात आले आहेत.भारतीय तिरंदाजी संघटनेचे अध्यक्ष अर्जुन मुंडा याप्रसंगी म्हणाले की, तिरंदाजी लीगच्या आगमनाने खेळाडूंना नवीन व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

## प्रो कबड्डीच्या हंगामात हरियाणा, पुणे, तमिळ हे संघ वर्चस्व गाजविणार-देवाडिगा

नवी दिल्ली, दि.५ प्रतिनिधी

प्रो कबड्डी लीगच्या १२ वा हंगामाला २९ ऑगस्ट २०२५ रोजी विशाखापट्टणम येथे सुरुवात होणार आहे. यंदाच्या हंगामातही एकूण १२ संघ विशाखापट्टणम, जयपूर, चेन्नई, दिल्ली या चार ठिकाणी होणाऱ्या टप्प्यांमधून विजेतेपदासाठी खेळणार आहेत. २९ ऑगस्ट रोजी विशाखापट्टणम येथील राजीव गांधी इंडोर स्टेडियममध्ये तेलगू टायटन्स विरुद्ध तामिळ थलायवाज आणि बेंगळुरू बुल्स विरुद्ध पुणेरी पलटण अशा ब्लॉक बस्टर लढतींनी स्पर्धेला सुरुवात होईल.
पीकेएल १२ स्पर्धेचा दुसरा टप्पा १२ सप्टेंबरपासून जयपूर येथील एसएमएस स्टेडियमच्या जयपूर इंडोर हॉलमध्ये, तर तिसरा टप्पा २९ सप्टेंबरपासून चेन्नई येथील एसडीएटी इंडोर स्टेडियम येथे होईल.
साखळी स्पर्धेतील शेवटचा टप्पा दिल्लीमधीस त्यागराज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे १३ ऑक्टोबरपासून रंगणार आहे. प्ले ऑफ स्पर्धेचे वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येणार आहे. प्रो कबड्डी लीगचा १२वा सीझन जवळ येत असताना, प्रशिक्षक बीसी रमेश, मनप्रीत सिंग, आणि अजय ठाकूर यांच्यासह जिओस्टारचे पीकेएल तज्ञ रिशांक देवाडिगा यांनी नवीन वेळापत्रकाचे आणि सीझनचे विश्लेषण केले.



## चिनी कंपनीकडून पेटीएमच्या शेअरची विक्री



**नवी दिल्ली** : चिनी उद्योजक जॅक मा यांच्या ॲन्ट फायनान्शियलने मंगळवारी पेटीएमची मूळ कंपनी असलेल्या वन९७ कम्युनिकेशन्समधून बाहेर पडून त्यांचा संपूर्ण ५.८४ टक्के हिस्सा सुमारे ३,८०३ कोटी रुपयांना विकला आहे. या हिस्सा विक्रीनंतर, राष्ट्रीय शेअर बाजारात वन९७ कम्युनिकेशन्सचे समभाग १.४५ टक्क्यांनी घसरून १,०६२.६० रुपयांपर्यंत खाली आहे.ॲन्ट समूहाने त्यांच्या संलग्न ॲन्टफिन (नेदरलँड्स) होल्डिंगच्या माध्यमातून नोएडास्थित वन९७ कम्युनिकेशन्सचे समभाग विकले आहेत. ॲन्ट समूह, ज्याला पूर्वी ॲन्ट फायनान्शियल म्हणून ओळखले जात होते, ही चिनी समूह अलिबाबा समूहाची संलग्न कंपनी आहे. ॲन्ट फायनान्शियलकडून सुमारे ३.७३ कोटी समभाग म्हणजेच ५.८४ टक्के हिस्सा विक्री करण्यात आला. प्रति समभाग १,०२० रुपयांनी समभागांची विक्री करण्यात आली, जे सोमवारी एनएसईवर पेटीएमच्या १,०७८.२० रुपयांच्या बंद भावापेक्षा ५.४ टक्क्यांपर्यंत सूट दर्शवतात.

# बाजारात कांदा, लसणाचे दर गडगडले

मुंबई:, दि.५ प्रतिनिधी

कांदा व लसूण हा दैनंदिन जेवणामध्ये वापरला जातो.कांदा,लसणाशिवाय जेवण स्वादिष्ठ व रुचकर होत नाही. सध्या बाजारपेठेत चांगल्या दर्जाचा कांदा व लसूणाची आवक मोठ्या प्रमाणात झाली आहे.याचा परिणाम दोन्हीचे दर गडगडले आहेत.कांदा प्रतिकिलो १६ पासून ते २२ रुपयांपर्यंत तर लसूण ८० रुपयांपासून ते दोनशे रुपयेपर्यंत झाला आहे. श्रावण महिना असल्याने सध्या कांदा, लसणाची विक्री कमी असल्याचे मुंबईतील विक्रेत्यांनी सांगितले.
महाराष्ट्रात कांदा हा विशेषत:लासलगांव (जि.नाशिक),नारायणपुर (जि.पुणे ) व लोणंद (जि.सातारा) येथून प्रामुख्याने मुंबईतील बाजारपेठेत येतो.मात्र;यावर्षी कांद्याचे उत्पादन जास्त असल्याने बाजारात कांद्याची आवक मोठया



प्रमाणात येत आहे.त्यामुळे कांद्याच्या दरात घसरण झाली आहे.काही दिवसांपासून कांद्याच्या दरात घट झाल्याने शंभर रुपयांना ५ किलो असा किरकोळ बाजारात दर झाला आहे.
याबाबत दादर येथील कांदा विक्रेते हरिश्चंद्र भोर म्हणाले,यावर्षी कांद्याची आवक जास्त कांद्याचे भाव गडगडले आहेत.घाऊक बाजारात कांदा १६ ते २२ रुपये तर किरकोळ बाजारात २० ते २५ रुपये असा त्याचा प्रतिकिलो दर झाला आहे.
तसेच घरातील ठेवणीचा कांदा हा नारायणपूरच्या कांद्याला ग्राहकांची सर्वाधिक मागणी आहे. श्रावण सुरु झाल्याने घरगुती ग्राहक व हॉटेल मालक यांची काद्याला मागणी कमी आहे.हा दर किती दिवस राहिल,हे सांगता येणार नाही.कांद्याबरोबर लसूण याच्या दरातही घट झाली आहे.

**आधुनिकीकरण**

**१८ महिन्यांत नव्या स्वरूपात पॅन कार्ड उपलब्ध होणार**

# पॅन २.० प्रकल्पाला सुरुवात

नवी दिल्ली, दि.५ प्रतिनिधी

पॅन कार्डाच्या आधुनिकीकरणासाठी म्हणजे पॅन २.० प्रकल्पासाठी प्राप्तिकर विभागाने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एलटीआय माइंडट्री या कंपनीची निवड केली आहे. या प्रकल्पाचे कामकाज पूर्ण होऊन नव्या स्वरूपातील पॅन कार्ड १८ महिन्यात उपलब्ध होण्याची शक्यता आहे.
आहे त्या पॅन कार्डमध्ये सुधारणा करणे आणि त्यामध्ये नव्या मूल्यवर्धित बाबी समाविष्ट करणे इत्यादीचा या प्रकल्पात समावेश आहे. पॅनमधील अपडेट, दुरुस्ती, आधार- पॅन लिंकिंग, आधारचे फेरवाटप, इत्यादी बाबीचा या प्रकल्पात समावेश करण्यात आला आहे.






**माईंडट्री कंपनी सेवा पुरवठादार म्हणून काम करणार आहे.यात पॅनचे डिझाईन, विकास, अंमलबजावणी, देखभाल इत्यादीचा समावेश आहे. प्राप्तेकर विभागाच्या याविषयीच्या १,४३५ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने २५ नोव्हेंबर २०२४ रोजी परवानगी दिली आहे. या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतरही सध्या ज्यांच्याकडे पॅनकार्ड आहेत त्यांना पुन्हा अर्ज करण्याची गरज पडणार नाही.**



## ट्रम्पच्या टॅरिफ धमकीमुळे फार्मा सेक्टरमध्ये मोठी घसरण

नवी दिल्ली, दि.५ प्रतिनिधी



जागतिक बाजारपेठेत तेजी असूनही, भारतीय शेअर बाजार मंगळवारी (५ ऑगस्ट) घसरणीसह बंद झाले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त कर लादण्याच्या धमकीमुळे फार्मा आणि ऑटो शेअर्सची विक्री झाली. यामुळे बाजार घसरणीसह बंद झाला.३० शेअर्सचा बीएसई सेन्सेक्स ८०,९४६.४३ वर उघडला, जो त्याच्या मागील बंदपेक्षा ७२.२९ अंकांनी किंवा ०.०९ टक्क्यांनी कमी होता. दिवसभरात तो ८०,५५४ च्या नीचांकी आणि ८१,०१० च्या उच्चांकावर पोहोचला. अखेर तो ३०८.४७ अंकांनी किंवा ०.३८ टक्क्यांनी घसरून ८०,७१०.२५ वर बंद झाला.अशाप्रकारे, एनएसई निफ्टी ५० (निफ्टी-) २४,७२०.२५ वर उघडला, जो त्याच्या मागील बंदपेक्षा फक्त २.५० अंकांनी किंवा ०.०१ टक्के कमी होता. तथापि, फार्मा आणि तेल आणि वायू समभागांमध्ये विक्रीमुळे निर्देशांकावर दबाव आला. तो अखेर ७३.२० अंकांनी किंवा ०.३० टक्के कमी होऊन २४,६४९.५५ वर बंद झाला.

## महत्वाचे

### तडीपाराला अटक

**नागपूर :** अंबाझरी पोलिसांनी एक वर्षासाठी हद्दपार केलेल्या तडीपाराला अटक केली सुरेश उर्फ आबा विजय रामटेके (वय २८) असे त्याचे नाव आहे पोलिस पथक अंबाझरी परिसरात गस्त घालत असताना संजय नगरमधील सार्वजनिक शौचालयाजवळ एका संशयिताबद्दल माहिती मिळाली. पोलिसांनी जवळ गेल्यावर तो पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्याची झडती घेतली. यावेळी त्याच्या कमरेला पॅन्टमध्ये लोखंडी चाकू आढळून आला. अधिक चौकशीत १४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या आदेशानुसार त्याला नागपूर शहर आणि ग्रामीण हद्दीतून एका वर्षासाठी हद्दपार करण्यात आले होते. मात्र, तो परवानगीशिवाय प्रतिबंधित क्षेत्रात शस्त्र बाळगताना आढळला. पोलिसांनी त्याला अटक केली असून, विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गडकरींचा जनसंपर्क कार्यक्रम

**नागपूर :** रस्ते वाहतूक आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम १० ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत आयोजित केला आहे. खामला चौकाजवळील ज्युपिटर शाळेच्या बाजूला जनसंपर्क कार्यालयात नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच आवश्यक कागदपत्रे जोडून आणाव्यात. आपली लेखी निवेदने द्यावीत, आवाहन करण्यात आले आहे. ते नागरिकांना व्यक्तिशः भेटून त्यांच्याशी संवाद साधतील. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

### अज्ञाता विरोधात चोरीचा गुन्हा

**नागपूर :** तीन लाखांपेक्षा अधिक रकमेच्या चोरीप्रकरणात गिट्टीखदान पोलिसांनी अज्ञाताविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार रुबी मुकेश झा (सनशाईन अपार्टमेंट, बर्सा सोसायटी) गोरेवाडा येथील रहिवासी आहेत. त्यांच्या घरात फर्निचरचे काम सुरू असल्याने त्या शेजारच्या घरात गेल्या होत्या. दरम्यान, घरातील कपाटात ठेवलेले अंदाजे ३ लाख ५७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेले. १ ते ४ ऑगस्ट २०२५ दरम्यान झालेल्या चोरीच्या त्यांच्या तक्रारीवरून पोलिस उपनिरीक्षक देशमुख या प्रकरणाचा तपास करत आहेत.

### पसायदानाचे पठण

**नागपूर :** यंदा संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या साडेसातशेव्या जयंतीचे वर्ष असल्याच्या निमित्ताने माऊलींनी पसायदानातून दिलेला विचार राज्यातील प्रत्येक शाळेत एकाच वेळी पोहचावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार येत्या १४ ऑगस्ट रोजी पसायदानाचे पठण करण्यात यावे, असे आदेश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी पुणे येथील शिक्षण विभागाच्या आयुक्तांना यासंदर्भात माहिती दिली. शिक्षण आयुक्त कार्यालयाकडून सदर आदेश राज्यातील सर्व अनुदानित, विना अनुदानित, खासगी, महानगरपालिका, जिल्हा परिषद, संस्थात्मक शाळांना कळविण्यात आले आहेत. १४ ऑगस्ट रोजी गोकुळ अष्टमीला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांची ७५० वी जयंती आहे. यादिवशी स्वातंत्र्यदिनानिमित्त झेंडावंदन, प्रभातफेरीचे कार्यक्रम असल्याने पसायदान पठणाचा कार्यक्रम १४ ऑगस्ट रोजी करण्याचे शालेय शिक्षण विभागाचे आदेश आहेत.

# अजनी-पुणे 'वंदे भारत' लवकरच धावणार!

### अवघ्या १२ तासांत दोन शहरांदरम्यानचा प्रवास

**नागपूर, दि.५ प्रतिनिधी**

बहुप्रतिक्षित अजनी-पुणे स्लीपर 'वंदे भारत' ट्रेन लवकरच धावणार आहे. अवघ्या १२ तासांत दोन शहरांदरम्यानचा प्रवास शक्य होणार आहे. विशेष असे, की गाडी या मार्गावरील सर्वांत वेगवान गाडी राहणार आहे दरम्यान, चालू आगामी सण उत्सवाचा कालावधी पाहता चालू महिन्यात तिचे उद्घाटन होण्याचे संकेत रेल्वे अधिकाऱ्यांनी दिले आहे.

सध्या नागपूर-पुणे मार्गावर हावडा- दुरांतो एक्सप्रेस ही सर्वांत जलद रेल्वे आहे. नागपूर ते पुणे अंतर कापण्यासाठी या गाडीला १२ तास ५५ मिनिटे इतका वेळ लागतो. 'वंदे भारत'ला त्यापेक्षा एक तास कमी वेळ लागणार आहे.

**'स्लीपर' मागणी**

पुणे ते नागपूर हा सुमारे ८१० किलोमीटरचा प्रवास अंतर जास्त




असल्याने 'वंदे भारत स्लीपर कोच एक्स्प्रेस'ची मागणी आहे. पुणे-नागपूरसाठी चेयरकारचा रैक वापरला जाण्याची शक्यता कमी आहे. कारण एवढे अंतर बसून प्रवासे करणे त्रासदायक होऊ शकते. त्यामुळे 'स्लीपर'साठी प्रयत्न करण्यात येत आहे. नागपूर स्थानकावरील पुनर्विकासाचे काम पूर्ण झाल्यानंतर ही ट्रेन अजनीऐवजी नागपूर स्थानकातून निघू शकते. दरम्यान, रेल्वे मंत्री पुणे-नागपूर (अजनी), बेळगाव-बंगळूर व कटरा-अमृतसर या तीन नवीन मार्गावर 'वंदे भारत' एक्सप्रेसची सेवा सुरू करणार आहेत. ऑगस्ट महिन्यात तीन गाड्यांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होण्याची शक्यता आहे.

**लूट थांबणार**

अजनी-पुणे 'वंदे भारत' सुरू करण्याचा निर्णय प्रवाशांसाठी एक वरदान ठरण्याची शक्यता आहे कारण या मार्गावर विशेषतः सणासुदीच्या काळात प्रवाशांची संख्या वाढत असल्याचा अनुभव दरवर्षी येतो खाजगी प्रवासी कंपन्या दिवाळी सणाच्या दिवसांत अव्वाच्या सव्वा भाडे आकारत असल्याने गावाला सण साजरा करावा की पैशांची लूट करवून घ्यावी, अशा चिंतेत अनेकजण असतात 'वंदे भारत' ट्रेनमुळे सध्याच्या वाहतुकीच्या पर्यायावरील ताण कमी होण्याची अपेक्षा आहे. अनेकदा बसेस आणि विमानांचे भाडे मोठ्या रकमेत वसूल करण्यात येते या प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्या प्रवाशांना अक्षरशः पिळून काढत असतात, ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे.

# मृत्यूनंतरही नवजीवनाचा आधार व्हा, अवयवदानासाठी पुढाकार घ्या

**नागपूर, दि.५ प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य विभागाने ३ ते १३ ऑगस्ट २०२५ हा कालावधी अवयवदान पंधरवडा म्हणून जाहीर केलेला आहे. नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरात अवयवदान पंधरवडानिमित्त अनेक जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. एक व्यक्ती मृत्यूनंतरही आठजणांना जीवनदान देऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी अवयवदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन नागपूर महानगरपालिकाच्या आरोग्य विभागाद्वारे करण्यात येत आहे.

नागपूर महानगरपालिकेद्वारे ३ व ४ ऑगस्ट २०२५ रोजी मनपाचे ५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि मनपा दवाखान्यांमध्ये जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करून शहरात अवयवदान पंधरवड्याचा शुभारंभ करण्यात आला. राज्यात सुरू असलेल्या अवयवदान पंधरवड्यात जास्तीत जास्त नागरिकांनी अवयवदानासाठी पुढे यावे आणि सहजरित्या नोंदणी करता यावी यासाठी राज्य सरकारद्वारे संकेतस्थळ जारी करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या अवयवदान पंधरवडाची शहरात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी निर्देश दिले आहेत. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात १३ ऑगस्ट २०२५ पर्यंत शहरातील शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, आरोग्य संस्था व सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहभागाने जनजागृती केली जाणार आहे. या मोहिमेतून अवयवदानासंबंधी भीती आणि गैरसमज दूर करून वैज्ञानिक माहिती लोकांपर्यंत पोहोचविली जाणार आहे, अशी माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी दिली.




**रुग्ण प्रतीक्षा करताहेत...**

संकेतस्थळावर आधार क्रमांक किंवा आधार क्रमांकाशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक टाकून सहजरित्या अवयवदानासाठी शपथ घेऊन नोंदणी करता येत आहे. राज्य सरकारने जारी केलेल्या आकडेवारीनुसार नागपूर विभागात १ हजार ३२४ रुग्ण अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत. आपला एक निर्णय अशा रुग्णांसाठी नवजीवन ठरणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागपूरकरांनी अवयवदानासाठी नोंदणी करावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# विविध विकासकामांची कल्पना स्थानिक लोकप्रतिनिधींना असावी - पालकमंत्री

### जिल्हा नियोजन सभागृह येथे आढावा बैठक

**नागपूर, दि.५ प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत विविध विभागांना उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून विविध योजना साकारल्या जातात. यातून नाविन्यपूर्ण योजना आकारास येतात. या कामांमधून विविध ठिकाणी असलेल्या इतर व्यावसायिक आस्थापनातून अप्रत्यक्षपणे स्वयंरोजगाची निर्मिती होत राहते. जिल्हा वार्षिक योजनेतील कामे निश्चित करताना यापुढे ज्या भागात ही कामे प्रस्तावित केली आहेत त्या भागातील लोकप्रतिनिधींना विभाग प्रमुखांनी कल्पना देऊन कामे प्रस्तावित करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.




महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत यापूर्वी ज्या विभागांकडे निधी वर्ग करण्यात आलेला आहे त्यांनी कोणत्याही स्थितीत येत्या १५ ऑगस्टपर्यंत त्या-त्या योजनांसाठी शासन निर्णयानुसार निधी खर्ची घालण्याबाबत योग्य ती खबरदारी व पूर्तता करण्याचे निर्देश त्यांनी दिले. लोकाभिमुख प्रशासनासह सर्व सामान्य जनतेला शासकीय योजनांचा सुलभ लाभ पोहोचावा यासाठी आपण कटीबद्धता स्वीकारली आहे. सर्वांसाठी घरे ही महत्त्वाकांक्षी योजना असून जिल्हा प्रशासन, मनपा, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हा परिषद यांनी परस्पर समन्वय ठेवून पट्टेवाटप मोहिमेस अधिक गती देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच विविध सण व उत्सवासह गणेशोत्सव सुरु होत आहे. विविध मंडळांना त्यांना आवश्यक त्या परवानग्या, सुरक्षितता मिळावी, गणपतीचे विसर्जन श्रद्धापूर्वक करता यावे यासाठी कुत्रिम तलावाची निर्मिती ही कामे मनपाने युद्धपातळीवर करावी मनपाच्या प्रत्येक झोननिहाय एकखिडकी योजना यासाठी सुरू करण्यास त्यांनी सांगितले. जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, महानगरपालिका, जिल्हा पोलीस अधीक्षक, एनएमआरडीए, पोलिस आयुक्त यांनी एकत्रित येऊन या गणेशोत्सवात अधिक सूत्रबद्ध होऊन नियोजनाची गरज व्यक्त केली.

# पुन्हा एक हिट अँड रन

**नागपूर, दि.५ प्रतिनिधी**

नागपुरात पुन्हा एकदा 'हिट अँड रन' प्रकार घडला असून, अज्ञात ट्रक चालकाविरोधात प्राणघातक अपघात केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहितीनुसार, नरेश दौलतराव मेघराजानी (वय ६६) हे पत्नी विमल यांच्यासह कारमधून प्रवास करत असताना ट्रक चालकाने भरधाव वेगाने वाहन चालवून त्यांच्या गाडीला धडक दिली आणि तो पळून गेला. या अपघातात विमल मेघराजानी गंभीर जखमी झाल्याने शांतीमोहन रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. पीडितांचे नातेवाईक विशाल चेतराम मेघराजानी (वय ५०) यांच्या तक्रारीवरून जरीपटका पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# महाविद्यालयातील हेरीटेज वृक्षांना वाचवा

### मनपा आयुक्त डॉ. चौधरी यांचे निर्देश



**नागपूर, दि. ५ प्रतिनिधी**

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी मंगळवारी सक्करदरा येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय परिसराची पाहणी केली. बांधकाम करताना पुरातन वृक्ष वाचविण्यासह आवश्यक त्या वृक्षांचे पुनर्रोपण करून पर्याय म्हणून नवीन झाडे लावण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला आणि मनपाच्या उद्यान विभागाला दिले.

अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., उद्यान विभागाचे उपायुक्त गणेश राठोड, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र सोनकर यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता वर्ष घुसे व इतर अधिकारी उपस्थित होते. सक्करदरा येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाचे १९६५ मध्ये बांधकाम करण्यात आले होते. आता राज्य शासनाने नवीन रुग्णालय आणि महाविद्यालयासाठी निधी मंजूर केली आहे. यामुळे महविद्यालयात स्नातक अभ्यासक्रमाची क्षमता १०० वरून २०० इतकी तर स्नातकोत्तर अभ्यासक्रमासाठीची क्षमता १०० इतकी होणार आहे. महाविद्यालयाची नवीन इमारत सात माळ्यांची असणार आहे. याशिवाय रुग्णायलयाच्या खाटांच्या संख्येतही वाढ होऊन ३६४ खाट इतके होणार आहेत. १५ एकर जागेमध्ये पसरलेल्या या महाविद्यालयाला २८ हेरिटेज आणि ३९२ नॉन हेरिटेज वृक्ष कापण्याची परवानगी हवी आहे. आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी संपूर्ण परिसराची पाहणी केली असता संबंधित विभागांना हेरीटेज वृक्ष वाचविण्याचे निर्देश दिले. पाहणीदरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता अतुल गोटे, वास्तुशिल्पकार ओंकार मोगरकर, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाचे डॉ. मनीष भोयर, डॉ मनोज शामकुवर, डॉ नीता केदार, डॉ अविनाश देशपांडे उपस्थित होते.

# आम्ही खरोखरच सतर्क?



**नागपूर :** सर्व सार्वजनिक सेवा सुविधा प्रशासनाने पुरवाव्यात, अशी समाजाची अपेक्षा नाकारता येणार नाही मात्र, 'समाजभान' राखत काही बाबींबाबत दक्ष राहणे, हे समाजाचे कर्तव्य आहे 'मी आणि माझे कुटुंब' या पलीकडे जात अवतीभवतीचाही विचार व्हावा अयोध्यानगरातील हा लहानसा नाला आणि त्याचे मूळ कठडे तुटून पडले आहेत त्याऐवजी बांबू बांधण्यात आले कुणाचा त्याला स्पर्श झाला तरी नाल्यात कोसळणे शक्य आहे रोज या रस्त्यांवरून शेकडो जण वाहनातून वा पायी जातात, ते सतर्क का असू नये.

# एजी आणि बीव्हीजीवर 10 टक्के दंड

**नागपूर, दि.५ प्रतिनिधी**

शहरात कचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या मे. बीव्हीजी इंडिया लिमिटेड आणि मे. एजी एनव्हायरो इन्फ्रा प्रा. लि. या कंपन्यांच्या कामात व वाहनांच्या स्थितीत गंभीर त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे, नागपूर महानगरपालिकेने या दोन्ही कंपन्यांच्या एका महिन्याच्या देयकांतून १० टक्के रक्कम कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. अतिरिक्त आयुक्त (शहर) वसुमना पंत यांनी २१ जुलै रोजी झोन १ ते १० मधील कामांची पाहणी केली असता हे प्रकार उघडकीस आले. अनेक वाहनांच्या नंबर प्लेट सुस्थितीत नव्हत्या, वाहनांची नोंदणी नव्हती, पीयूसी काढलेले नव्हते, तर काही चालकांकडे परवानाही नव्हता. मनपाने दोन्ही कंपन्यांना नोटीस बजावली असून, वाहनांच्या स्थितीत सुधारणा करण्याबाबत २४ तासांच्या आत उत्तर देण्याचे देखील कडक निर्देश दिले आहेत.

**सावधान** मार्गदर्शक सूचना निर्गमित

# सरकारी 'बाबूं'च्या सोशल मीडियावर 'वॉच'

**नागपूर, दि.५ प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सोशल मीडियाचा वापर करण्याबाबत नवे मार्गदर्शक नियम जाहीर केले. तसेच, यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

डिजिटल युगात सोशल मीडिया हे संवादाचे प्रभावी साधन असले तरी त्यातून गोपनिय माहितीचा प्रसार, खोटी माहिती पसरवणे, तसेच शासकीय नियमांचे उल्लंघन होवू नये याकरिता मार्गदर्शक तत्त्वे आखण्यात आली आहेत. सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ हे सोशल मीडियाच्या वापराबाबतही लागू राहतील. या नियमांचे उल्लंघन केल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

राज्य शासनातील अधिकारी-कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम तसेच प्रतिनियुक्ती वा करारपद्धतीने नेमलेले कर्मचारी यांना सर्व नियम लागू राहणार आहेत. भारतातील कोणत्याही शासनाच्या चालू किंवा अलीकडच्या धोरणावर प्रतिकूल टीका करण्यास सक्तमनाई करण्यात आली आहे. सोशल मीडियाचा वापर जाणीवपूर्वक आणि जबाबदारीने करावा.वैयक्तिक आणि कार्यालयीन 'सोशल मीडिया अकाउंट' स्वतंत्र ठेवावेत. केंद्र किंवा राज्य शासनाने बंदी घातलेल्या वेबसाईट किंवा ॲपचा वापर करू नये. शासकीय योजना व उपक्रमांच्या प्रसारासाठी केवळ अधिकृत आणि प्राधिकृत माध्यमांचा वापर करावा. कार्यालयीन कामकाजाच्या समन्वयासाठी व्हॉट्सॲप, टेलिग्रामसारख्या मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वापर करता येईल. शासकीय योजनांच्या यशस्वितेसंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट करता येईल. मात्र त्यातून स्वयंप्रशंसा टाळावी. वैयक्तिक अकाउंटवर शासकीय पदनाम, लोगो, गणवेश, शासकीय मालमत्तेचे फोटो किंवा व्हिडिओ अपलोड करू नयेत. आक्षेपार्ह, द्वेषमूलक, भेदभाव करणारा मजकूर पोस्ट किंवा फॉरवर्ड करणे मनाई आहे. प्राधिकृत मंजुरीशिवाय कोणतेही गोपनिय दस्तऐवज सोशल मीडियावर अपलोड करू नयेत. बदली झाल्यानंतर कार्यालयीन सोशल मीडिया अकाउंट योग्यप्रकारे हस्तांतरित करावे.

**शिस्तभंगात्मक कारवाई**

संबंधित नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगात्मक कारवाई केली जाईल. डिजिटल युगात सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर व्हावा आणि शासकीय यंत्रणेचा विश्वासार्हता अबाधित राहावी, यासाठी नियमावली असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

# वीज बिल डाऊनलोड करण्यासाठी 'लॉगिन' अनिवार्य

**नागपूर, दि.५ प्रतिनिधी**

सायबर सुरक्षितता तसेच वीज ग्राहक माहितीच्या गोपनीयतेसाठी महावितरणच्या लघुदाब वर्गवारीच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन डाऊनलोड करण्यासाठी आता संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या सायबर सुरक्षेच्या मार्गदर्शकतत्त्वानुसार हा बदल करण्यात आला आहे.

महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावरील 'वीजदेयक अवलोकन/भरणा' पेजवर लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर ग्राहकांना चालू महिन्याच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत ऑनलाईन डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, याआधी केवळ १२ अंकी ग्राहक क्रमांक सबमिट करून वीजबिल डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध होती. आता नव्या बदलात वीज बिल लॉगिनशिवाय ऑनलाईन भरण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे. मात्र,पीडीएफ वीजबिल डाऊनलोड करण्यासाठी नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य आहे. लॉगिनची लिंकदेखील 'वीजदेयक अवलोकन/भरणा' पेजवर उपलब्ध आहे. तसेच, ज्या ग्राहकांनी आतापर्यंत लॉगिनसाठी नोंदणी केलेली नाही त्यांनी ग्राहक क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेल (असल्यास) माहिती भरून नोंदणी करणे तसेच प्रवेश नाम (लॉगिन आयडी) व पासवर्ड (परवली शब्द) निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी देखील लिंक त्याच ठिकाणी उपलब्ध आहे. नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) केल्यानंतर स्वतःच्या एकापेक्षा अधिक वीजजोडण्यांसाठी विविध ऑनलाईन सेवा उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी लॉगिन केल्यानंतर १२ अंकी ग्राहक क्रमांक लक्षात ठेवण्याची आवश्यकता नाही. तसेच, वीज बिलावरील नाव, वीज भार बदलणे, तक्रार करणे किंवा तक्रारीची सद्यस्थिती पाहणे, वीज बिलांचा भरणा, पत्ता बदलणे व इतर सर्व ऑनलाईन सेवांचा वीज ग्राहकांना लाभ घेता येईल.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, बुधवार, दि.६ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

## महत्त्वाचे

### तरुणाची गळफास लावून आत्महत्या

**अकोला :** जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील वरखेड येथे एक दुर्दैवी घटना घडली असून, चेतन श्रावण वानखडे (३२) या तरुणाने आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना ५ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. यासंदर्भात मृताचा चुलत भाऊ संदीप भास्कर वानखडे (४५) रा. वरखेड यांनी हिवरखेड पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीप्रमाणे, चेतन याचे वडील श्रावण वानखडे हे नेहमीप्रमाणे सकाळी साडेसहा वाजता त्याला उठविण्यासाठी गेले; मात्र घराच्या आत गेल्यावर चेतन याने गळफास घेतल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

### एनएचएम कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा इशारा

**अकोला :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अखेर आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत आंदोलनाचा इशारा दिला आहे. ''राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकत्रीकरण समिती महाराष्ट्र राज्य'' यांच्यातर्फे जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय अकोला यांना याबाबतची अधिकृत नोटीस ५ ऑगस्ट रोजी सादर करण्यात आली. मंगळवार, १९ ऑगस्ट २०२५ पासून हे आंदोलन सुरू होणार असून, या आंदोलनामागील प्रमुख कारण म्हणजे १४ मार्च २०२४ रोजी शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांच्या नियमित सेवेत समावेशनाबाबत घेतलेला निर्णय अद्यापही प्रत्यक्षात न आल्याने निर्माण झालेली अस्वस्थता आहे.

### हिंदू धर्माचा अवमान करणाऱ्यांवर कारवाई करा: मागणी

**अकोला :** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात निर्दोष सुटलेल्या हिंदुत्वनिष्ठांविषयी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या विधानांचा निषेध करीत हिंदू राष्ट्र समन्वय समितीने खदान पोलीस ठाणे व जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. पृथ्वीराज चव्हाण यांनी हिंदू दहशतवाद असा उल्लेख करत सनातन धर्माचा अवमान केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सनातन धर्माने देशाचे वाटोळे केले, असे विधान करून हिंदू समाजाच्या श्रद्धांवर घाला घातल्याचे समितीने म्हटले आहे. या विधानांवर भारतीय न्याय संहिता कलम २९९ अंतर्गत तत्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली.

# नवजात बालकाची अशीही पळवापळवी!

## आईच्या डोळ्यासमोरून नवजात बाळाचे अपहरण?; आईने उपसले उपोषणाचे हत्यार

। विठ्ठल महल्ले ।



**अकोला, दि. ५ :** बाळाच्या जन्मानंतरच्या आनंदाच्या क्षणांना दहशतीचे सावट! आईचे दूध पाजण्याचाही हक्क हिरावून घेत, नवजात बालकाला जबरदस्तीने आईपासून वेगळे केल्याची धक्कादायक घटना अकोल्यात समोर आली आहे. संपूर्ण प्रकरणात वैद्यकीय संस्था, पती, व पोलीस प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. बाळापासून जबरदस्तीने वेगळी करण्यात आलेली मेहरा बानो मोहम्मद शाकीब या पीडित महिलेने थेट अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात धाव घेतली असून, न्याय न मिळाल्यास उपोषण करण्याचा इशाराही दिला आहे.

मेहरा बानो या मूळच्या बाळापूर येथील महिला असून, त्यांचा विवाह मूर्तिजापुरातील मोहम्मद शाकीब मो. आशद यांच्याशी झाला आहे. काही महिन्यांपूर्वी गर्भवती असताना पतीने अत्याचार केल्याची तक्रार त्यांनी मूर्तिजापूर पोलीस स्टेशनमध्ये केली होती. त्यानंतर त्या माहेरी बाळापूर येथे राहत होत्या. २५ जुलै रोजी त्यांनी देवकी हॉस्पिटल येथे एका मुलाला जन्म दिला. काही वेळातच बाळाला निमोनियाची लागण झाल्यामुळे डॉ. पार्थसारथी शुक्ल यांच्या शुक्ल हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. तेथे उपचार चालू असताना मेहरा बानो स्वतः त्याच हॉस्पिटलमध्ये थांबून बाळाला आईचे दूध पाजत होत्या.

या दरम्यान पती मोहम्मद शाकीब हॉस्पिटलमध्ये येत होता; मात्र तो सातत्याने शिवीगाळ व धमक्या देत होता. ''बाळाजवळ उभी राहू नकोस'', ''दूध पाजू नकोस, मी पावडरचे दूध देईन'' अशा धमक्यांमुळे पीडित महिलेने रामदासपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती; पण दुर्दैवाने, पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही, अशी त्यांची तक्रार आहे. यानंतर ४ ऑगस्ट रोजी पीडित महिलेच्या माहितीनुसार, तिच्या संमतीशिवाय पतीने डॉ. पार्थसारथी शुक्ल यांच्या संगनमताने नवजात बालकाला जबरदस्तीने मूर्तिजापूर येथे नेले. याबाबतही तिने तक्रार दिली असली, तरी पोलिसांनी ती धुडकावून लावल्याचे आरोप आहेत. बालक आदलाबदल प्रकरणी डॉक्टर शुक्ल यांच्यावर काही वर्षांपूर्वी गंभीर आरोप झाले होते. प्रकरण खूप विकोपाला गेले होते. या प्रकरणाने पुन्हा त्या घटनेला उजाळा मिळतो की काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

❏ प्रथमदर्शनी हे प्रकरण पती-पत्नीतील वादातून उद्भवलेले दिसते. प्रसूतीनंतर उपचारासाठी बाळाला डॉ. पार्थसारथी शुक्ल यांच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान मातेची प्रकृती बिघडल्याने तिला अन्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि २८ जुलै रोजी तिला त्या रुग्णालयातून सुटीही मिळाली; परंतु ती आपल्या नवजात बाळाकडे परतली नाही. त्यामुळे डॉक्टरांनी सदर बालक त्याच्या वडिलांच्या ताब्यात दिले. मंगळवारी संबंधित महिला पोलीस ठाण्यात येऊन मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार दाखल करते. या प्रकरणी आम्ही दोघांचेही भ्रमणध्वनीवरून बोलणे करून दिले आणि हे प्रकरण सामंजस्याने सोडवावे, असा सल्ला दोघांनाही दिला.

**- शैलेष खंडारे**
पोलीस निरीक्षक, रामदासपेठ पोलीस ठाणे.

❏ बालकाला निमोनिया झाला होता. त्याच्यावर उपचार करून तो बरा झाल्यानंतर आम्ही त्याला सुटी दिली आणि त्याचे वडील त्याला घेऊन गेले. आमची भूमिका केवळ वैद्यकीय उपचारापुरती मर्यादित होती. संपूर्ण प्रकार पती-पत्नीमधील वादातून घडलेला असावा, असे मला वाटते.

**- डॉ. पार्थसारथी शुक्ल**, बालरोगतज्ज्ञ, अकोला.

### आईचे आरोग्य धोक्यात, बाळाच्या जीवाला धोका

सिजेरियन शस्त्रक्रियेमुळे आईला विश्रांतीची गरज असतानाही, बाळाला गमावल्याचा मानसिक आघात व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ती पूर्णपणे कोलमडली आहे. तिचे म्हणणे आहे की, 'आई व बाळ यांना विभक्त करता येत नाही. माझ्या बाळाला आईचे दूध गरजेचे आहे. त्याचा जीवही धोक्यात आहे.'

### विधी व न्यायव्यवस्थेच्या तरतुदींनुसार

वार्ड आणि गार्डियन कायद्यानुसार, ६ वर्षांखालील बाळाचा प्राथमिक ताबा हा आईकडेच असतो. तरीसुद्धा बाळ वडिलांना देण्यात आले. पोलीस व दवाखान्याच्या भूमिकेकडे लक्ष वेधले जात आहे.

### आईचा उपोषणाचा इशारा

या पार्श्वभूमीवर पीडित महिलेने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात लेखी निवेदन देऊन, ''माझे बाळ परत मिळेपर्यंत मी उपोषणाला बसणार'' असा इशारा दिला आहे.यासोबतच महिला व बालकल्याण समितीकडेही याच आशयाची तक्रार पीडित महिलेने दिली आहे.

### प्रशासन काय पावले उचलते?

हे संपूर्ण प्रकरण केवळ एका आईच्या भावनिक वेदनांचे प्रतीक नाही, तर कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी, महिला सुरक्षा, बालहक्क व आरोग्य व्यवस्थेतील गंभीर स्वरूपाच्या निष्काळजीपणाचेही द्योतक ठरत आहे. आता प्रशासन व पोलीस यंत्रणा यातून बोध घेऊन त्वरित योग्य ती कारवाई करणार का, हाच खरा प्रश्न आहे.

## एसएनसीयू घोटाळ्यानंतर जिल्हा रुग्णालयात नव्या प्रभाऱ्यांची नियुक्ती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ५ :** एसएनसीयू विभागातील ई-निविदा घोटाळ्यानंतर अकोला जिल्हा रुग्णालयाच्या प्रशासनात मोठा बदल करण्यात आला असून, आरोग्य विभागाने तातडीने नवे प्रभारी अधिकारी नेमले आहेत. पारदर्शकता आणि शिस्त सुनिश्चित करण्यासाठी डॉ. आरती कुलवाल, डॉ. वंदना पटोकार आणि डॉ. वाडेकर यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

जिल्हा स्त्री रुग्णालयातील एसएनसीयू (नवजात शिशू देखभाल युनिट) विभागासाठी कंत्राटी मनुष्यबळ पुरवठा करण्याच्या ई-निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप पुढे आल्यानंतर आरोग्य विभागाने तत्काळ हालचाली सुरू केल्या आहेत. प्राथमिक चौकशीत आरोप सिद्ध झाल्यानंतर तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना पदमुक्त करून निलंबित करण्यात आले आहे.

या प्रकरणामुळे जिल्हा रुग्णालय प्रशासनाची विश्वासार्हता आणि निविदा प्रक्रियेतील पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. यानंतर प्रशासकीय कार्यप्रणालीत शिस्त आणि पारदर्शकता आणण्यासाठी आरोग्य विभागाने नव्या प्रभाऱ्यांची नियुक्ती केली असल्याची माहिती आरोग्य उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी यांनी दिली. डॉ.भंडारी यांच्या माहितीनुसार, डॉ. आरती कुलवाल यांच्याकडे आता जिल्हा शल्यचिकित्सक पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. तसेच डॉ. वंदना पटोकार यांच्याकडे जिल्हा स्त्री रुग्णालय अधीक्षक पदाचा अतिरिक्त प्रभार देण्यात आला असून, डॉ. वाडेकर यांची प्रशासकीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

❏ नवजात शिशू विभागातील भरती प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेची गंभीर दखल घेण्यात आली आहे. दोषींवर त्वरित कारवाई केली असून, भविष्यात अशा प्रकाराला अजिबात वाव दिला जाणार नाही. पारदर्शक व प्रामाणिक प्रशासनासाठी नवीन प्रभारी नेमण्यात आले आहेत.
**- डॉ. कमलेश भंडारी,** आरोग्य उपसंचालक, अकोला परिमंडळ.

## जिल्हा परिषद प्रभाग रचनेवरील आक्षेपांवर सुनावणी

### १८ ऑगस्टपर्यंत अंतिम प्रभाग रचनेचा प्रस्ताव

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ५ :** जिल्हा परिषद व त्या अंतर्गत जिल्ह्यातील सात पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेवर मुदतीत दाखल करण्यात आलेल्या ३२ आक्षेप व हरकतींवर विभागीय आयुक्तांकडे मंगळवारी (ता.पाच) सुनावणी घेण्यात आली. यासंदर्भात लवकरच आदेश पारित करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या आगामी निवडणुकांसाठी जिल्हा परिषदेचे ५२ गट आणि त्या अंतर्गत जिल्ह्यातील सात पंचायत समित्यांच्या १०४ गणांच्या प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना गेल्या १४ जुलैला प्रसिद्ध करण्यात आली होती. या अधिसूचनेसंदर्भात आक्षेप व हरकती संबंधित तहसीलदारांकडे दाखल करण्याची मुदत २१ जुलैपर्यंत होती.

त्यानुसार विहित मुदतीत जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेवर जिल्ह्यात ३२ आक्षेप दाखल करण्यात आले असून, या आक्षेपांचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाने अमरावती विभागीय आयुक्तांकडे सुनावणीसाठी सादर केला होता. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेसंदर्भात दाखल झालेल्या आक्षेप, हरकतींवर अमरावती विभागीय आयुक्तांसमोर सुनावणी झाल्यानंतर अंतिम प्रभाग रचनेचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत येत्या १८ ऑगस्टपर्यंत राज्य निवडणूक आयोग किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार आहे.

## बनावट शिधापत्रिका आढळल्यास फौजदारी कारवाई

### जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचा इशारा; ऑफलाइन शिधापत्रिकांचे वितरण बंदच

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ५ :** त्रयस्थ व्यक्तीकडून काही नागरिकांना बनावट शिधापत्रिका दिल्याची तक्रार पुरवठा कार्यालयास मिळाली आहे. प्रत्यक्षात शासनाकडून २ वर्षांपासून ई-शिधापत्रिकांचे वितरण होत आहे. ऑफलाइन शिधापत्रिका वितरण बंद आहे. त्यामुळे अनधिकृत पत्रिका देऊन नागरिकांची फसवणूक करणाऱ्या किंवा बनावट पत्रिकांचा वापर करणाऱ्या व्यक्तींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी दिला आहे.

त्रयस्थांमार्फत मिळालेल्या बनावट शिधापत्रिकांचा विविध कामकाजाकरिता वापर होत असताना निदर्शनास आले आहे. प्रत्यक्षात सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये मागील दोन वर्षांपासून शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी सुरू आहे. ई-शिधापत्रिका वितरण करण्यात येत आहे.

प्राप्त तक्रारीनुसार अकोला जिल्ह्यातील सर्व नागरिकांना शिधापत्रिकांच्या विविध कामकाजाकरिता तालुकानिहाय पुरवठा शाखेमध्ये नियुक्त असलेल्या अधिकारी, कर्मचारी यांच्याशीच संपर्क करून आपले कामकाज पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन यन्नावार यांनी केले. त्रयस्थ व्यक्तीकडून या कार्यालयातून कोणतेही काम केले जात नाही. कोणताही नागरिक त्रयस्थ व्यक्तीकडून शिधापत्रिकांचे किंवा पुरवठा संबंधित कोणतेही कामकाज करून घेण्यासाठी कार्यालयात वावरताना किंवा आढळून आल्यास संबंधीतावर थेट फौजदारी गुन्हा नोंद करण्यात येईल.

त्रयस्थ व्यक्तीकडून शिधापत्रिकांचे कोणतेही काम करून घेऊ नये, तसेच त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्रे देऊन स्वत:ची फसवणूक होऊ नये. पुरवठा संबंधित कामकाजाकरिता नागरिकांनी अधिकृत केलेल्या अधिकारी, कर्मचारी यांच्याशीच कार्यालयात येऊन शिधापत्रिकांचे काम पूर्ण करून घेण्यात यावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी केले आहे.

## आरोग्यास लाभदायक ड्रॅगन फ्रूट बाजारात....



बुलडाणा येथील ड्रॅगन फ्रुट बाजारपेठेत विक्रीस आले असून, या ड्रॅगन फ्रुट खाण्याचे खूप फायदे आहेत, यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. पचन सुधारण्यासाठी तसेच हृदयासाठी चांगले मानले जाते. यासोबतच रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवते. हाडांची मजबुतीसुद्धा हे ड्रॅगन फ्रुट सेवन केल्याने होते व आरोग्यास लाभदायक आहे. (छाया. संजय ताथुरकर)

हळहळ

## पिंजर फाट्याजवळ अपघात; लाखनवाडा गावात पसरली शोककळा

# पिकअप व दुचाकीच्या भीषण धडकेत बापलेकांचा मृत्यू

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ५ :** मंगरुळपीर रोडवरील पिंजर फाट्याजवळ मंगळवारी दुपारी चार वाजता दरम्यान एक हृदयद्रावक अपघात घडला. भरधाव वेगात असलेल्या पिकअप वाहनाने दुचाकीस्वार बापलेकांना जोरदार धडक दिल्याने दोघांचाही जागीच मृत्यू झाला. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



या अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे उमेश रमेश शिरसाट (वय ३२) व त्यांचे वडील रमेश हरिभाऊ शिरसाट (वय ६०, दोघेही रा. समता नगर, लाखनवाडा, ता. व जि. अकोला) अशी आहेत. बापलेक काही खास कामासाठी दुचाकीवरून पिंजर फाट्याकडे जात असताना पाठीमागून आलेल्या भरधाव पिकअप वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोघेही दूर फेकले गेले आणि गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच बार्शीटाकळी पोलीस तत्काळ घटनास्थळी पोहोचले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने पोलिसांनी जखमी अवस्थेतील बापलेकांना बार्शीटाकळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवले; मात्र डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले.

ही घटना घडल्याची बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली असून, शिरसाट कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावात शोककळा पसरली असून, स्थानिक नागरिकांनी या अपघाताबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या मार्गावर याआधीही अनेक अपघात घडले असून, काही महिन्यांपूर्वी विटा वाहून नेणाऱ्या मिनी ट्रकच्या धडकेत एक दुचाकीस्वार जागीच ठार झाला होता, तर तिघेजण गंभीर जखमी झाले होते. अपघाताची ठिकाणे ही बार्शीटाकळी महान रोडवर दोनच फाट्यालगत असलेल्या शासकीय आयटीआयजवळ आहेत. बार्शीटाकळी पोलिसांनी अपघातग्रस्त पिकअप वाहनाचा शोध सुरू केला आहे. आरोपी वाहनचालकाविरोधात गुन्हा नोंदवून पुढील तपास बार्शीटाकळी पोलीस करीत आहेत. दरम्यान, या मार्गावरील वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. या अपघातामुळे लाखणवाडा परिसरात शोक पसरला आहे.

## जयहिंद चौकात अनधिकृत बॅनरवर कारवाई, पण अतिक्रमण विभाग आजवर गप्प का?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ५ :** शहरातील जयहिंद चौक परिसरात लावण्यात आलेल्या अनधिकृत बॅनरवर अकोला महानगरपालिका अतिक्रमण विभागाने मंगळवारी कारवाई केली. मनपा आयुक्त तथा प्रशासक यांच्या निर्देशानुसार पश्चिम झोनमध्ये ही कारवाई पार पडली; परंतु अशी कारवाई केवळ एका ठिकाणीच का, असा सवाल आता नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.



कारवाईत बिनापरवानगीचे राजकीय, सामाजिक आणि वाढदिवसांचे बॅनर काढण्यात आले. अनेकदा दादा, भाऊ किंवा स्थानिक नेत्यांचे फोटो असलेले हे पोस्टर शहराच्या सौंदर्यावर गदा आणतात. जयहिंद चौकासारख्या मध्यवर्ती ठिकाणी ही स्थिती असेल, तर शहरातील अन्य मुख्य रस्त्यांचे काय? नेकलेस रोडवरील काही अतिक्रमणांवरही कारवाई करण्यात आली, परंतु अशी तात्कालिक कारवाई म्हणजे लोकांचे लक्ष आहे म्हणून केल्याचे चित्र उभे राहिले आहे. याआधी अतिक्रमण विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी काय करत होते, असा सवाल उपस्थित केल्या जात आहे. अकोला शहरात शेकडो ठिकाणी अनधिकृत बॅनर, पोस्टर, बोर्ड दिवसरात्र लावले जात आहेत. मनपाकडे अतिक्रमण विभागासाठी स्वतंत्र मनुष्यबळ असताना, हे कर्मचारी नेमके कोणत्या आदेशाची वाट पाहत होते?असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. या कारवाईत सहाय्यक अतिक्रमण अधिकारी प्रवीण मिश्रा, चंद्रशेखर इंगळे यांच्यासह विभागातील कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. मात्र ही एकदिवसीय कारवाई पुरेशी नाही. अतिक्रमणांविरोधात नियमित, प्रभावी आणि सर्वदृष्टिकोनातून कारवाई झाली पाहिजे, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. महानगरपालिका आयुक्तांनी या प्रकरणाची दखल घेऊन अतिक्रमण विभागाला जाब विचारावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, बुधवार, दि.६ ऑगस्ट २०२५



## महत्वाचे

### आरोपातून निर्दोष मुक्तता

**खामगाव :** शेगाव शहर पोस्टे येथे २० फेब्रुवारी २१ रोजी आरोपी नागेश गावंडे याने एका मुलीस फुस लावुन पळून नेल्याची फिर्याद दाखल झाली होती. फिर्यादीवरून सदर आरोपीविरुध्द कलम ३६३, ३६६ भादंवि नुसार गुन्हा दाखल करून तपासाअंती दोषारोपपत्र तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालय खामगाव येथे दाखल केले होते. प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान एकुण ४ साक्षीदार तपासण्यात आले. तसेच दोन्ही पक्षाच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपींचे वकीलाचा युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपी नागेश गावंडे याची १ ऑगस्ट २५ रोजी निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ॲड. दिपक आर. साठे यांनी काम पाहिले.

### जय भवानी गणेशोत्सव मंडळाची कार्यकारिणी गठीत

**खामगाव :** स्थानिक चांदमारी भागातील जय भवानी व्यायाम शाळेमध्ये मंडळाची बैठक नुकतीच संपन्न झाली. यावेळी सर्वानुमते गणेशोत्सव कार्यकारिणी गठीत करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष सतिष गवळी, उपाध्यक्ष सुधाकर माने, सचिव शाम माळवंदे, कोषाध्यक्ष पंकज गमे, सदस्य विनोद बोराखडे, शंकर कडवकर, देविदास मुळे, आखाडा प्रमुख प्रितम माळवंदे, सह आखाडा प्रमुख पवन माळवंदे, हरीभाऊ गायकवाड, रुणसेवा समिती अध्यक्ष रमेश अवचार, डेकोरेशन समिती अध्यक्ष दत्ता सरोदे यांचा समावेश आहे. बैठकीला सुरज लोंढे, गोलु काकडे, आशिष घुमरे, ऋषीकेश सतिष गवळी तासतोडे, शत्रुघ्न माळवंदे, रवि माळवंदे, पवन गवळी, अमोल डमरे, राजु ठाकुर, सुरज खोसे, गणेश खरात, वैभव कांबळे, लखन तासतोडे, गणेश तासतोडे, लकी तासतोडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### गणेशपुरमध्ये दुचाकी जाळली

**शेगाव :** तालुक्यातील गणेशपुर येथील रहिवासी वतन छगनराव मांडवे (४०) यांनी काल ४ ऑगस्ट २५ रोजी रात्री १०.१५ वाजताच्या सुमारास घराचे बांधकाम सुरू असल्यामुळे घराच्या बाहेर दुचाकी क्र. एमएच-२८-बीएक्स-४८२२ (किं. १ लाख रू.) उभी केली होती. तर अंदाजे पहाटे ४ वा.च्या सुमारास काकाचा मुलगा बाबुलाल रामचंद्र बछीरे याने जोराने आवाज देऊन सांगितले की, तुमची दुचाकी जळत आहे. यावेळी वतन मांडवे व त्यांच्या पतीने घराबाहेर येऊन पाहिले असता, दुचाकी जळून खाक झाली होती. अज्ञात इसम ने जाळली असल्याचा संशय वतन मांडवे यांनी फिर्यादीत नमुद केला आहे.यामुळे गावत भितीची वातावरण आहे. याप्रकरणी वतन मांडवे यांनी आज ५ ऑगस्ट २५ रोजी हिवरखेड पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये अज्ञात इसमाविरूध्द कलम ३२६ (एफ) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकॉ. विठ्ठल चव्हाण करीत आहेत.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १५५० - २३१० |
| गहू | २०५० - २६५० |
| तुर | ४०५० - ६५८० |
| हरभरा | ५००० - ६५५० |
| सोयाबीन | ३६५० - ४८४० |
| तीळ. | ७८०० - ८४०० |
| उडीद. | ६३०० - ६५५० |
| मूंग. | ४४०० - ५८०० |
| भुईमूग. | ४५०० - ५४०० |
| मक्का. | २१५० - २१५० |

## बुलडाणा जिल्ह्यात 'एम-सॅण्ड' धोरणाची अंमलबजावणी

### पहिल्या ५० पात्र अर्जदारांना विविध शासकीय सवलती मिळणार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.५ :** महसूल व वन विभागाच्या २३ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार एम-सॅण्ड (कृत्रिम वाळू) धोरण निश्चित करण्यात आले असून शासन परिपत्रक दि १७ जुलै २०२५ नुसार शासनाने याबाबतची मानक कार्यप्रणाली निश्चित केली आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यात एम-सॅण्ड धोरणाची अंमलबजावणी सुरू असून जिल्ह्यातील पहिल्या ५० इच्छुक पात्र अर्जदारांना एम-सॅन्डबाबत विविध शासकीय सवलती देण्यात येणार आहेत.

एम-सॅण्ड युनिट स्थापनेसाठी मिळणाऱ्या प्रमुख सवलतीनुसार औद्योगिक मान्यता, अनुदान (उदा. औद्योगिक प्रोत्साहन, व्याज, वीज कर), मुद्रांक शुल्क माफी, रॉयल्टीमध्ये ४०० रुपये प्रति ब्रास सवलत देवून (२०० रु प्रतिब्रास दराची तरतुद), शासन किंवा निम शासकीय बांधकामांमध्ये सध्या एम-सॅन्डचा २० टक्के वापर बंधनकारक, टप्याटप्याने हे प्रमाण १००% एम-सॅण्ड वापर बंधनकारक. शासकीय जमिनीवर खाणपट्टा लिलाव पद्धतीने दिला जाणार असून, केवळ "१००% एम-सॅण्ड उत्पादक" असलेल्यांनाच पात्रता राहील. खाजगी जमिनीवर इच्छुक "१००% एम-सॅण्ड उत्पादक" अर्जदारांनी महाखनिज पोर्टलवर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. १५ दिवसांत अर्ज सादर करणेबाबत जिल्हा प्रशासनाने आवाहन केले आहे. पूर्वीचे खाणपट्टे जर "१००% एम-सॅण्ड उत्पादन" करणार असतील, तर त्यांनाही धोरणांतर्गत लाभघेता येणार.

प्रत्येक प्रकरणात प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सीटीई, नियोजन प्राधिकरणाचे नाहरकत प्रमाणपत्र, उद्योग आधार किंवा जिल्हा उद्योग केंद्राची नोंदणी, तसेच आवश्यक परवानग्या अनिवार्य राहतील.

युनिट सुरू करण्यासाठी ६ महिने अवैध उत्खनन वा वाहतूक प्रकरणात दोषी असलेल्यांना अर्ज करता येणार नाही. इच्छुक अर्जदार यांनी शासनाची मान्यता मिळाल्यानंतर युनिट सुरू करण्यासाठी ६ महिन्यांची कालमर्यादा बंधनकारक आहे. युनिट सुरू करण्याआधी प्रदुषण विभागाचे कंटेंट टू ऑपरेट घेणे बंधनकारक आहे.

**अर्ज कसा करायचा :** अर्ज करण्यासाठी संकेतस्थळावर जाऊन अप्लिकेशन हा पर्याय निवडुन त्यामधील एम सॅण्ड कन्सेशन अप्लिकेशनमधून अर्जाचा पर्याय निवडुन अर्ज करावा. **संपर्क कुठे करायचा :** एम-सॅण्डबाबत कोणतीही अडचण असल्यास गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी शासन निर्णय दि. २३ मे २०२५ आणि शासन परिपत्रक दि. १७ जुलै २०२५ यांचा संदर्भ घ्यावा. एम-सॅण्ड धोरणाच्या अनुषंगाने जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

## जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते उद्घाटन



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.५ :** येथील प्रशासकीय इमारत परिसरातील महात्मा गांधी सभागृह येथे आयोजित जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

ही रानभाजी महोत्सव कृषी विभाग, आत्मा प्रकल्प, रोटरी क्लब खामगाव, कृषी विज्ञान केंद्र जळगाव जामोद व जी एस कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटक आकाश फुंडकर यांनी, आजच्या पिढीला रानभाज्यांची जाण आहे. परंतु येणाऱ्या पिढींना रानभाज्याची ओळख व आवड निर्माण होईल याद्पुष्टीने कार्य करावे, अशी सूचना केली. यावेळी मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते रानभाजी महोत्सवात सहभागी झालेल्या शेतकरी व बचत गटांना प्रमाणपत्र आणि महसूल विभागाचे विविध प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात सहभागी बचत गट व शेतकरी बांधवांनी विविध रानभाजीचे प्रदर्शन करून त्याचे जीवनातील आयुर्वेदिक महत्व समजावून सांगण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात आत्माचे प्रकल्प संचालक पुरुषोत्तम उन्हाळे यांनी रानभाज्यांचे जीवनातील महत्व या विषयावर माहिती दिली. तसेच केंद्र व राज्य शासन नैसर्गिक शेती व अनेक योजना राबविण्यात येत असल्याची माहिती दिली.

यावेळी शेतकरी सदानंद इंगळे यांनी रानभाजीचे आरोग्य विषयक महत्व समजावून सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, आत्माचे प्रकल्प संचालक पुरुषोत्तम उन्हाळे व उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच आभार प्रदर्शन विभागीय कृषी अधिकारी यांनी केले.

## वंचित बहुजन आघाडीच्या तालुका प्रवक्त्यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.५ :** वंचित बहुजन आघाडीचे नामांकित तालुका प्रवक्ते मिलिंद कुमार मघाडे यांनी आज भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश केला. काँग्रेसचे बुलडाणा जिल्हा अध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांनी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या प्रवेश सोहळ्यावेळी काँग्रेस पक्षाचे तालुका व जिल्हा स्तरावरील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. मिलिंद मघाडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "सामाजिक न्याय, बंधुता आणि लोकशाही मूल्ये यांसाठी संघर्ष करणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या विचारसरणीशी मी एकरूप झालो आहे. राहुल बोंद्रे यांच्या कार्यपद्धतीने प्रभावित होऊन मी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहे." या प्रवेशामुळे तालुका आणि जिल्हा पातळीवरील काँग्रेस पक्षाचे बळ अधिक मजबूत होईल, असा विश्वास शहर काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सवडतकर यांनी व्यक्त केला आहे. यावेळी चिखली शहर काँग्रेस अध्यक्ष राहुल सवडतकर, माजी अध्यक्ष अतहर काझी, डॉक्टर मोहमद इसरार, प्रा. राजू गवई सर ,कुणाल बोंद्रे , प्राचार्य निलेश गावंडे सर, शहजात अली खान ,राजू रज्जाक ,डॉक्टर अम 'ेल लहाने, ॲड. विलास नन्हाई, जका भाई, खलिल बागवान ,भिकाजी शेटे, सचिन शेटे,जय बोंद्रे , अमोल लहाने ,विलास नन्नई, शोएब मुसा, गोकुळ शिंगणे, आरीफ बागवान, शकील भाई यांची उपस्थिती होती.

## विद्युत पुरवठा सुरळीत करा : ग्रामस्थांचे उपअभियंता यांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लोणार दि.५ :** लोणार तालुक्यातील गुंधा येथील वार्ड क्रमांक ३ मधील झोपडपट्टी परिसरातील विद्युत पुरवठा रात्रीचे ३ ते सकाळचे ११ वाजेपर्यंत नियमित बंद असतो. रात्री विद्युत पुरवठा बंद असल्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत असून सदरचा विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा यासाठी ग्राम स्थांच्या वतीने महावितरण कंपनीचे उपअभियंता यांना ४ ऑगस्ट रोजी निवेदन देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात सांगण्यात आले आहे की गावाकडील एका बाजूची लाईन चालू राहते व दुसऱ्या बाजूची लाईन रोज सकाळी ३ ते ११ वाजे पर्यंत बंद असते ह्या मुळे सकाळी म ुलांना अभ्यास करण्यात, तसेच शाळेत जाण्यासाठी , ऑफिस मध्ये जाण्यासाठी , ह्या सोबतच सकाळी ३ वाजता एकदम अंधार असतो. त्यामुळे सरपटनारे प्राणी जसे साप, विंचू, किंवा अंधारात काही अप्रिय घटना घडु शकते. ह्या सर्वला विद्युत विभाग जबाबदार राहील ह्या साठी या भागातील डी पी तावडतोब बदलून या भागाची लाईन पूर्ण वेळ चालू राहील याची व्यवस्था करून घ्यावी आशे निवेदन उपअभियंता याना देण्यात आले निवेदनावर गजानन बाजड, भगवान वाढवे,अनिल वाघमारे,श्याम चाटसे आदींच्या सह्या आहेत निवेदनाच्या प्रति त्यांनी मुखमंत्री, ऊर्जा मंत्री, नामदार प्रतापराव जाधव, आमदार खरात, यांना दिल्या आहेत.

## वैध मापन शास्त्र कार्यालयाचा मंगळवारी जनता दरबार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.५ :** वैध मापन शास्त्र कार्यालयीन प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, नागरिकांच्या अडचणी समजून घेणे व ग्राहकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करण्याच्या उद्देशाने उपनियंत्रक, वैध मापन शास्त्र, बुलढाणा कार्यालयाच्या वतीने जनता दरबार हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी जनता दरबार आयोजित करण्यात येणार आहे. या दरबारात नागरिकांना कार्यालयाशी संबंधित शंका, तक्रारी किंवा सूचना थेट मांडण्याची संधी मिळणार आहे. या जनता दरबाराची वेळ दुपारी १ ते २ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा आणि आपल्या अडचणी, शंका किंवा सूचना थेट कार्यालयात उपस्थित राहून मांडाव्यात, असे आवाहन उपनियंत्रक, वैध मापन शास्त्र, बुलढाणा यांनी केले आहे.

## दुसरबीड शिवारात शेतरस्त्याचा वाद चिघळला; शेतकऱ्यांचा उपोषणाचा इशारा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**सिंदखेड राजा दि.५ :** तालुक्यातील दुसरबीड गट क्रमांक ३७० मधून जाणारा जुना वहिवाटीचा रस्ता महसूल विभागाच्या आदेशानुसार खुला करण्यासाठी २९ जुलै रोजी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, आले मात्र काही शेतकऱ्यांनी जेसीबी समोर उभे राहत अडथळा निर्माण केला. या प्रकरणी सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल शेतकऱ्यांच्या विरोधात किनगाव राजा पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले. तर महसूल प्रशासनाच्या या अन्यायकारक कार्यवाहीच्या निषेध म्हणून शेतकऱ्यांनी ०५ अगस्ट पासून उपोषणाचा इशारा दिला आहे.

गट क्रमांक ३७० मधील अडवलेला रस्ता महसूल विभागाच्या आदेशानुसार खुला करण्यासाठी नायब तहसीलदार प्रांजल पवार व मंडळ अधिकारी गजानन मनसुटे ग्राम महसूल अधिकारी वसुदेव जायभाय हे पोलीस बंदोबस्तात ठाणेदार विनोद नरवाडे बीट जमादार जमादार विष्णू मुंडे सह अधिकारी व कर्मचाऱ्यासोबत हा शेत रस्ता खुला करण्यासाठी आले होते. दरम्यान काही शेतकऱ्यांनी जेसीबी अडून सरकारी कामात अडथळा निर्माण केला यावरून ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किनगाव राजा पोलिसात पुन्हा दाखल करण्यात आला तर शेतकरी काशिनाथ जगदाळे,अंबादास जगदाळे, परमेश्वर जगदाळे,कृष्णा जगदाळे व अन्य शेतकऱ्यांनी या कार्यावर आक्षेप घेत महसूल अधिकाऱ्यांनी कोणतीही पूर्व सूचना न देता रस्ता तुला करण्याचा प्रयत केल्याचा आरोप केला आहे.

## जुगारावर पोलिसांचा छापा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.५ :** प्लॉटमध्ये एका घरात ताशपत्ता सुरु असल्याची माहिती शहर पोलिसांना मिळताच पोलिसांनी सुरु असलेल्या ताशपत्त्यावर छापा टाकला असता ८ जणांना पकडले. ही कारवाई ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी केली. अशोक गोकुळ परदेशी यांच्या घरात अन्य ७ जणांसह ताशपत्ता खेळताना अनु खललीखाऊ गंगा खललीखाऊ (५०) रा. सजनपुरी, सुरज हिरामन बोरकर (३८) रा. खदान खामगाव, शेखमुश्ताक शेख गनी (६२) रा. बर्डेप्लॉट खाम गाव, घनशाम माणिकलाल भूतडा (५४) रा. जलालपुरा खामगाव, शंकर सुगदेव चव्हाण (४६) रा. गायगाव ता. शेगाव, नागेश दिपक हेलोडे (४०) रा. दाळफैल खामगाव, गणेश उत्तम कवडे (४५) रा. पातोंडा ता. खामगाव हे आठही जण एक्का बादशा नावाचा जुगाराचा डाव खेळताना मिळून आले. त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल,

## महास्वराज समाधान शिबिरातून जनतेच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न: तहसीलदार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**देऊळगाव साकर्शा दि.५ :** शासनाच्या विविध योजनांपासून दूर राहिलेल्या नागरिकांना थेट लाभ देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज समाधान शिबिरास देऊळगाव साखरशा येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात रेशन कार्ड, पीएम किसान, निराधार योजनेसारख्या योजनांवरील तक्रारींचा मोठा ढीग पाहायला मिळाला.

महास्वराज शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून तहसीलदार निलेश मडके बोलत होते. ते म्हणाले, "प्रत्येक व्यक्तीसाठी तालुक्याच्या ठिकाणी वारंवार येणे शक्य नसते. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांपासून अनेक गरजू वंचित राहतात. ही अडचण ओळखून शासनाकडून ग्रामस्तरावरच महास्वराज समाधान शिबिरांचे आयोजन केले जात आहे. याद्वारे जनतेच्या अडचणी तत्काळ सोडवण्याचा प्रयत्न केला जातो."

तक्रारींचा निपटारा, आधार केंद्राची घोषणा शिबिरादरम्यान तहसीलदार मडकेंनी अनेक नागरिकांच्या तक्रारी जागेवरच निकाली काढल्या. तसेच, आधार कार्ड संदर्भातील अडचणी लक्षात घेता देऊळगाव साखरशा येथे पुढील १५ दिवसांत नवीन आधार केंद्र सुरू करण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. ग्रामपंचायत सरपंच संदीप अल्हाट यांनी यासंदर्भात मागणी केली होती. कार्यक्रमाला मान्यवरांची उपस्थिती शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच संदीप अल्हाट, श्री सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राम दास धामोडकर, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देशमुख, ज्येष्ठ पत्रकार बाळू वानखडे, मंडळ अधिकारी बालाजी अनमोड, शिक्षक पुरुषोत्तम चवरे, माजी तंटामुक्त अध्यक्ष बी.एम. राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. योजनांची माहिती, लाभार्थ्यांना दाखल्यांचे वाटप सहाय्यक कृषी अधिकारी पी.एस. अंभोरे यांनी कृषी विभागाच्या योजनांची माहिती दिली. तसेच काही लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व यशस्वी आयोजन कार्यक्रमाचे ग्राम महसूल अधिकारी प्रमोद दांदळे यांनी केले. यावेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोहन पाटील धोटे यांच्यासारख्या माणसात विकासाची तळमळ- पुरुषोत्तम महाराज

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**जानेफळ दि.५ :** मेहकर मतदार संघाचे माजी आमदार डॉ.संजय रायमुलकर आणि युवाने तथा उद्योजक मोहन पाटील धोटे यांच्या सारख्या म णसात विकासाची तळमळ आहे. काहीतरी वेगळं करण्याची धडपड आहे. परंतु आपण जनता म णसं ओळखण्यात चुकला आहात अशी माणसं व लोकप्रतिनिधी फार कमी असतात अशा लोकांची पारख करुन त्यांच्या पाठीशी उभे राहा असे आवाहन प्रसिद्ध किर्तनकार पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी आपल्या कीर्तनातून बोलतांना केले आहे.

जानेफळ येथे सोमवार दि.४ ऑगस्ट रोजी जिवन धोटे पाटील, मोहन धोटे पाटील व मा.आ.डॉ.संजय रायमुलकर यांच्या वाढदिवसानिमित्त विदर्भ समृद्धी कृषी प्रोड्युसर कंपनीच्या प्रांगणात भव्य कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित कार्यक्रमात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आ.डॉ.संजय रायम ुलकर, जिल्हा युवा सेना प्रमुख ऋषीभाऊ जाधव, खामगाव अर्बन बँकेचे उपाध्यक्ष डॉ.सतीश कुलकर्णी, आंबेटाकळी येथील सरपंच सुधाकर घोटे पाटील, युवा सेना तालुकाप्रमुख भूषण घोडे, तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष विशाल जवंजाळ, माधवराव आरसोडे, डॉ.धनराज राठी, किशोर गव्हाड पाटील, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे पश्चिम विदर्भ समन्वयक अमर राऊत, संतोष तोंडे, नामदेव काळे,गजानन वडणकर, गजानन गवई सर, सुरेश आडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. पुरुषोत्तम महाराज पाटील पुढे आणखी बोलतांना म्हणाले की, डॉ. संजय रायमुलकर हा माणूस तुमच्या आमच्या मनातील आमदार होता आहे आणि पुढे सुद्धा राहील. त्यांनी आपल्या पदाचा कधी गर्व दाखविला नाही गेल्या १५ वर्षात मतदार संघात विकासाची कामे खेचून आणली आणि प्रत्येक गावाचा विकास केला परंतु आपण त्याची मात्र कदर केली नाही. मोहन धोटे पाटील सारख्या तरुण तडफदार युवा उद्योजक माणसाने अंबिका अर्बन सारखी पतसंस्था सुरू करून पत वाढवली, शेतकऱ्यांच्या सोयीसाठी विदर्भ कृषी समृद्धी प्रोड्युसर कंपनी सुरू करीत व्यापा-यांकडून शेतकऱ्यांचे शेतमाल कमी भावात खरेदी केल्या जात होता म्हणून नाफेड अंतर्गत शासकीय हमीभावाने खरेदी केंद्र सुरू केले, हळद प्रक्रिया केंद्र मंजूर करुन आणले तसेच अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे अशा माणसांच्या पाठीशी उभे राहून त्यांना सेवेची संधी दिली पाहिजे असेही शेवटी त्यांनी सांगितले.

प्रारंभी मोठ्या पुष्पहाराने मा.आ. डॉ.संजय रायमुलकर,जिवन पाटील धोटे,मोहन पाटील धोटे या तिघांचा सत्कार करण्यात आला तसेच उपस्थित इतर मान्यवरांचा सुद्धा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विदर्भ समृद्धी कृषी प्रोड्युसर कंपनी, समृद्धी ॲग्रो, अंबिका महिला अर्बन परीवार,मोहन धोटे मित्र मंडळ, सर्व शिवसेना- भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ. कृष्णा हावरे यांनी केले तर आभार पंडित धोटे पाटील यांनी मानले.

## महत्वाचे

### पर्समधून रोख रक्कमेसह सोन्याची पोथ लंपास

**खामगाव :** बसमध्ये चढताना एका महिलेच्या पर्समधून रोख रक्कम व सोन्याची पोथ असा एकूण ६१ हजाराचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना ४ ऑगस्ट रोजी खामगाव बसस्थानकावर घडली. सौ. अनिता रमेश झुंझारकर (५०) रा. नंधाना ता. रिसोड जि. वाशीम ही महिला तिच्या मुलासह शेगाव मेहकर बसमध्ये चढत असताना तिच्या जवळील असलेली पर्समधून कोणीतरी अज्ञात चोरट्याने नगदी ४ हजार रुपये व १५ ग्रॅम सोन्याच्या गोमन्याची पोथ किंमत ४५ हजार तसेच ४ ग्रॅम सोन्याचे डोरले असा एकूण ६१ हजाराचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेला शहर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३०३ (२) बीएनएसनुसार गुन्हा दाखल केला. तपास पोहेकाँ संतोष इटमल्लु करीत आहे.

### वीज चोरी प्रकरणी गुन्हा दाखल

**खामगाव :** विद्युत मिटरमध्ये छेडछाड करुन वीज चोरी केल्याप्रकरणी शिवाजी नगर पोलिसांनी अतिरिक्त कार्यकारी अभियंता महावितरण यांच्या तक्रारीवरुन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. सजनपुरी आनंदनगर स्थित मोहम्मद युनुस अतामोहम्मद (४०) यांच्या हिंदुस्थान प्लास्टीकमधील विद्युत मिटरमध्ये छेडछाड करुन ३३ हजार ५१५ युनीटची वीज चोरी केल्याचे उघडकीस आले होते. त्यामुळे ७ लाख ८४ हजार ५४० रुपये तडजोडपोटी २ लाख ३० हजार रुपये असे एकूण १० लाख १४ हजार ५४० रुपयाचा भरणा केला नाही. त्यामुळे महावितरणचे श्रीकांत तळेगावकर भरारी पथक अमरावी यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला.

### घरावर दगडफेक करणाऱ्यांवर गुन्हा

**खामगाव :** दगडफेक करुन घरात प्रवेश करुन महिलेची छेड काढल्याप्रकरणी चौघांविरुध्द खामगाव शिवाजी नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. शहरातील ३२ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की ३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास आवाज येत असल्याने खिडकीतून डोकावून पाहिले. त्यावेळी आतीक फैजान शेख रफीक, शेख शाकीर शेख बब्बू, शेख बबलू शेख बब्बू, सैय्यद अन्वर सैय्यद अन्नु या चौघांनी संगनमत करुन सदर महिलेच्या घरावर दगडफेक केल्याचे दिसून आले. त्यामुळे सदर महिलेने घराचा दरवाजा उघडला असता सदर आरोपींनी चौघांविरुध्द गुन्हा घरात प्रवेश करुन विवाहितेचे कपडे फाडून छेड काढली. अशा तक्रारीवरुन आरोपी आतीक फैजान शेख रफीक, शेख शाकीर शेख बब्बू, शेख बबलू शेख बब्बू सर्व रा. फाटकपुरा खामगाव, तर सैय्यद अन्वर सैय्यद अन्नु रा. बैलजोडी जुनेगाव अकोला या चौघांविरुध्द कलम ३२३, ७४, ११८ (२) ११५, २ ३५२, ३५१ (२), ३ (५) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे.

### विमलबाई ठाकरे यांचे निधन

**खामगाव :** वाडी येथील प्रतिष्ठित नागरिक तथा मासिक ज्ञानगंगा घरोघरीचे संपादक सुधाकर नारायण ठाकरे यांच्या मातोश्री गं.भा. विमलबाई नारायण ठाकरे (७६) यांचे आज दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३.१५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीचा कार्यक्रम उद्या दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता ठेवण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुलगी सुना नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. मृतात्म्यास चीरशांती प्रदान करो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

## रखडलेला पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने रास्ता-रोको

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि. ५ :** तालुक्यातील जानोरी माटरगाव सर्कल सह अनेक गावही खानपान पट्ट्यात येतात तसेच पावसाच्या कम तरतेमुळे नद्यांना सुद्धा शुद्धपाणी नसल्याने या भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे करिता या भागातील गावामध्ये ४० गाव योजनेअंतर्गत पाणीपुरवठा करण्यासाठी गावा गावामध्ये पाईपलाईन सुद्धा टाकण्यात आलेल्या आहेत मात्र हे पाणी अद्याप पर्यंत चालू झाले नसल्याने पिण्याच्या पाण्याअभावी हाल अपेष्टा सोसत असलेल्या नागरिकांनी आक्रमक होऊन आज दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी भोनगाव फाटा येथे रास्ता रोको आंदोलन केले.

सदर आंदोलनात आंदोलकांनी वान धरणाचे पाणी गावामध्ये लवकरात लवकर चालू करण्यात ही मागणी येथील आंदोलन करीत होते. जानोरी माटरगाव जिल्हा परिषद सर्कल मधील सर्व गावानमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे संतप्त ग्राम स्थांनी आज सकाळी ११ वाजता भोनगाव फाटा येथे मुख्य रस्त्याावर रस्ता रोको आंदोलन केले. सदर रास्ता रोको आंदोलन हे समाजसेविका नंदाताई पाऊलझगडे यांच्या नेतृत्वात करण्यात आले. आंदोलकांनी रस्त्यावर ठिय्या दिला व जोरदार घोषणाबाजी केली. ''पाणी आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं!'', ''आमच्या घरात नाही पाणी घागर उताणी रे देवेंद्रा'' अशा घोषणा देत त्यांनी वाहतूक काही तास ठप्प केली. या गावांमध्ये पाण्याची समस्या सुटता सुटेना अशी झाली आहे. आता पर्यंत आश्वासने खूप मिळाली आहेत.




पाणी अजून मिळाले नाही महिलांना दररोज पाणी विकत घ्यावे लागते यामुळे महिलांना व वृद्धांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. घटनेची माहिती मिळताच जिल्हा परिषद पाणी पुरवठा उप अभियंता शेगाव व जीवन प्राधिकारन उप अभियंता खामगाव व पोलीस निरीक्षकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून डिसेंबर पर्यंत पाणी पुरवठा सुरु करण्यात येईल लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. आंदोलन कर्त्यांनी जर वेळेत पाणीपुरवठा सुरू झाला नाही,

तर पुढील आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला या वेळी सौं नंदा ताई पाउलझगडे यांच्या सह विनोद भटकर, आकाश पाचळे, शंकर धोटे, हरिदास भिवटे, शिरू गटमने, गजानन देशमुख, बाळू पिसे, सुकेशनि इंगळे, वर्षा भटकर, आशा रोजतकार सह अनेक नागरिक उपस्थित होते

## सैनिकाच्या विधवा आईचा जिल्हाअधिकारी कार्यालयसमोर आत्मदहण करण्याचा इशारा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**डोणगाव दि.५ :** मेहकर तालुक्यातील आंध्रूड गावातील देशसेवेतील सैनिकाच्या आईने थेट जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला असून, त्यांच्या कुटुंबावर अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप करत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

श्रीमती शेवंताबाई बनसोडे या त्यांच्या चार मुलांसह आंध्रूड येथे वास्तव्यास आहेत. त्यांचा एक मुलगा देशसेवेत कार्यरत असून, मोठा मुलगा गोविंद बनसोडे हा शेतमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. २०१२ पासून गोविंद बनसोडे यांनी एफ-क्लास प्रकारातील महसूल विभागाच्या खुल्या जागेवर पत्र्याची कॅबिन उभारून वास्तव्यास सुरुवात केली होती. मात्र, गावातील ग्रामपंचायत सदस्य पंजाब माणिक देशमुख यांनी त्याच खुल्या जागेवर श्री विठ्ठल ट्रेडर्स या नावाने व्यवसाय सुरू केला. जागा अपुरी पडत असल्यामुळे, दिनांक ४ जून २०२५ रोजी देशमुख यांनी बनसोडे कुटुंबाला दम दाटी करून त्यांची तारजाळी, अँगल हटवून जबरदस्तीने जागा बळकावली, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या अन्यायाविरोधात गोविंदचा भाऊ मंगेश बनसोडे याने १० जून रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन केले. मात्र, यानंतरच्या दुसऱ्याच दिवशी ग्रामपंचायत सदस्य देशमुख यांनी बनसोडे कुटुंबावर वाद घालत गुन्हे दाखल करून मानसिक त्रास दिल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या सर्व प्रकाराला कंटाळून आणि न्याय न मिळाल्याने श्रीमती शेवंताबाई बनसोडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन सादर करत खालील मागण्या केल्या आहेत: गोविंद बनसोडे यांनी अतिक्रमण केलेली जागा आणि पंजाब देशमुख यांनी बळकावलेली जागा महसूल विभागाने तातडीने जमीनदोस्त करावी. ग्रामपंचायत सदस्य पंजाब देशमुख यांचे सदस्य त्वरित रद्द करावे. त्यांच्या नातेवाईकांच्या नावे असलेली अतिक्रमण जागा महसूल विभागाने ताब्यात घेऊन सिल करावी. ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी आणि तलाठी यांच्या देखरेखीखाली या प्रकरणावर कारवाई व्हावी. या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास, येत्याा १५ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचा इशारा देशसेवेतील सैनिकाच्या आई शेवंताबाई बनसोडे यांनी दिला आहे. सैनिक सिमेवर लढुन आल्या देशाचे रक्षण करतात आणी देशात सैनिकांच्या आईला न्याय मिळवीण्यासाठी आत्मदहनाचा इशारा देण्यापर्यंत वेळ येत असरेल तर ही बाब प्रशासनाने निश्चितच गांभिर्याने घेणे गरजेचे आहे.

## कावडयात्रेत दुचाकी शिरली; एक ठार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.५ :** भरधाव दुचाकी कावड यात्रेत घुसल्याने एक जण ठार, तर चार जण जखमी झाल्याची घटना तालुक्यातील पळसखेड-पाडळी या दरम्यान सोमवारी ४ ऑगस्ट रोजी घडली. अजिंठा मार्गावरील पाडळी आणि पळसखेडच्या मध्ये ४ आगस्ट रोजी एका भरधाव मोटरसायकल एक आवडधाऱ्यांना उडवले. या भीषण अपघातामध्ये ठार झालेल्या भाविकाचे नाव मुकेश गजानन राठोड (२५) असून तो गुळ भेली येथील रहिवासी आहे. कावड यात्रेतील आणखी दोघेजण गंभीर जखमी झालेले आहेत तर मोटरसायकल वरील दोघांनाही जबर मार लागलेला आहे. गुळ भेली येथील ग्रामसेवक नागापुरे यांच्या पुढाकारातून नव्याने शिवमंदिर बांधण्यात आले आहे. रविवारी संध्याकाळी ७ वाजताच्या सुमारास गुळ भेली येथून पहिल्यांदाच बुलढाणा तालुक्यातील बुधनेश्वरला कावड यात्रा निघाली. जवळपास ४० पेक्षा अधिक तरुण या कावड यात्रेत सहभागी होते. बुद्धनेश्वरला पोहोचल्यानंतर रात्री १२ वाजताच्या दरम्यान आरती करण्यात आली. त्यानंतर श्रावण सोमवार सुरू झाल्यामुळे कावड यात्रा परतीसाठी रवाना झाली.

## विद्यार्थी गुणवत्ता कामकाज प्रथम प्राधान्याने करा:शिक्षणाधिकारी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.५ :** शैक्षणिक गुणवत्तेचे संदर्भात शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही आपली सर्वांची जबाबदारी असुन यासाठी शिक्षकांना कामाला लावुन विद्यार्थी सुरक्षा आणि विद्यार्थी गुणवत्ता कामकाज प्रथम प्राधान्याने करा, असे अवाहन शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी जिल्हा परिषद शाळेमधील गुणवत्ता सुधारणा करण्यासाठी हाती घेतलेल्या कार्यक्रमानुसार ३० जुलै रोजी येथील पंचायत समिती अंतर्गत सरस्वती महाविद्यालयात विद्यार्थी सुरक्षा व शैक्षणिक गुणवत्ता कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. कार्यशाळेला तालुक्यातील सर्व माध्यमाचे व व्यवस्थापनाचे मुख्याध्यापक उपस्थित होते. कार्यशाळेस उदघाटक तथा प्रमुख



मार्गदर्शक म्हणून प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील उपस्थित होते.
कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी गट विकास अधिकारी चंदनसिंग राजपुत हे होते. तर डॉ. समाधान डुकरे उपस्थित होते. त्यानंतर गट विकास अधिकारी राजपुत यांनी विद्यार्थ्यांचे गुणवत्तेबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गट शिक्षणाधिकारी संजय सुरडकर यांनी तर आभार प्रदर्शन रमेश वानखडे यांनी केले.

## नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याच्या मागणीसाठी निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि.५ :** तालुक्यातील मौजे कोथर्का हे लोकसंख्येच्या दृष्टीने मोठी ग्रामपंचायत म्हणून नाप्रीचीत आहे. येथे नवीन पशुवैद्यकीय दवाखाना सुरू करण्यात यावा या मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. मौजे कोथळी व परिसरातील शेतकऱ्यांचा पशुपालन हा शेती व्यवसाया बरोबर मुख्य व्यवसाय आहे. येथे गुराढोरांची संख्या सुद्धा गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. परंतु दवाखान्याची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे पशु पालकांना मोठ्या अडचणीना सामोरे जावे लागत आहे. जनावराना वेळेवर उपचार न मिळाल्याने आर्थिक नुकसान होत असून शेतकऱ्यांचे हाल होत आहे. पशुपालकांची गरज लक्षात घेता लवकरात लवकर मौजे कोथळी येथे नवीन पशुवैद्यकीय दवाखाना सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आलेली आहे. इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## दुसऱ्या जिल्हा अधिवेशनाला उत्स्फुर्त प्रतिसाद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.५ :** सिटू संलग्न लाल बावटा शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे दुसरे जिल्हा अधिवेशन रविवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी चिखली येथे मौनी बाबा मठाच्या सभागृहात संघटनेचे जिल्हा अध्यक्ष कॉम्रेड पंजाबराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य उपाध्यक्ष प्रा.डॉ. संतोष आंबेकर




यांनी केले तर या अधिवेशनाला शालेय पोषण आहार कामगार फेडरेशनचे राज्य महासचिव कॉम्रेड डॉ. अशोक थोरात हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना कॉम्रेड थोरात यांनी शालेय पोषण आहार कामगारांच्या मानधन वाढीबाबत सरकार प्रचंड उदासीन आहे. निवडणुकीपूर्वी तत्कालीन मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत घेतलेला एक हजार रुपये मानधन वाढीचा निर्णय नव्याने तेच सरकार सत्तेवर आल्यावर त्याला विसर पडलेला आहे. सरकारने तातडीने आपण घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी. अन्यथा सीटूच्या नेतृत्वात राज्यभर लवकरच एक मोठे आंदोलन सरकारच्या उदासीन धोरणा विरोधात पुकारण्यात येईल असा इशारा यावेळी कॉ थोरात यांनी सरकारला दिला.या अधिवेशनाच्या प्रसंगी इंटक कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा नव्याने काँग्रेस पक्षाच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल लक्ष्मणराव घुमरे यांचाही याप्रसंगी संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## नवीन दुय्यम निबंधक कार्यालयाचे उद्घाटन व वृक्षारोपण सोहळा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापुर दि.५ :** येथे नुकतेच दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्धाटन थाटात पार पडले. या उद्घाटन सोहळ्याला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून मलकापूरचे आमदार चेंनसुख संचेती, जिल्हा निबंध तथा मुद्रक अधिकारी तथा जिल्हाधिकारी बुलढाणा माननीय संजय ठाकरे, तहसीलदार राहुल तायडे, व दुय्यम निबंधक काळे साहेब यांच्यासह जिल्ह्यातील



सर्व दुय्यम निबंधक आणि गावातील मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात कार्यालयाच्या उद्घाटनानंतर वृक्षरोपणाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मान्यवरांच्या हस्ते परिसरात विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी नवीन कार्यालयामुळे नागरिकांना नोंदणीशी संबंधित सेवा अधिक जलद व प्रभावीपणे मिळतील, असे मत व्यक्त केले. तसेच पर्यावरण रक्षणाचे महत्व अधोरेखित करत सर्वांना झाडे लावण्याचे आवाहन केले.

## राज्यस्तरीय ग्रामरत्न सरपंच पुरस्कार पळशी झाशी येथील सरपंच प्रियंका राहुल मेटांगे यांना प्रदान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपुर दि.५ :** लोणावळा येथे अखिल भारतीय सरपंच परिषद व जयंतराव पाटील मित्रमंडळ, कुर्डू यांच्या संयुक्तविद्यमाने ग्रामरत सरपंच पुरस्कार सोहळा २९ जुलै २०२५ आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्यात लोणावळा येथे अखिल भारतीय सरपंच परिषद द्वारा आयोजित ग्रामरत सरपंच पुरस्कार संग्रामपूर तालुक्यातील पळशी झाशी येथील सरपंच सौ प्रियंका राहुल मेटांगे यांना प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, यशदाचे माजी महासंचालक तथा माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी,प्रसिद्ध इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे, अखिल भारतीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील,उपाध्यक्ष शशिकांत मोरे, अ.भा.सरपंच परिषद राज्य कार्यकारिणी सदस्य संजय कांबळे, अ.भा.सरपंच




परिषद पुणे महिला जिल्हाप्रमुख उज्वला गोकुळे,अ.भा. सरपंच परिषद उत्तर पुणे जिल्हा प्रमुख बापूसाहेब काळे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. पुरस्कार मिळाल्यानंतर सरपंच सौ प्रियंका मेटांगे यांनी आयोजकांचे आभार मानताना मिळालेला पुरस्कार हा गावकरी व नेहमी सहकार्य करणारे, सचिव हेमंत बापू देशमुख, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, नेहमी सहकार्य करणारी मित्र मंडळी, शाळेमधील सर्व सहकारी, व सर्व गावकरी मंडळी नेहमीच प्रसिद्धी देऊन सहकार्य करणारे तालुक्यातील पत्रकार मंडळी , यांच्या सहकार्यामुळेच मिळाला असे सांगितले आपल्या कामाच्या भरोशावर यापूर्वीही सरपंच सौ. प्रियंका राहुल मेटांगे यांना राज्यस्तरीय कृषी माऊली पुरस्कार नाशिक येथे मिळाला आहे, तसेच लोकमतचा लोकमत अवार्ड जिल्हास्तरीय पुरस्कार सुद्धा प्राप्त झाला आहे, त्याप्रमाणेच गावकऱ्यांनी सुद्धा जवळपास २० ठिकाणी सरपंचांचे शाल श्रीफळ साडी देऊन सत्कार केले आहेत हे विशेष.

## महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.५ :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजास्व समाधान शिबिर महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित महसूल सप्ताह अंतर्गत दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी खामगाव तालुक्यातील वर्णा गावात महाराणा प्रताप सभागृह येथे छत्रपती शिवाजी महाराज हाराजस्व समाधान शिबिर तसेच 'शासन आपल्या दारी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्णा गावच्या सरपंच स्वाती उमेश इंगळे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी व नायब तहसिलदार निखिल पाटील उपस्थित होते.

सदर शिबिरात महसूल विभागामार्फत सातबारा, आठ अ फेरफाराचे एकूण ३८ दाखले वितरित करण्यात आले. तसेच संजय गांधी व श्रावण बाळ योजनेचे एकूण २२ आदेश लाभार्थ्यांना प्रदान करण्यात आले. संजय गांधी योजनेंतर्गत ७




नवीन अर्ज स्वीकारण्यात आले. आधार कार्ड अद्ययावतीकरण व ई-केवायसी सेवा अंतर्गत ३१ लाभार्थ्यांना सेवा पुरविण्यात आली. जिवंत ७/१२ प्रमाणपत्रासाठी ८ अर्ज स्वीकृत करण्यात आले, तर उत्पन्न प्रमाणपत्र व इतर दाखले यासाठी १६ लाभार्थ्यांना सेवा दिली गेली. कृषी विभागामार्फत काळेगाव येथील दोन शेतकऱ्यांना कांदा चाळ मंजुरी आदेश देण्यात आले, सहा शेतकऱ्यांना फळबाग लागवड मंजुरी पत्र तर वर्णा येथील चार शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजना मंजूर करण्यात आली. हुमणी अळी नियंत्रणाबाबत ग्राम कृषी अधिकारी सौ. जाधव यांनी लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी ग्राम महसूल अधिकारी अनिल शिंदे काळेगाव यांनी यशस्वीरित्या पार पाडली, तर प्रास्ताविक ग्राम महसूल अधिकारी कुमारी स्वाती वाडेकर यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने लाभार्थी व ग्रामस्थांनी उपस्थिती लावली. या कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांना महसुली वर्ष २०२४-२५ मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा मार्फत देण्यात आलेल्या 'उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने नागरिक सत्कार करण्यात आला. तसेच 'राजीव गांधी गतिमानता पुरस्कार' प्राप्त नायब तहसिलदार निखिल पाटील यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांमध्ये मंडळ अधिकारी रामदास चौधरी, पोलीस पाटील सुरेंद्र प्रतापसिंग इंगळे, तंटामुक्ती अध्यक्ष चंदू इंगळे, तालुका अध्यक्ष महादेव अवचार, माजी उपसभापती भगवानसिंग सोलंके, कृषी तंत्र अधिकारी विजय कंदील यांच्यासह महसूल व कृषी विभागातील विविध अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्राम महसूल अधिकारी पी. बी. वंजारी ढोरपगाव, ज्ञानेश्वर नागरे भालेगाव, अनिल शिंदे काळेगाव, कुमारी स्नेहा वाडेकर हिवरा बुद्रुक, कुमारी पल्लवी खंडारे नांद्री, व ग्राम महसूल अधिकारी टेकाळे मॅडम वर्णा यांचे योगदान उल्लेखनीय ठरले.

अजिंक्य भारत

# आपलं अकोला/वाशिम

अकोला, बुधवार, दि.६ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com



**महत्त्वाचे**

## हिवरखेड येथे नागपंचमीनिमित्त महाप्रसाद



**हिवरखेड :** येथील मराठानगर येथे भवानीच्या मंदिरामध्ये नागपंचमीनिमित्त ज्वारीची भाकरी व उडदाचे मिसळचे वरण अश्या ७ क्विंटल महाप्रसाद वितरणकरण्यात आले. मराठानगर भाटे मंडळ व समस्त मराठा नगरवाशी युवा कार्यकर्ते यांनी या भंडाऱ्याचे आयोजन केले होते. सर्व गावकरी मिळून या महाप्रसादाला सहकार्य दरवर्षीप्रमाणे करतात. नागपंचमी झाली की दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी नागपंचमीच्या निमित्त महाप्रसाद वितरण केले जाते. हिवरखेड शहरामध्ये जवारीच्या भाकरीचा भंडारा हा भवानीच्या कृपेने मराठानगरमध्ये सर्वात मोठा असतो. यावर्षी हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## देवरी येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न



**देवरी :** अकोट तालुक्यामध्ये वृक्षारोपणाचे कार्यक्रम जोर धरत आहेत सामाजिक वनीकरण विभाग आकोटच्या माध्यमातून नवयुग विद्यालय देवरी येथे दिनांक २ ऑगस्ट २५ ऑगस्ट महाराष्ट्र भरलागवड दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण रोपणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नवयुग विद्यालय देवरीचे मुख्याध्यापक सोनवणे हे होते. इको क्लबच्या वतीने विद्यार्थ्यांना झाडाचे महत्व पटवून देण्यात आले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील एक झाड मा के नाम याविषयी व प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईला साक्षी ठेवून झाड लावून आपला सहभाग नोंदवावा. असे मत व्यक्त करण्यात आले त्याचप्रमाणे शाळेचे प्रांगणात पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## स्व.राजीव गांधी विद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम



**तळेगाव बा. :** स्व.राजीव गांधी विद्यालय तळेगाव बाजार येथे सामाजिक वनीकरण विभाग अकोला व हरित सेने अंतर्गत एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत शाळेमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या सुनिता अरविंद गिऱ्हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून तेल्हारा वनक्षेत्राचे वनपाल एस.आर.गिरणारे व शांताराम खंडारे उपस्थित होते. तसेच सरपंच अलकाताई चिमणकार (तळेगाव बा.) यांची उपस्थिती होती. शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्याचप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना वृक्ष वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच वृक्ष संवर्धन व संगोपनाची विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून त्याचे योग्य प्रकारे संगोपन करावे याकरता विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. सदर कार्यक्रम यशस्वी होण्याकरता शाळेचे उपमुख्याध्यापक अविनाश इंगळे हरित सेनाप्रमुख चंद्रकांत येऊल सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# अकोट महामार्गावर प्रवासी निवारेच नाहीत

## एका महिन्यात निवारे बांधा : रयत शेतकरी संघटनेचा आंदोलनाचा इशारा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. ५ :** अकोट ते अकोला राज्य महामार्गावर प्रवाशांसाठी असलेले प्रवासी निवारे मागील दशकभरातच हटविण्यात आले. मात्र, त्या निवाऱ्यांची पुनर्बांधणी अद्याप झालेली नाही. पावसाळ्याच्या दिवसांत विद्यार्थ्यां, दिव्यांगां सह महिला व प्रवासी उघड्यावर थांबावे लागत आहे. जिल्हा महामार्गावर कानडी, उगवा, करोडी, वणीवारुळा यांसारख्या फाट्यांवर थांबण्यासाठी कोणतीही सुरक्षित व्यवस्था नाही. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, रयत शेतकरी संघटनेने एक महिन्यात निवारे बांधण्यात यावेत, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

अकोट राज्य महामार्गावरील प्रवाशांची गैरसोय दिवसेंदिवस वाढत त्यामध्ये गावागावांमध्ये प्रवासी निवाऱ्यांचा प्रश्न गंभीर झाला आहे. याच पार्श्वभूमीवर रयत शेतकरी संघटनेतर्फे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

सन २००० मध्ये या जिल्हा महामार्गावरील गावांच्या हद्दीत प्रवासी निवाऱ्यांचे बांधकाम करण्यात आले होते.मात्र काही वर्षांपूर्वी महामार्गाच्या रुंदीकरणादरम्यान हे निवारे हटविण्यात आले.त्यानंतर गेले दहा वर्षे या ठिकाणी कोणतेही नविन निवारे उभारण्यात आलेले नाहीत.परिणामी,पावसाळ्यात शेतकरी, विद्यार्थी, दिव्यांग आणि प्रवाश्याना उघड्यावर थांबण्याची वेळ आली आहे. महामार्गावरील कानडी फाटा, उगवाफाटा, वल्लभनगर, गांधीग्राम, करोडी फाटा, दहिहांडा फाटा, कुटासा फाटा, देवरी फाटा, बळेगाव फाटा, वणीवारुळा फाटा, आदी ठिकाणी प्रवाशांना थांबण्यासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही.याउलट रस्त्यालगतची झाडे-झुडपेही तोडण्यात आल्याने सावलीसुद्धा उरलेली नाही.रयत शेतकरी संघटनेने या मुद्द्याकडे गांभीर्याने लक्ष देत लवकरात लवकर निवारे बांधावेत किंवा पर्यायी व्यवस्था करावी.अशी मागणी केली आहे. एक महिन्यात कोणतीही कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल. असा इशारा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता, जिल्हाधिकारी, आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे निवेदन दिले आहे.

## जिल्ह्यामधील शेतरस्ते आमदार सावरकर यांच्या पुढाकाराने होतील मोकळे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

> ❑ आमदार रणधीर सावरकर यांनी शासनाचा महसूल सप्ताह नुसार एक ऑगस्ट ते सात ऑगस्टपर्यंत महसूल सप्ताह राबवून अकोला पूर्व मतदार संघातील शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे होतील.
>
> **- प्रवीण पाटील डिक्कर**
> भारतीय जनता शेतकरी आघाडी

**देवरी, दि. ५ :** शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांची अतिशय महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावून एक ते ७ ऑगस्टपर्यंत महसूल सप्ताह अंतर्गत महसूल विभागाच्या माध्यमातून राबविला जात आहे. या कार्याला अकोला जिल्हा मधूनच आमदार रणवीर सावरकर यांच्या पुढाकाराने सुरुवात केली आहे.

भारतीय जनता पार्टीचे प्रतोद रणवीर सावरकर यांनी अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील खेड्यापाड्यापर्यंत आपल्या विकास कामाची छाप पाडली आहे. आणि प्रत्येक कार्यकर्त्याच्या सुखदुःखापर्यंत पोहोचत आहे. महसूल सप्ताह म्हणून महसूल विभागामार्फत शासनाचे अधिकारी अकोला पूर्व मतदार संघातील सर्व शेत रस्ते मोकळे करण्याचे काम महसूल विभागाच्या माध्यमातून चालू झालेले आहे.

खापरवाडी ते सावरगाव खापरवाडी ते करतवाडीसह अनेक शेतकऱ्यांना रस्ता नसल्यामुळे कोर्टकचेरीच्या भानगडी न पडता आमदार यांच्या माध्यमातून रस्ता तयार होत आहे आणि शेतकऱ्यांचा शेतमाल सुखरूप घरापर्यंत पोहोचत आहे त्यामुळे शेतकऱ्यांमुळे खूप आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# मेडशी येथे छ. शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर संपन्न

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मेडशी, दि. ५ :** मालेगांव तालुक्यातील नागरिकांना करिता महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर तालुक्यातील ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी विद्यार्थी व महिला यांचे विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांची निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढणे. तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी तालुक्यात मंडळ स्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन करणेबाबत शासनाचे निर्देश आसल्याची माहीती तहसीलदार दीपक पुंडे यांनी दिली आहे.वाशीम जिल्हाधिकारी,यांनी ''गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण'' या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्हयास मिळणाऱ्या नियतव्ययाच्या प्रमाणात कोणताही बदल न करता महसुली क्षेत्रिय कार्यालयाकडून जनतेस सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान'' मालेगांव तालुक्यातील मंडळ स्तरावर आयोजित करणे, हा सातवा घटक म्हणून सन २५-२६ या आर्थिक वर्षापुरता समाविष्ट करण्यास खालील अर्टीच्या अधिन राहून शासनाने मंजूरी दिलेली आहे.

यामध्ये ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता,शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना रहिवाशी,उत्पन्न व जातीचे दाखले,रेशन कार्ड वाटप,आरोग्याची तपासणी,सामाजिक लाभाच्या योजना जसे संजय गांधी निराधार योजना,पीएम किसान योजना इ महसूल विभागाशी संबंधीत विविध प्रमाणपत्रांचे वाटप, प्रमाणपत्राबाबत जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढण्यात येऊन मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजित करुन त्यामध्ये विविध महसूली दाखले,जनतेच्या तक्रारीचे निवारण तथा मार्गदर्शन करुन महसूली प्रशासन अधिक लोकाभिमुख,कार्यक्षम व गतिमान करण्याच्या अनुषंगाने प्रयत्नशील आहेत.या वेळी महसूल,महावितरण,वनविभाग, आरोग्य, आशा सेविकाने या कार्यक्रमात सहभाग घेत जनतेच्या समस्या निकाली लावल्याआज या कार्यक्रमासाठी के एल अवचार, गजानन उमाळे,गजानन बनाईत, सुधीर कोल्हे, डीगंबर हिवराळे, पवन गालट,पंकज शेवाळे, घनश्याम साठे,दिलीप ताजने, जीवन सावळे,शुभम सपकाळ, वंदना सांगळे, रीता काकडे, प्रभाकर दुधाळकर,विद्या चव्हाण,प्रमिला राठोड, सुनंदा राठोड,सपना तायडे, एस काझी,गजानन घुगे, आकांक्षा आंधळे,प्रकाश घुगे, राजू राठोड, एस जी वानखडे, एस पी तपासे, आर राठोड, एस जी पोपलवर ह्या शासकिय कर्मचारीसह गोरखनाथ भागवत आदिंसह परिसरातील महीला व पुरुषांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# महिलांनी सक्षमीकरणासाठी तयार व्हावे – नलगे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ५ :** राज्यशासनाकडून महीलांसाठी खुप काही धोरणे आखलेली आहेत. आपण फक्त त्या बाबीचे निरसन करून रोजगार,उद्धोग, व शेतीपुरक जोडधंदा या बाबीला महत्व द्यावे. पुरुषांप्रमाणे महिलांनी सक्षमिकरणासाठी तयार व्हावे असे मत नलगेताई यांनी गावांतील प्रगतिशील शेतकरी किशोर राऊत यांनी आयोजित केलेल्या बैठकीत व्यक्त केले. महिलांनी आपल्या प्रगतीचा मार्ग मोकळा कसा होइल, पुरुषांप्रमाणेच महीला सुद्धा शेतीला सांभाळतेच आहे व शेती कसते त्यामुळे महिलांनी शेतीला जोडधंदा करण्याकरिता पुढाकार घ्यावा, महिलांना प्राधान्य म्हणून बरेच उद्योगा मध्ये महीलांना मोठ्या प्रमाणत सबसिटी दिली जाते., त्यांचा पण मोठया प्रमाणात फायदा होईल, आपण फक्त पुरुषांच्या खांद्याला खांदा लावुन सहकार्य करावे, जेणे करून आयुष्यभर आनंद राहील व समाधान मिळेल, तसेच ग्रामीण भागात मोठया प्रमाणात बचत गट स्थापन आहेत या गटाला ग्रुप शेती, व तसेच शेतीपुरक आठ ते दहा असे उद्योग आहेत ते करायला सरकारकडून सहकार्य



मिळविण्याकरिता मी पूर्ण प्रयत्न करेल व आपण आपल्या ग्रामीण भागातील शेतकरी आत्महत्या कमी होण्याकरिता मला आपण मदत कराल अशी आशा बाळगते असेही नलगे ह्या शेवटी म्हणाल्या.

आजच्या बैठकीला रयत क्रांती संघटना युवती प्रदेशाध्यक्षा प्रिया आक्षय राउत राज्य युवा अध्यक्ष अरविंद पाटील, वाशीम जिल्हा अध्यक्ष हर्षल देशमुख, व सर्व आजी माजी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच गावांतील महिला बचत गटाच्या महिला हजर होत्या, या बैठकीचे आयोजन गावांतील प्रगतिशील शेतकरी किशोर राऊत यांनी केले.

# ग्राहक पंचायतच्या अशासकीय सदस्यपदी खेडकर आणि बानगावकर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**कारंजा (लाड), दि. ५ :** समाजासाठी काम करण्याची उर्मी, संवेदनशील दृष्टी आणि निस्वार्थ कार्याची जाणीव असलेल्या व्यक्तींना समाज नेहमीच वेगळं स्थान देत असतो. याच भावनेला अनुसरून अभय खेडकर आणि प्रफुल बांनगावकर यांची ''अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिल्हा अशासकीय सदस्य'' म्हणून झालेली नियुक्ती ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे.हे केवळ पद किंवा ओळख नव्हे, तर एक सामाजिक बांधिलकीची जबाबदारी आहे. ग्राहकांचे हक्क, जनतेच्या अडचणी आणि शासकीय यंत्रणेशी जनसामान्यांचा सुसंवाद प्रस्थापित करताना ही भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

अभय खेडकर हे पत्रकारितेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण भागातील प्रश्न, शासन योजना व सामान्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडत आले आहेत. त्यांची पत्रकारिता ही केवळ वृत्तांकनापुरती मर्यादित न राहता, ती समाजाच्या न्यायासाठी झटणारी ठरली आहे.तर प्रफुल बांनगावकर हे विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभागी राहून युवकांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांचं सामाजिक बांधिलकीचं भान आणि लोकांशी थेट संवाद साधण्याची शैली ही ग्राहक पंचायतमध्ये त्यांच्या कार्याला निश्चितच बळ देईल. या दोन्ही कार्यकर्त्यांच्या निवडीमुळे वाशीम जिल्ह्यातील ग्राहकांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल, त्यांचे हक्क अधिक ठामपणे मांडले जातील, आणि ''ग्राहक देवो भवः'' ही भावना कृतीत उतरवण्यास मदत होईल.

# कृषी मंत्री शेतकरी हिताचे बोलले अन् रचला रमीचा डाव

## रयत क्रांती संघटना युवती प्रदेशाध्यक्ष प्रिया अक्षय राऊत यांचे उद्गार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ५ :** कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कोइंबतूर येथील केंद्रिय मंत्री शिवराज सिंह चौहान व गिरीराज सिंह यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात श्री कोकाटे यांनी एचटीबिटी बियाण्याचा अनुमती मिळावी या हेतूने प्रेरित होऊन पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी यांना एचटीबीटी व मका या दोन वाणाला चाचणी करण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यास सांगितले आणि या चर्चेत केंद्रातील दोन्हीही मंत्र्यांनी सहमती दर्शवली परंतु शेतकरी हिताचा प्रश्न मिटतो की काय असे सरकारला वाटू लागले व लगेच,, पवार अँड पवार कंपनीने उभा केला मग रमीचा डाव.. कारण आजपर्यंत किती सरकारे आली व गेली परंतु शेतकरी आत्महत्याग्रस्त विदर्भ व मराठवाड्यात शेतकरी हिताचा निर्णय कधी झाला नाही व कधी कोणताही शेतकरी हितांचा निर्णय होतांना दिसला पण नाही व हेच राज्य सरकारला खटकल व तेथूनच हा डाव उभा राहिला कारण विदर्भ व मराठवाडा या कोरडवाहू क्षेत्रात आपले राजकीय प्रतिनिधित्व संपेल आपले झेंडे, बॅनर, सतरंज्या उचालावया कोहीच मिळणार नाही म्हणुन एका पवाराने व्हिडीओ व्हायरल केला व दुसऱ्या पवारांनी खाते बदल केला, यांचा अर्थ असा की विरोधी असो की सत्ताधारी दोघेही एका माळेचे मणी फक्त सरकारचे नावाने भांडवल उभ करायचं व शेतकऱ्यांना लुटायच, हेच तत्व प्रत्येक सरकार राबवीत आहे, ८० चे शेतकरी नेते शरद जोशी हे सांगून गेले आहे की कीसानो की समस्या सरकार क्या सुलझाय सरकार यही एक समस्या हैं शरद जोशी साहेबांच्या आंदोलनात शेकडो शहीद झाले, हजारों त्यांच्या अर्थशास्त्रीय अभ्यासात पागल झाले, व तरीही लाखो शेतकरी आत्महत्या करीत आहेत व पुढेही करणारच आहेत, आता प्रत्येक शेतकरी संघटनेचे नेत्यांना विनंती आहे की स्वामिनाथन, कृषी मूल्य आयोग कारण हे शेतकऱ्यांना आजीवन देणारे चॉकलेट आहे यानी फक्त शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटते व पाणी मात्र कधीच मिळत नाही, बस फक्त एक करा नाहीतरी आपण तोट्याची शेती करीत आहोतच आता येणारे दोन वर्ष फक्त कुटुंबापुरत पिकवा मग पहा आपल्याला जे हवं ते मिळेल. व्यापारी व सरकारचे प्रतिनिधी बांधावर येतील मग हमी नाही, कमी नाही, तर मनमानी शेतीमालाला भाव मिळेल मग कुठे छत्रपती, शाहू, फुले आंबेडकर यांच्य राज्य अनुभवाला मिळेल अशाही प्रिया अक्षय राऊत शेवटी म्हणाल्यात हे उदगार काढले त्यांनी रोजी दोनद बू//येथे आयोजित विदर्भ महीला मेळाव्यात या मेळाव्याला रयत क्रांती संघटना महीला प्रदेशाध्यक्षा अनिता ताई नलगे, राज्य युवा अध्यक्ष अरविंद पाटील अहिरे, वाशीम जिल्हा अध्यक्ष हर्षल देशमुख व तसेच भरपूर प्रमाणत महीला व पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या मेळाव्याचे आयोजन प्रगतिशील शेतकरी किशोर पाटील राऊत यांनी केले होते.

**निवेदन** मुदतवाढी संदर्भात मुख्याधिकारी यांची सकारात्मकता

# कर आकारणीवर आक्षेप दाखल करण्यासाठी मुदतवाढ द्या!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. ५ :** नगर परिषदने २०२५-२६ ते २०२८-२९ चतुर्थ कर निर्धारण करण्याच्या नोटीसेवर हरकत दाखल करण्याकरीता एक महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी, कर भरण्याकरीता हरकत अर्जासोबत २०२४-२५ चा कर भरण्याची अट रद्द करुन हरकत अर्ज स्विकारण्यात यावे तसेच थकीत कर मालमत्ता धारकांना अभय योजनेचा लाभ देण्यात येऊन १०० टक्के व्याज माफीचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावे, अशा आशयाचे निवेदन भारतीय जनता पार्टीच्या वतीने मुख्याधिकारी तथा प्रशासक नरेंद्र बेंबरे यांना देण्यात आले.

आकोट नगर परीषदेने शहरातील मालमत्तावर ६ आगस्ट पर्यंत हरकती मागविल्या आहेत. हरकत दाखल करण्याची शेवटची तारीख जवळ येऊन सुद्धा ब-याच मालमत्ता धारकांना कर आकारणी च्या नोटीसेस मिळाल्या नाहीत त्यामुळे असे मालमत्ता धारक हरकत घेण्यापासुन वंचित राहु शकतात तसेच मालमत्ता धारकांना कर निर्धारण करण्याच्या नोटीसेस वर हरकत दाखल करण्याकरीता २०२४-२५ चा कर भरल्याची पावती जोडल्याशीवाय हरकत दाखल करुन घेतल्या जात नाही, कर भरण्याबाबत सक्ती केल्या जात आहे.शासनाने थकीत मालमत्ता धारकांकरीता अभय योजना लागु केली आहे जे मालमत्ता धारक थकीत कर भरण्याकरीता येत आहे त्यांचे मुद्दल रक्कमेचा भरणा करुन घेण्यात येऊन त्याचे शंभर टक्के व्याजमाफीचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावे. अशी मागणी माजी नगराध्यक्ष पुरुषोत्तम चौखंडे, हरीश टावरी प्रभाकर मानकर मंगेश लोणकर विक्रम सिंह ठाकुर विवेक धुळे,मनोज चंदन, श्रीकांत गायगोले, जितु जे स्वाणी,विशाल दाभाडे,कुसुम ताई भगत, अक्षय भगत,चंदू परवानी, श्रीकांत तळोकार, दीपक जेस्वानी, राजकुमार जाधवानी, गोपाल देशमुख,प्रतीक झुनझुन वाला, शंतनु चरपे,जयंत लोणकर,सागर सरप जय चोखंडे,अनिकेत फुरसुले,यांच्यासह भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदन दिले.याप्रसंगी मुख्याधिकारी यांनी मुदत वाढी संदर्भात सकारात्मकता दर्शविल्याचे भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेच्या अध्यक्षपदी द्वारकाप्रसाद दुबे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुर्तिजापूर, दि. ५ :** आर्थिक दुर्बलतेमुळे शिक्षणाच्या प्रवाहापासून वंचित राहणाऱ्या गोरगरीब, होतकरू विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या हेतूने स्थानिक इंदिरा गांधी न. प. माध्यमिक विद्यालयात स्थापन करण्यात आलेल्या सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेची वार्षिक आमसभा विद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली. असून या बैठकीत अध्यक्षपदी द्वारकाप्रसाद दुबे तर उपाध्यक्षपदी गणेशराव जळमकर यांची निवड करण्यात आलेली आहे. इंदिरा गांधी नगर परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी समाजातील दानशूर देणगीदारांच्या माध्यमातून या योजनेसाठी निधी गोळा करण्यात येतो, त्या निधीच्या व्याजातून दरवर्षी शाळेतील सगळ्याच विद्यार्थ्यांना गणवेश तसेच शालोपयोगी साहित्य पुरविले जाते. योजनेच्या अध्यक्षपदी मूर्तिजापूरचे माजी नगराध्यक्ष द्वारकाभैय्या दुबे तर उपाध्यक्षपदी माजी उपाध्यक्ष गणेशराव जळमकर यांची निवड करण्यात आली. माजी नगराध्यक्ष द्वारका प्रसाद यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे नेहमी विद्यार्थ्यांसाठी आक्रमक भूमिका घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी द्वारकाप्रसाद दुबे नेहमी पाठपुरावा करतात म्हणून या उद्देशाने ही जबाबदारी त्यांना सोपविण्यात आली आहे योजनेचे पदसिद्ध सचिव म्हणून शाळेचे मुख्याध्यापक जयदीप सोनखासकर यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली. योजनेच्या संचालकपदी अजाबराव वहिले, अनिल जेठवाणी, सुभाष देशमुख, राजेश सातव, दिगंबरभैया दीक्षित, चंदन अग्रवाल, कमलाकरभाऊ गावंडे, श्रीमती ज्योती मेहरे यांची निवड करण्यात आली.

अजिंक्य भारत
# आपलं वाशिम
३
अकोला, बुधवार, दि. ६ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

## महत्त्वाचे

### भरधाव दुचाकी खांबाला धडकली

**रिसोड :** रिसोड शहरात भरधाव दुचाकी डिव्हायडर वरील खंब्याला धडकुन. एका युवकाचा हात तुटून पडला व तो गंभीरित्या जखमी झाला ही घटना रिसोड सेनगाव मार्गावरील रिसोड शहरालगत पाण्याच्या टाकी समोर ४ ऑगस्ट दुपारी साडेचार वा ची घडली. ज्ञानेश्वर प्रकाश खानझोडे व ३८ वर्ष राहणार निजामपुर तालुका रिसोड जिल्हा वाशिम असे जखमीचे नाव असून त्यास प्रथम रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यास वाशिम येथे रवाना करण्यात आले.

### ठाणेदार पोहेकर यांचा सत्कार



**मानोरा :** येथे नव्यानेच रुजू झालेल्या ठाणेदार नैना पोहेकर यांचा दिनांक ४ ऑगस्ट रोजी जुनी वस्ती येथील युवकांनी सत्कार केला. या वेळी डॉ.विशाल पंचशील शिरसाट, प्रविण आडुळे, विशाल राठोड, अभिजित गुल्हाने, नजीर शेख सलमान शेख, सुरेश शिरसाट, किसन वायले, सिद्धार्थ खंडारे, आशिष अवचार, राहुल शिरसाट, प्रदीप गायकवाड, सुहास शिकारे आदी उपस्थित होते.

### शेतात जावे तर जिवाला, नाही जावे तर पिकाला धोका

**रिसोड :** शेतात जावे तर आसोला जिवाला धोका आणि नाही जावे तर बहरलेल्या पिकाला, अशा विवंचनेत शेतकरी अडकला आहे. खुर्दसह परिसरात कोरडा दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस यासारख्या नैसर्गिक आपत्ती, तर दुसऱ्या बाजूला आता जंगलातील हिंस्र आणि विषारी प्राण्यांचा वाढता संचार, यामुळे शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे ठाकले आहे. या भागातील प्रादेशिक जंगलामध्ये हरिण, निलगाय, रानडुक्कर, ससे, चितळ, काळवीट यांसारखे वन्यप्राणी तसेच साप, अजगर, विंचू यांसारखे सरपटणारे जीव मोठ्या प्रमाणात आहेत. विशेष म्हणजे बिबट्या व इतर हिंस्र प्राण्यांचाही वावर वाढला आहे. परिणामी, पिकांवर ताव मारणाऱ्या प्राण्यांपासून बचाव करताना शेतकऱ्यांचा जीव धोक्यात येतोय.

### सौर ऊर्जेतील करिअरसाठी संधी

**वाशिम :** शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मंगरूळपीर व शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मालेगांव येथे सोलर टेक्निशियन या नाविन्यपुर्ण आणि आधुनिक व्यवसायाचे या वर्षी पासुन प्रवेश दिला जाणार आहे.

या व्यवसाय संदर्भातील प्रशिक्षणासाठी प्रवेश अर्ज दाखल करणे सुरू झाले आहे. एकूण ४० प्रशिक्षणार्थ्यांची यामध्ये प्रवेश क्षमता आहे. तरी अधिकाधिक इच्छुक विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अर्ज दाखल करावे.

### निधन वार्ता



**मालताबाई इंगोले**

**मानोरा :** शहरातील राठी नगर येथील रहिवासी सौ. मालताबाई महादेवराव इंगोले (वय ६०) यांचे दिनांक ३ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती,दोन मुले,एक मुलगी,सुना नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. भाजपा चे तालुका अध्यक्ष अरविंद इंगोले पाटील यांच्या त्या मातोश्री होत.

# हुमणी अळीने केले ५० टक्के पीक फस्त

## मानोरा तालुक्यातील परिस्थिती: पंचनामा करण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. ५ :** तालुक्यातील शेतकरी नैसर्गिक संकटाने मागील अनेक वर्षांपासून भरडल्या जात असून, कारखेडा या गावातील युवा शेतकऱ्याच्या तीन एकर शेतातील अर्ध्यापेक्षा अधिक सोयाबीन पिकाची नासाडी हुमणी अळीने केल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतशिवाराचा पंचनामा प्रशासनाकडून करण्यात येण्याची मागणी बाधित शेतकऱ्याच्यावतीने करण्यात येत आहे.

अतिवृष्टी झाल्यास पिके निघत नाही, निघाले तर वाहून जाते. फुलोऱ्यावर, फलधारणा झाल्यावर अतिवृष्टी झाली तर त्याचाही विपरीत परिणाम शेतशिवार व पिकांवर होतो. ज्यावेळी गरज असते त्यावेळी पावसाने ओढ दिला, तेव्हासुद्धा अपेक्षित उत्पन्न शेतकऱ्यांच्या हाती लागत नाही. अतिवृष्टी आणि अवर्षणावर मात करून आणि वन्य प्राण्यांच्या जीवघेण्या भीतीला परतवून पिकविलेल्या कृषी मालाला बाजारात अपेक्षित दर मिळत नाही, या व अशा एक ना अनेक संकटांना तोंड देणाऱ्या तालुक्यातील शेतकऱ्यांना यावर्षी हुमणी अळीच्या आक्रमणाने वेढून शेतकऱ्याला घायकुतीस आणलेले आहे.

कारखेडा या गावातील युवा शेतकरी अंकुश विजय राठोड यांच्या गट नं. ३९ मधील तीन एकरातील अर्ध्यापेक्षा अधिक शेतशिवारातील सोयाबीन पीक हुमणी अळीच्या प्रकोपाने उद्ध्वस्त झाले आहे तर गट क्र.४१ मधील संजय विजय राठोड यांच्या तीन एकर शेतातीलसुद्धा एक एकरापेक्षा अधिक सोयाबीनचे पीक या अळ्यांनी नामशेष करून टाकल्याची माहिती प्रस्तुत प्रतिनिधीला नुकसानग्रस्त शेतकरी अंकुश राठोड यांनी दिली. कारखेडसह तालुक्यातील इतरही गावातील सोयाबीन, तूर आणि इतर पिकांना हुमणी अळीच्या कोपाचा जबर फटका बसलेला दिसून येत आहे. कृषी व महसूल प्रशासनाने हुमणी अळीमुळे नुकसान झालेल्या शेतशिवाराचा नुकसान भरपाईसाठी पंचनामा करण्याची मागणी शेतकरी अंकुश राठोड तथा संजय विजय राठोड यांच्यावतीने करण्यात आली आहे.

> **एकात्मिक कीड व्यवस्थापन: हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. यामध्ये योग्य वेळी कीटकनाशकांचा वापर, तसेच पिकांची फेरपालट करणे यांचा समावेश होतो. रासायनिक नियंत्रण: योग्य कीटकनाशकांचा वापर करून हुमणी अळीचे नियंत्रण करता येते. जैविक नियंत्रण: जैविक घटकांचा वापर करूनही हुमणी अळीचे नियंत्रण शक्य आहे, असे काही कृषी तज्ज्ञांनी सांगितले आहे.**

# अल्पवयीन दुचाकीस्वारांमुळे अपघातांच्या घटनांत वाढ

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शिरपूर जैन, दि. ५ :** शहरात अल्पवयीन दुचाकीस्वारांची संख्या झपाट्याने वाढत असून, रस्त्यांवर बेधडक वेगाने गाड्या चालविणाऱ्या अल्पवयीन मुलांमुळे वाहतुकीचा गोंधळ निर्माण होत आहे. विशेषतः शाळा व महाविद्यालयीन परिसर, बाजारपेठ, मुख्य चौक अशा ठिकाणी १२ ते १७ वयोगटातील मुले हेल्मेटविना भरधाव वेगाने गाड्या चालवताना दिसून येत आहेत. यामुळे अपघातांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

ट्रॅफिक नियमांना पूर्णतः धाब्यावर बसवत, ना गाडीचा परवाना, ना हेल्मेट, ना सिग्नल पाळण्याची शिस्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरातील अंदाजे ३० टक्के नागरिकांकडे गाडी चालवण्याचा कायदेशीर परवाना नाही. अनेक नागरिक व अल्पवयीन विद्यार्थी गाड्या चालवत असून, त्याकडे पोलीस व प्रादेशिक परिवहन विभागाचे सर्रास दुर्लक्ष होत आहे. शाळा सुटण्याच्या वेळेत विशेषतः मोटरसायकलवर तिघा-चौघांनी बसून गर्दीच्या ठिकाणी वेगात धावणाऱ्या गाड्यांमुळे महिलांना, लहान मुलांना व वृद्धांना रस्त्यावरून जाणे कठीण झाले आहे. काही घटनांमध्ये अपघात होऊन जखमी होणाऱ्यांची संख्या वाढली असून, अनेक वेळा ही प्रकरणं नोंदवलीही जात नाहीत.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवाज उठविण्यास सुरुवात केली असून, पालकांनी आपल्या मुलांच्या वाहनचालना संदर्भात सजग राहणे गरजेचे आहे. मुलांच्या हातात कमी वयात गाडी देणे ही फक्त कायद्याचे उल्लंघन नाही, तर त्यांच्या व इतरांच्या जीवाशी खेळ करण्यासारखे आहे. वाहतूक पोलीस विभाग, शिरपूर ग्रामपंचायत, आर.टी.ओ. व स्थानिक शैक्षणिक संस्था यांच्यात समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो. यामुळे कायद्याचा भंग करणाऱ्यांवर कारवाई होत नाही.

# विविध जीवनसत्व: रानभाज्या खा, तंदुरुस्त रहा



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ५ :** पावसाळा सुरू आहे. आपल्याला तंदुरुस्त राहण्यासाठी निसर्गाच्या नियमाप्रमाणे चाललो तर शरीर मजबूत व तंदुरुस्त राहु शकते.

श्रावण महिन्यात मांस, मच्छी एक महिना न खाण्याचे कारण रोगराई वाढलेली असते, त्यामुळे या महिन्यात रानभाज्या तरोटा भाजी, बोपली, कुंजराची भाजी, गोखरुची भाजी,आडानची भाजी, तांदूळजिरा, फांदची भाजी, कंळुची भाजी, शरण्याची भाजी बरबटीचे कोवळ्या पानांची भाजी, अंबाळीची भाजी, कडुकोसलाची भाजी, वाघाटेची भाजी, बोरुचे फ ुलांची भाजी, झटुल्याच्या फुलांची भाजी, गोंदनच्या फुलांची भाजी जंगली भेंडी, गवार, आंबटचुका, शेपु, चळवळीची भाजी, टेकोळे ( मश्रुम)मूग - उडीदचे सोले, पालक दोडके, शीरी दोडके, सोनपट खडक, मुळीच्या शेंगा, कटुले.

ह्या सर्व भाज्या निसर्गाच्या नियमाप्रमाणे मिळणाऱ्या ताकदवान आहेत. हे प्रत्येक वेळोवेळी खाल्ले तर आपल्याला रोगांपासून मुक्त करण्यासाठी मदत करतात. जे ग्रामीण भागातील शेतकरी आहेत, त्यांना या सर्व भाज्यांची ओळख आहे व आपणसुद्धा आपल्या नात्यातील शेतकरी म्हणा किंवा शेतमजूर यांना सांगितले तर ते आपल्याला आवडीने आणून देतात.

> पावसाळ्यात रानभाज्या खाल्ल्या पाहिजेत. त्यामध्ये विविध प्रकारचे जीवनसत्व असते. पचनक्रिया सुधारण्यासाठी या महत्त्वाच्या असून, यामुळे शरीरात ऊर्जा वाढते.श्रावण महिन्यात कटूले ही फळ भाजी नक्की खावी.यामुळे मधुमेह नियंत्रणात राहतो.
> **डॉ.महेंद्र चव्हाण**, मानोरा

# मोकाट गुरांचा सुळसुळाट: तातडीने बंदोबस्ताची मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. ५ :** रिसोड शहरातील बाजारपेठ असणाऱ्या तसेच शहरातील मुख्य वस्तीमध्ये मोकाट गुरांचा सुळसुळाट बघायला मिळत आहे त्यामुळे वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे तरी या मोकाट गुरांचा त्वरित बंदोबस्त करावा अशी मागणी विशाल पाटील खडसे यांनी केली आहे.

शहरांमध्ये आणि ग्रामीण भागांमध्ये वाढलेला मोकाट गुरांचा सुळसुळाट ही एक गंभीर समस्या बनली असून, यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर, सामाजिक कार्यकर्ते विशाल पाटील खडसे यांनी प्रशासनाकडे या मोकाट गुरांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. या समस्येमुळे होणारे अपघात, वाहतूक कोंडी आणि शेतीचे नुकसान याकडे खडसे यांनी लक्ष वेधले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून रस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या गुरांमुळे अपघातांची संख्या वाढली आहे. रात्रीच्या वेळी ही गुरे दिसत नसल्याने अनेक वाहनचालकांना जीवघेण्या अपघातांना सामोरे जावे लागत आहे. या अपघातांमध्ये अनेकांचा बळी गेला आहे, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. यासोबतच, रस्त्यांच्या मधोमध बसणारी किंवा फिरणारी गुरे वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरत आहेत, ज्यामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. जर या समस्येकडे तातडीने लक्ष दिले नाही, तर भविष्यात त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. नागरिकांच्या हितासाठी आणि सुरक्षिततेसाठी मोकाट गुरांचा बंदोबस्त करणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

> रिसोड शहरात मोकाट जनावरांचा मुक्त संचार असल्या कारणाने वाहन धारकांस याचा मोठा त्रास सहन करावा लागतो नगर पालीका प्रशासनाने या मोकाट जनावरांचा तातडीने बंदोबस्त करावा.
> **- विशाल पाटील खडसे,** व्यापारी रिसोड

# कारंजात विश्वमांगल्य सभेच्या मातृशक्तीची कावड यात्रा उत्साहात

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा, दि. ५ :** कारंजा शाखेच्या विश्वमांगल्य सभेच्या वतीने आयोजित मातृशक्तीची भव्य कावड यात्रा भक्तिपूर्ण आणि मोठ्या जल्लोषात ३ ऑगस्ट रोजी पार पडली.

या यात्रेचा शुभारंभ आमदार सई डहाके यांच्या हस्ते कावड पूजन करून झाला. यावेळी वंदना मालपाणी व शिवकांता इन्नाणी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

पवित्र सप्तनद्यांचे आवाहन करून टिळक चौकातील विहिरीच्या जलाची पूजा करत यात्रा सुरू झाली. त्यानंतर श्री नर्मदेश्वर महादेवाला शिवमहिम्न स्तोत्राच्या गजरात अभिषेक करण्यात आला. कावड पूजनानंतर यात्रेची वाजतगाजत सिद्धेश्वर मंदिराकडे मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण शहरात भक्तिभावाचे व उत्सवाचे वातावरण अनुभवायला मिळाले.

यात्रेत विविध समाजातील जवळपास ११०० ते १२०० महिलांनी सहभाग घेतला. शहरातील विविध चौकांमध्ये पारंपरिक लोकनृत्य व सांस्कृतिक सादरीकरण करण्यात आले. बंजारा समाजाचे पारंपरिक नृत्य, दुधोरा येथील महिलांचे पावली नृत्य, गुजराथी समाजाचा गरबा, डमरू पथक, भजनी मंडळे आणि जयघोष करणाऱ्या महिलांनी वातावरण भारावून टाकले.

कार्यक्रमात लहानग्यांचा सहभागही विशेष लक्षवेधी ठरला. एकता गायकवाड भारतमातेच्या, प्रिया अडुळकर शंकराच्या, ओवी ढाकुलकर पार्वतीच्या, अनवेश पायल गणपतीच्या आणि हरप्रीत पंजवानी संत झुलेलाल यांच्या भूमिकांमध्ये दिसून आल्या.

सिद्धेश्वर महादेव मंदिरात पोहोचल्यावर २१ महिलांनी २१ कलश खांद्यावर घेऊन मंदिराला पाच प्रदक्षिणा घातल्या. त्यानंतर महादेवाला जलाभिषेक करण्यात आला. या विशेष पूजेसाठी तेजश्री डहाके व राखी चव्हाण प्रमुख पूजेस बसल्या.

कार्यक्रमाची सांगता महाआरती व प्रसाद वाटपाने झाली. या यशस्वी कार्यक्रमासाठी विश्वमांगल्य सभेच्या कार्यकर्त्या, विविध सामाजिक संस्था व स्थानिक महिलांचे योगदान मोलाचे ठरले.

# श्री शिवाजी हायस्कूल येथे पालक–शिक्षक सभा संपन्न

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**किन्हीराजा, दि. ५ :** किन्हीराजा येथील श्री शिवाजी हायस्कूल मध्ये .आज दि. ४ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता पालक शिक्षक संघाची सभा घेण्यात आली

या सभेला अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक बी जे शेख व प्रमुख पाहुणे म्हणून अंबादासजी कुटे पाटील व प्रदीप कुटे तसेच पालक शिक्षक संघाचे माजी उपाध्यक्ष महादेव घुगे उपस्थित होते.

या सभेमध्ये पालक शिक्षक संघाचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष म्हणून शंकर इंगळे यांची सदस्य म्हणून संतोष तायडे, गजानन चव्हाण, गणेश नागरे, गिरीश राऊत, सुवर्णा पातुरकर, सुनिता डाखोरे, संदेश सांगळे यांची निवड करण्यात आली. या सभेमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता व सर्वांगीण विकास याबद्दल चर्चा करण्यात आली तसेच शाळेमध्ये विविध भौतिक शैक्षणिक सुविधा बद्दल उपस्थित पालकांना माहिती देण्यात आली श्री शिवाजी संस्थेअंतर्गत सुरू झालेल्या माझी शाळा माझी अस्मिता या उपक्रमांतर्गत शाळेची वाढलेली पटसंख्या व शाळेचा वाढलेला इयत्ता दहावीचा निकाल व इतर शैक्षणिक बाबींची माहिती देण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन श्री संदेश सांगळे व कुमारी एम आर तायडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन कु. एम आर खेडकर यांनी केले.

**ऐक्याचं दर्शन** मोठेगावातील मुस्लिम बांधवांकडून हिंदू-मुस्लिम ऐक्याचं दर्शन

# मुस्लिम बांधवांकडून कावडयात्रेचे स्वागत

। सुरेश गिरी ।



**रिसोड, दि. ५ :** मुस्लिम बांधवांकडून ऐक्याचे दर्शन घडवणारे अनेक प्रसंग येतात. अनेकदा, धार्मिक सण-समारंभांमध्ये, विशेषतः हिंदू बांधवांच्या कार्यक्रमांमध्ये मुस्लिम बांधव उत्साहाने सहभागी होतात आणि सलोखा जपताना दिसतात. असाचं प्रसंग रिसोड तालुक्यातील मोठेगाव येथील मुस्लिम बांधवांनी श्रावण महिन्यातील कावड यात्रेचे स्वागत करून हिंदू मुस्लिम ऐक्याचं दर्शन घडवलं.

तालुक्यातील मोठे गाव येथे हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन घडले. सद्यस्थितीत श्रावण महिना सुरू असून संपूर्ण देशात विविध ठिकाणी कावड यात्रेचे आयोजन केले जात आहे. शिवभक्त मोठ्या संख्येने पवित्र जल आणून विविध मंदिरात अर्पण करतात. लोणार वरून पवित्र घेऊन रिसोड तालुक्यातील मोठेगाव येथील श्री रामेश्वर कावड मंडळ यात्रा गावात पोहोचताच मोठेगाव येथील मुस्लिम बांधवांकडून सदर कावड यात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

कावड यात्रेमध्ये असलेल्या शिवभक्तांना मुस्लिम बांधवांकडून फराळ चहा व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. चहा व फराळाचे वाटप मुस्लिम बांधवांकडून केले जात असताना या ठिकाणी अत्यंत धार्मिक व आपुलकिचे वातावरण बघायला मिळाले. सदर स्वागत समारंभाला बहुसंखेने मुस्लीम समाज उपस्थित होते. यामधे शेख सलमान शेख गफ्फार, शेख नासेर शेख हमीद, शेख अनिस शेख रऊफ़, सिराज जुशब घनकर,नवेज कुरेशी, शेख तौफिक, शेख सोहिल, कालू भाई, सोहिल पठाण,आरशद धनकर,शेख इम्रान, फयाज घनकर, शेख हमीद, शेख अहमद, शेख हरून, शेख रऊफ़, शेख वहाब, शेख रफिक, अहमद धनकर, आकील धनकर,आरेफ घनकर उपस्थित होते.

> महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून देशभरात ओळखले जात असताना सामाजिक ऐक्य आणि धार्मिक सलोख्यासाठी देखील आदर्शवत मानलं जाते. याची उदाहरणे जिल्ह्यात अनेकदा दिसून येतात. मोठेगाव मधील ताजे उदाहरण बघता हिंदू-मुस्लिम बांधवांमध्ये धार्मिक आणि सामाजिक सलोख्याचं वातावरण पाहायला मिळालं. मुस्लिम बांधवांच्या या कृतीचे सगळीकडे निश्चितच अनुकरण होईल अशी आशा गावकऱ्यांनी व्यक्त केली.

# वीज जोडणी रखडल्याने पावसाळ्यातही नागरिक तहानलेले!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ५ :** पोहरादेवी सर्कल मधील अनेक गावात पाणी पुरवठा विहिरीचे काम झाले आहे.मात्र स्वतंत्र रोहित्र बसवून या विहिरींना अद्याप वीज पुरवठा दिला नाही.त्या मुळे या गावातील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नाही.पाणी पुरवठा विहिरीवर स्वतंत्र रोहित्र देऊन विहिरींना वीज पुरवठा सुरू करावा.अशी मागणी पोहरादेवी सर्कल मधील नागरिकांनी केली आहे.

कार्यकारी अभियंता महावितरण वाशीम यांना दिनांक ४ ऑगस्ट रोजी एक निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले की,पोहरादेवी सर्कल मधील ग्रामपंचायत वाईगौळ, धावंडा शेंदोणा,वसंतनगर व पोहरादेवी येथे पाणी पुरवठा विहिरीचे काम पूर्ण झाले आहे.या पाणी पुरवठा विहिरीवर स्वतंत्र रोहित्र बसवण्यात यावे.अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्या स्वाती अजय पाटील यांनी केली आहे. तसेच तालुक्यातील अनेक गावात जनजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा विहिरीचे कामे पूर्ण झाली आहे.मात्र तेथे स्वतंत्र रोहित्र बसवण्यात आले नसल्याने पाणी पुरवठा विहिरींना वीज पुरवठा मिळाला नाही. या बाबत तत्काळ कार्यवाही करावी. अन्यथा आंदोलन करावे लागेल.असा इशारा दुसऱ्या निवेदनात देण्यात आला आहे. निवेदन देते वेळी ॲड ज्ञायक पाटणी,ठाकूरसिंग चव्हाण,विजय पाटील,शाम राठोड,अशोक राठोड,गजानन राऊत आदी उपस्थित होते.

**महत्त्वाचे**

## महसूल सप्ताहात रस्ता मोजणी व सीमा निश्चित

**अकोट :** महसूल सप्ताह निमित्ताने दिनांक ३/८/२०२५ रोजी मौजे वसाळी नागापूर येथील वसाळी नागापूर ते लाळेगाव रस्ता मोजणी करून सिमा निश्चीत करण्यात आली आहे.यावेळी मंडळ अधिकारी अकोलखेड प्रभुदास होपळ,ग्राम महसूल अधिकारी राजाभाऊ खामकर ,ग्राम महसूल अधिकारी निलेश देऊळकर,बोर्डी ग्रामसेवक अनंत मोहकार,तंटामुक्ती अध्यक्ष बोर्डी अमोल आतकड,भूमी अभिलेख कर्मचारी राजेंद्र मानकर,देशमुख, महसूल सेवक पवन गावंडे तसेच शेतकरी श्रीकांत धर्मे, सुमित सपकाळ लाडेगाव, चेतन आतकड, विनोद चंदन, भूषण आतकड, गोपाल आतकड, अमोल आतकड, रत्नदीप बोंद्रे लाडेगाव हे मोक्यावर उपस्थित होते.व सर्वांनी सहकार्य केले.

# मोकाट कुत्र्यांमुळे शाळकरी मुले दहशतीखाली

## रस्त्यावर मोकाट जनावरांचा वावर असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप

। सुनील फुलारी ।

**कारंजा, दि. ५ :**कारंजा शहर सध्या मोकाट कुत्रे आणि जनावरांच्या प्रचंड उपद्रवामुळे हैराण झाले असून, या समस्येने नागरिकांच्या दैनंदिन जीवनात घातक अडथळा निर्माण केला आहे. शाळकरी मुलांवर कुत्र्यांच्या चाव्याचे प्रकार वाढले असून, अनेक अपघात व गंभीर प्रसंगांची नोंद झाली आहे.

शहरातील प्रत्येक गल्ली, चौक, रस्ते हे मोकाट कुत्र्यांचे अड्डे बनले असून, दिवसा तसेच रात्रीच्या वेळी या कुत्र्यांच्या टोळक्यांचा उपद्रव अधिक जाणवतो. शाळा, कॉलेज, कार्यालय आणि



बाजारपेठांमध्ये या कुत्र्यांमुळे महिलांना आणि लहान मुलांना विशेषतः त्रास सहन करावा लागत आहे. काही प्रकरणांमध्ये शाळकरी मुलांना गंभीर दुखापत झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत .याचबरोबर शहरात रस्त्यांवर मोकाट जनावरेही प्रचंड प्रमाणात फिरताना दिसून येत आहेत.

रस्त्यावरच ही जनावरे बसून राहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो आहे. विशेषतः सकाळी व सायंकाळी गर्दीच्या वेळी यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होते. काही ठिकाणी ही जनावरे अचानक समोर आल्याने अपघातांचे प्रमाणही वाढू लागले आहे.

या समस्येकडे नगरपालिका प्रशासनाचे पुन्हा एकदा वाळूत डोके खुपसल्याप्रमाणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून होतो आहे. नगरपालिकेचे अधिकारी आणि मुख्याधिकारी यांच्याकडून कोणतीही ठोस कारवाई अद्याप झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. शहरातील सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना आणि जागरूक नागरिकांनी यासंदर्भात तीव्र प्रतिक्रिया नोंदवत, तत्काळ मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा आणि मोकाट जनावरांवर नियंत्रण आणावे, अशी मागणी केली आहे.

### ‘जनतेचा संयम सुटण्याआधी उपाययोजना करा!‘

नागरिकांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर कारवाई झाली नाही, तर तीव्र आंदोलन उभे करण्यात येईल. कारंजा शहरात राहणाऱ्या सुज्ञ नागरिकांनी आता एकत्र येत नगरपालिकेकडे ठोस पावले उचलण्याची मागणी केली आहे.

## हिरपूर मार्गे जाणाऱ्या रस्त्यावरील दिशा फलक गायब?

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**हिरपूर , दि. ५ :** हिरपूरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर लावण्यात आलेले दिशादर्शक फलक गेल्या काही दिवसांपासून गायब असून, त्यामुळे प्रवाशांना मार्ग शोधताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तसेच या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

हिरपूर येथून ब्रह्मी, हिवरा कोरडे, बोर्टा, आसरा, अमरावती, तसेच टिपटाळा खापरवाडा, लोणसाणा, दापुरा, ऋणमोचन, शेलु बाजार मार्गे वाहने जातात. यामार्गे दररोज हजारो वाहने ये-जा करतात. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने काही महत्त्वाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक उभारले होते; परंतु अलीकडे हे फलक एकामागून एक गायब होत आहेत.

स्थानिक नागरिकांचा संशय आहे की, या फलकांची चोरी झाली असावी किंवा दुर्लक्षामुळे ते हटविले गेले असावेत. फलकांवर गावाचे नाव, अंतर आणि पुढील ठिकाणांची माहिती असायची. हे फलक नसल्याने बाहेरून येणाऱ्या वाहनचालकांना योग्य मार्ग न मिळाल्यामुळे ते इतर रस्त्यांवर भरकटत आहेत.

> ‘हिरपूरकडे येणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर दिशादर्शक फलकांची आवश्यकता आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन नवीन फलक त्वरित बसवावेत.
>
> **सुबोध कडू**
> सरपंच पिंगला

## स्व. दादासाहेब दिवेकर वरिष्ठ प्राथमिक शाळा येथे बालिकेच्या सन्मानार्थ ‘चलो सोच बदले’ कार्यक्रम

### तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचा उपक्रम

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला , दि. ५ :** मुलींना त्यांच्या हक्काबद्दल जागरुक करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला जातो. मुली स्वयंसिद्ध व्हाव्यात, यासाठी तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी तर्फे प्रत्येक बालिकेच्या सन्मानार्थ 'चलो सोच बदले' हा संकल्प घेऊन ०२/८/२०२५ रोजी सकाळी ८ वाजता स्व. दादासाहेब दिवेकर वरिष्ठ प्राथमिक शाळा उमरी,अकोला येथे कार्यक्रम घेण्यात आला.

तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे व उपाध्यक्ष तनुजा वाघमारे यांच्या संकल्पनेतून संस्थेचे सचिव विष्णूदास मोंडोकार, जिल्हा समन्वयक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार 'चलो सोच बदले' या



कार्यक्रमानुसार मुलगी वयात येताना सुरू होणारी मासिक पाळी त्या बद्दलच्या श्रद्धा -अंधश्रद्धा, समज-गैरसमज, समस्या व त्यांवरील उपाययोजना या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी सदस्य श्वेता शिरसाट यांनी केले. तर विषयाला धरून मार्गदर्शन श्वेता शिरसाट, सुचिता घोगरे, सपना म्हात्रे यांनी केले, यावेळी शाळेतील उपस्थित मुलींनी मासिक पाळीच्या संदर्भातील येणाऱ्या वेगवेगळ्या समस्या व त्यावरील उपाय याबाबत माहिती विचारली, त्यावर तिक्ष्णगत महिला सदस्यांनी त्यांना मार्गदर्शन केले. तसेच शाळेच्या शिक्षिका प्रतिभा शिरभाते यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व तिक्ष्णगत संस्थेबाबत विद्यार्थिनींना माहिती दिली. यावेळी वंदना बनसोड , रजनी अरबाळ ,सुवर्णा वरोकार , अनुराधा वरोकार, सीमा खंडारे ,किरण धुळे, श्रद्धा घाटरे आदी शिक्षिका उपस्थित होत्या.

## विश्रामगृहातील खिडक्यांच्या काचा फुटल्याने ‘प्रायव्हसी’ धोक्यात!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा, दि. ५ :** कारंजा शहरातील शासकीय विश्रामगृह हे बाहेरून जितके आकर्षक दिसते, तितकेच आतून गैरसोयींनी ग्रासलेले आहे, हे वास्तव सध्या उघड होत आहे. विशेषतः या विश्रामगृहातील टॉयलेट व बाथरूमच्या खिडक्यांना काचा नसल्यामुळे येथे थांबणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची चांगलीच गोची होत असल्याचे समोर आले आहे. टॉयलेट व बाथरूमच्या खिडक्या मोकळ्या असल्यामुळे कोणतीही बाहेरील व्यक्ती सहज आत डोकावू शकते. त्यामुळे गुप्ततेचा अभाव जाणवत असून, यामुळे विश्रामगृहात थांबणाऱ्या व्हीआयपी अधिकाऱ्यांची अस्वस्थता वाढली आहे. विश्रामगृह म्हटले की, तेथे सर्व मूलभूत सुविधा आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा असणे अपेक्षित असते; मात्र कारंजा शहरातील विश्रामगृहात ही अत्यंत प्राथमिक आणि गरजेची सुविधा म्हणजे बाथरूमच्या खिडकीला काच लावणे हे निश्चितच प्रशासनाच्या हलगर्जीपणाचे उदाहरण आहे. यासंदर्भात अनेक अधिकारी आणि व्हीआयपी पाहुण्यांनी तक्रारी नोंदवल्या असून, खिडक्यांना काच नसल्यामुळे अस्वस्थता वाटते, ही बाब तातडीने दुरुस्त करणे गरजेचे आहे, असे मत काही अधिकाऱ्यांनी केले. संबंधित यंत्रणांनी याची तातडीने दखल घेऊन संडास व बाथरूमच्या खिडक्यांना मजबूत व सुरक्षित काचा बसवाव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे. अन्यथा येणाऱ्या दिवसांत व्हीआयपी अधिकाऱ्यांच्या गैरसोयीमुळे विश्रामगृहाची बदनामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, बुधवार, दि. ६ ऑगस्ट २०२५

डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.
डॉ. रविराज पांडे (एम.डी.)
वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.
व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )
C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )
C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )
वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत
मो. 9890043911, 9372151186

# महापालिकेत प्रशासक बसला आणि नालेसफाई थांबली

## मनपाचा स्वच्छता विभाग निद्रावस्थेत | विजय कॉलनीतील नागरिक त्रस्त

गेल्या दोन वर्षापासून स्वच्छता विभागाचा कर्मचारी विजय कॉलनी फिरकलाच नाही. त्यामुळे कॉलनीतील सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्या मोठ्या प्रमाणात तुंबल्या आहे. पावसाळ्यात उगवणाऱ्या हिरव्या वेलांनी या नाल्या पूर्णपणे झाकून गेल्या आहेत. याबाबत महापालिकेकडे अनेकदा तक्रारी केल्या, मात्र कोणीही याची दखल न घेतल्याने येथील रहिवाशांकडून संताप व्यक्त केल्या जात आहे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि. ५ :** महानगर पालिकेचा कार्यकाळ संपला आणि मनपाचा सर्व कारभार प्रशासकाच्या हाती आला. गेल्या अडीच ते तीन वर्षापासून महानगरपालिकेच्या निवडणुका लांबणीवर पडत गेल्याने प्रशासकीय यंत्रणेचे चांगलेच पावले आहे. त्यामुळे सध्या महापालिकेत प्रशासकीय यंत्रणेची मनमानी सुरू असल्याचे चित्र दिसून येत. त्यातच मनपाचे अधिकाऱ्यांना स्वच्छतेचा विसर पडला की काय अशी परिस्थिती सध्या शहरातील व्ही.एम.व्ही. परिसरात निर्माण झाली आहे. परिसरातील विजय शिक्षक कॉलनी तर महानगरपालिकेत प्रशासक बसला तेव्हापासून नालेसफाईच बंद झाली आहे. त्यामुळे कॉलनीत अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले असून नाल्या तुंबल्याने दुर्गंधीसुद्धा पसरली आहे.

गेल्या अडीच ते तीन वर्षापासून महापालीकेत प्रशासक सुरू झाल्याने महापालिकेच्या कामकाजात मरगळ निर्माण झाली आहे. स्वच्छतेचे तीनतेरा वाजले असून मनपात प्रशासक बसला तेव्हापासून कॉलनी परिसरातील अंतर्गत नालेसफाई शंभर टक्के बंद पडली आहे. प्रत्येक वार्डात नगरसेवक सक्रिय असताना तो दर महिन्यातून एकदा आपल्या वार्डातील निदान नालेसफाई नियमित होते की नाही यावर लक्ष देऊन असायचा आता मात्र शहरातील एकही वार्डाला कोणी वाली उरला नसल्याने स्वच्छता कर्मचाऱ्यांचे चांगलेच पावले आहे नालेसफाईला ब्रेक लागल्याने लाल्या मोठ्या प्रमाणात तुंबले आहेत मी दुर्गंधी व डासांचा उप.मोठ्याप्रमाणात वाढला आहे या संदर्भात अनेकदा महापालिकेकडे तक्रारी मात्र या तक्रारींना केराची टोपली दाखविण्यात आली. आता नवनयुक्त आयुक्त सोम्या शर्मा या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देतील काय असा प्रश्न व्हिएमव्ही परिसरातील नागरिकांकडून विचारल्या जात आहे.





# गॅस रिफीलिंग व डिझेल विकणारा आरोपी अटकेत

## गुन्हे शाखा पोलिसांची कारवाई | डिझेलसह ऑटो सिलेंडर जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ५ :** नागपूरी गेट पोलिस स्टेशन हद्दीतील गुलिस्ता नगर येथे घराच्या कंपाउंड मध्ये डिझल विक्री करणाऱ्याला ताब्यात घेतले. तर दुसऱ्या घटनेत मुजफ्फरपुरा हैदरपुरा ईदगाह समोर अवैध रित्या घरगुती गॅस सिलेंडर मधून इलेक्ट्रीक मशीनच्या सहायाने ऑटोमध्ये गैस रिफीलिंग करणाऱ्या आरोपीला ताब्यात घेतले आहे. ही कारवाई गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे. नागपूरी गेट हद्दीत बऱ्याच दिवसापासून आरोपी हे अवैध धंदा करीत होते. घरगुती गैस सिलेंडरमधून गैस रिफिलिंग करून ऑटोमध्ये भरण्याचा गोरखधंदा सुरू होता.

आरोपी अब्दुल सलाम अब्दुल सत्तार (४०, रा. गुलिस्ता नगर), अनवर बेग रहिम बेग (४४, रा. मुजफ्फरपुरा) अशी आरोपीचे नाव आहे. आरोपी हे अवैधरित्या डिझल व गैस रिफिलिंगचा व्यवसाय करीत होते. ही माहिती गुन्हे शाखेच्या पथकामा मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी धाड टाकून गुलिस्ता नगरातून आरोपीकडून १५ नग प्लॉस्टिकच्या डबक्या तर हैदरापूरा ईदगाह समोरून ११ सिलेंडर ऑटो क्रमांक एमएच-२७/बीडब्ल्यू-८३४६ ऑटोमध्ये गैस रिफिलिंग करताना पकडले. पोलिसांनी आरोपीकडून इलेक्ट्रीक मशीन, वजन काटा असा एकूण १ लाख २० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनिष वाकोडे, सहायक पोलिस निरीक्षक इमरान नाईकवडे, सहायक पोलिस निरीक्षक अशोक वाटाने, युसूफ सौदागर, फिरोज खान, सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, सचिन बहाडे, प्रशांत मोहोड, नाजीमोद्दीन सय्यद, विकास गुडधे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखिल गेडाम, रणजीत गावंडे, रूपेश काळे, नरेश मोहरील यांच्या पथकाने केली आहे. आरोपींची कसून चौकशी केली जात आहे.

# अल्पवयीन मुलीशी लग्न; पतीविरुद्ध गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ५ :** शिरजगाव कसबा पोलिस स्टेशन हद्दीत एका २२ वर्षीय युवकाने अल्पवयीन मुलीचे अपहरण करून मंदिरात लग्न लावले. यामुळे ती मुलगी गर्भवती झाली आणि तिने एका बाळीस जन्म दिला. रुग्णालयातील प्रशासनाने आईचे वय कमी असल्याचे लक्षात आल्यावर पोलिसांना माहिती दिली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला.

२२ नोव्हेंबर २०२३ रोजी आरोपी युवकाने १७ वर्षीय ९ महिन्यांच्या मुलीला शाळेतून मोटारसायकलवरून अपहरण केले. त्यानंतर लखनवाडी येथील एका मंदिरात जाऊन मंगळसूत्र बांधून तिच्याशी लग्न केले. दोघे एकत्र राहू लागले आणि आरोपीने अनेकवेळा तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध स्थापित केले. याचा परिणाम म्हणून मुलगी गर्भवती झाली आणि नंतर तिला जिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले. रुग्णालयातील प्रशासनाने तिचे आधार कार्ड तपासून आई अल्पवयीन असल्याचे नोंदवले. ही माहिती गाडगेनगर पोलिसांना देण्यात आल्यानंतर पीडितेच्या पतीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ (लैंगिक अत्याचार) आणि पोस्को कायद्याखाली गुन्हा नोंदविण्यात आला. गाडगेनगर पोलिसांनी प्राथमिक चौकशी करून हा केस शिरजगाव कसबा पोलिस स्टेशनकडे हस्तांतरित केला आहे.

# शहरात ३०० किलोहून अधिक प्लास्टिक जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ५ :** शासनाच्या प्लास्टिकबंदी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अमरावती महानगरपालिकेने आज शहरातील तीन प्रमुख ठिकाणी मोठी धडक कारवाई करत तब्बल ६०० किलोहून अधिक प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य जप्त केले. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनात ही विशेष मोहीम राबविण्यात आली. मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या या कारवाईत गुलिस्तान नगर, महावीर कॉम्प्लेक्स आणि मोरबाग परिसरातील दुकानांवर छापे टाकण्यात आले. कारवाई दरम्यान खालील प्रमाणे प्लास्टिक साहित्य जप्त करण्यात आले. यामध्ये अब्दुल सलाम अब्दुल सत्तार याच्याकडून १५ पोते, पवन कुकरेजा याच्याकडून १९ पोते व रतन खत्री यांच्याकडून ३२ पोते प्लास्टीक जप्त करण्यात आलेले आहे.

# हुमणी अळीचा कहर; सोयाबीन पिकाला मोठा फटका

## कृषी विभागाने उपाययोजना करण्याची गरज

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी





**अमरावती, दि. ५ :** माहुली जहांगीर परिसरातील शेकडो एकरातील सोयाबीन पिकावर हुमणी अळीने अक्षरश: हल्ला चढवला असून पिकाचे जवळपास ७० टक्के नुकसान केले आहे.शेतकऱ्यांचे बहरलेले पीक हुमणी अळीने उध्वस्त केले असून यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. माहुली जहागीर येथील शेतकरी पंजाबराव यावले यांचे तीन एकरातील पीक उत्तम स्थितीत असताना अचानक वाढलेल्या हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे पाने, कोवळया शेंगा आणि रोपे जलद गतीने नष्ट होत आहेत. सध्या पिकाची वाढ निर्णायक टप्प्यावर असताना हा प्रादुर्भाव झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. कृषी सहाय्यकांनी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले असले तरी, प्रादुर्भावाची तीव्रता पाहता येत्या काही दिवसांत पिकाचे शंभर टक्के नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शेतकरी वर्गाने हुमणी अळीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार फवारणी व अन्य उपाय तात्काळ करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# चिंचोली ग्रामपंचायतमध्ये ग्रामसेवकाचा भ्रष्टाचार!

## उपसरपंच विशाल बमनोटे यांची प्रशासनाला तक्रार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. ५:** तालुक्यातील चिंचोली ग्रामपंचायत येथे ग्रामसेवक महेंद्र शेलार यांच्या काळात प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ग्रामपंचायत उपसरपंच विशाल बमनोटे यांनी केला आहे. ग्रामसेवक शेलार यांच्या कारभाराची चौकशी करून फसवणुकीचा फौजदारी गुन्हा दाखल करुन तत्काळ निलंबित करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत चिंचोली येथील तत्कालीन ग्रामसेवक महेंद्र शेलार यांनी कार्यरत असताना ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना कॅशबुक व्यवहार दाखविण्यास टाळाटाळ केली. दरम्यान गावाने जमा केलेली भाडेपट्टी व पाणीपट्टी कर तसेच जानकी माता यात्रेचा नगदी जमा केलेला कर व भंगार विकून आलेले पैसे खात्यात जमा केले की नाही, याची विचारणा केली असता त्यांनी आम्हाला भाडेपट्टी, पाणीपट्टी कर पुष्कळ ठिकाणी कमी असल्याचे व खाते जुळत नसल्याचे सांगीतले, तसेच यात्रेचा कर व हर्रास न करता भंगार विकून कोणताच निधी सामान्य फंडात जमा न केल्याचे सांगीतले, तसेच पाच दिव्यांगाचा निधीसुध्दा पूर्णपणे काढला असल्याचे सांगीतले, तसेच आमचा मासिक मिटींगभत्ता व मानधनसुध्दा त्यांनी परस्पर काढल्याचे निदर्शनात आले असल्याचे तक्रार अर्जात नमूद आहे. दरम्यान ग्रामपंचायत कागदपत्राची पाहणी केली असता ग्रामसेवक महेंद्र शेलार यांनी अनेक खोटी बिले लावून खूप ठिकाणी पैसे उकळल्याचे समजले, तसेच ऑडीटरनेसुध्दात्यांची पुष्कळ बिले नामंजूर केल्याचे दिसून आले असल्याने अधिक तपासात शासनाच्या निधीमध्ये अफरातफर करून ग्रामसेवक शेलार यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग करुन सरकारी पैशाचा अपहार केल्याचे चौकशीत समोर आले.

पंचायतसमिती प्रशासनाने त्यांची सेवानिवृत्ती का मंजूर केली, असा सवाल दिलेल्या तक्रारीत चिंचोली उपसरपंच विशाल बमनोटे यांनी उपस्थित केला आहे. शेलार यांनी ग्रामपंचायत, गावातील नागरिक, पंचायतसमिती, जिल्हा प्रशासनाची व एकंदरीत शासनाची दिशाभूल केली आहे. सदर भ्रष्टाचार प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन वरिष्ठ स्तरावर स्वतंत्र चौकशी करून लाखो रुपयांच्या भ्रष्टाचाराची रिकव्हरी संबंधित ग्रामसेवक महेंद्र शेलार यांच्याकडून करावी व फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशा मागणीची लेखी तक्रार जिल्ह्याचे पालकमंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, आमदार प्रताप अडसड व पं. स. यांच्याकडे चिंचोली ग्रा. पं. च्यावतीने करण्यात आली आहे.

# गव्हाचा साठा संपला; आता रेशनमध्ये ज्वारी मिळणार

## सप्टेंबरपासून रेशनमध्ये गव्हाची कपात | पुरवठा विभागाकडून ८९,७३१ क्विंटल ज्वारीची खरेदी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ५ :** जिल्ह्यात गव्हाचा साठा संपुष्टात आला असून, आता गावपातळीवरील शासकीय स्वस्त धान्य दुकानात सप्टेंबरपासून गव्हाऐवजी ज्वारीचा समावेश रेशन वाटपात करण्यात येणार आहे. या अनुषंगाने जिल्हा पुरवठा विभागाकडून तब्बल ८९,७३१ क्विंटल ज्वारी खरेदी करण्यात आली आहे. त्यामुळे आता अंत्योदय गटातील लाभार्थ्यांना दरमहा १५ किलो ज्वारी, तर इतर प्राधान्य गटातील लाभार्थ्यांना 1 किलो ज्वारी मिळणार आहे.





जिल्ह्यात सध्या ५,०२,५४२ रेशनकार्डधारक असून, त्यांना जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांचे धान्य एकत्रित स्वरूपात आधीच वितरित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील रेशन वाटप संरचनेनुसार अंत्योदय गटात १,२८,२०७ कार्डधारक व

४,७८,५४८ लाभार्थी असून प्राधान्य गटात ३,७४,३३५ कार्डधारक व १५,१२,१३० सदस्य आहे. यामध्ये अंत्योदय गटातील कुटुंबांना दरमहा २० किलो तांदूळ व १५ किलो गहू मिळत होते. परंतु, सप्टेंबरपासून त्यात बदल करीत १५ किलो गव्हाऐवजी ज्वारी देण्यात येणार आहे. प्राधान्य गटातील लाभार्थ्यांना दरमहा प्रत्येकी १ किलो गहू आणि ४ किलो तांदूळ दिले जात होते, आता यात गव्हाऐवजी १ किलो ज्वारी व ४ किलो तांदूळ असा समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, यावेळी जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांचे धान्य एकत्र देण्यात आले. त्यामुळे अंत्योदय कुटुंबांना १०५ किलो आणि प्राधान्य गटातील व्यक्तींना 15 किलो धान्य मिळाले आहे. त्यामुळे पुढील टप्पा सप्टेंबर ते नोव्हेंबर असा असणार आहे का, यात मात्र संभ्रम आहे.

## थोडक्यात

### अल्पवयीन युवतीला फूस लावून पळविले

**चांदूर रेल्वे :** एका १७ वर्षीय युवतीला अज्ञाताने फुस लावून पळवून नेल्याची घटना चांदूर रेल्वे पोलिसात घडली. याबाबत युवतीच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून चांदूर रेल्वे

### दुचाकी अनियंत्रित होवून अपघात

**मोर्शी :** घराकडे परत येत असलेल्या युवकाची भरधाव दुचाकी अनियंत्रित होवून अपघात झाला. त्यात अनुज नंदू ततंरपाळे (१९, रा. पुण्य नगरी, मोर्शी) हा जखमी झाला. त्याच्या दुचाकीचेही नुकसान झाले. मोर्शी पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला.

### अल्पवयीन युवतीसोबत लग्न; बाळाला दिला जन्म

**शिरजगाव कसबा :** शाळकरी विद्यार्थीनीला दुचाकीवर बसवून नेत तिच्यासोबत मंदिरात मंगळसूत्र घालून युवकाने लग्न केले. दरम्यान तिच्यासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यातून ती गर्भवती राहिली. तिला जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल केले असता, तिने एका मुलीला जन्म दिली. दरम्यान तर अल्पवयीन असल्याचे लक्षात आले. तिने शिरजगाव कसबा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी प्रदीप संतोष मोरे (२२) याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### बैल बांधण्याच्या वादातून एकाला मारहाण

**चिखलदरा :** पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या राहू येथे बैल (गोरा) बांधण्याच्या कारणा वरून घरासमोरच राहणाऱ्या नातेवाईकांनी एकाला मारहाण करीत जखमी केले. जखमी सुखराम पिलाजी कास्देकर (५८) याच्या तक्रारीवरून पोलिसांनी चौघां विरुद्ध गुन्हा दाखल केला.

### पैशाच्या वादातून महिलेला मारहाण

**वरुड :** दोन वर्षापुर्वीचे मजुरीचे अडीचशे रुपये तुझ्या आईकडे बाकी आहेत. त्याबद्दल तुझ्या आईला निरोप दे, असे फिर्यादीने २८ वर्षीय युवतीला सांगीतले. मात्र तिने उलट उत्तर देत महिलेसोबत वाद घालत तिच्या डोक्यावर काठीने वार करीत जखमी केले. ही घटना बेनोडा येथे घडली. महिलेच्या तक्रारीवरून बेनोडा पोलिसांनी युवतीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### मुल होत नाही म्हणून विवाहितेचा छळ

**वरुड :** मुल होत नाही. तू वांझोटी आहे, असे म्हणत पतीसह सासरच्यांनी विवाहितेचा छळ सुरू केला. घटस्फोट दे अन्यथा गच्चीवरून ढकलून देईन अशी धमकी दिली. याबाबत विवाहितेने दिलेल्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी पती अंकीत विजय भोजने (३५), विजय बापुराव भोजने (६५) व एक महिला तिघेही रा. मोर्शी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### मांगीलाल प्लॉट परिसरात घरफोडी

**अमरावती :** शहरातील मांगीलाल प्लॉट परिसरात एका महिलेला पुण्यास गेलेल्या काळात तिच्या बंद घराचे कुलूप तोडून घरात शिरून चोरट्यांनी 2 लाख रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. याप्रकरणी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी ही मुलीसोबत पुण्याला गेली होती. त्यावेळी तिचे घर बंद होते. दरम्यान २८ जुलै रोजी तिच्या शेजाऱ्यांनी तिला फोन करून तुझ्या घरात चोरी झाली आहे. फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस तुझ्याशी बोलू इच्छित आहेत, असे सांगीतले. त्यांनी पोलिसांशी बोलणे केले असता, त्यांनी माहिती दिली, मंथन वाकोडे (२१), ऋतिक चव्हाण (२२) आणि आकाश कंगाले (२५) तिघेही रा. अमरावती यांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून दोन एलईडी टीव्ही जप्त करण्यात आले आहेत.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
२
अमरावती, बुधवार, दि. ६ ऑगस्ट २०२५

## थोडक्यात

### मोबाईल घेवून काढला पळ

**अमरावती :** सांगली येथे जाण्यासाठी बसमध्ये चढत असलेल्या एका आजारी व्यक्तीला उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्याची बतावणी करीत एका अनोळखी व्यक्तीने ऑटोत बसवून कॅम्प चौकाकडे नेले. तेथे फोन करण्यासाठी म्हणून त्याने त्या व्यक्तीचा मोबाईल घेतला व तेथून पळ काढला. या प्रकरणी संतोष रामराव गव्हाणे (४९, रा. यवतमाळ) यांनी कोतवाली पोलिसात तक्रार दिली. चोरून नेलेल्या मोबाईलची अंदाजे किंमत ५ हजार रुपये आहे.

### दुचाकीच्या धडकेत पादचारी महिला जखमी

**अमरावती :** घरोघरी धुणीभांडी करणारी महिला घरकामासाठी पायदळ जात असताना यशोदानगर करून आलेल्या एका भरधाव दुचाकीने तिला धडक दिली. त्यात ती गंभीर जखमी णाली. तिच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महिलेच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दुचाकीला चार चाकीची धडक

**अमरावती :** दुचाकीने जात असलेल्या युवकाला भरधाव चार चाकीने (एमएच २७-बीव्ही ४००३) धडक दिली. त्यात दुचाकीचे नुकसान झाले. ही घटना जिल्हा स्टेडीअमसमोर घडली. याबाबत शुभम गणेशराव खवळ (२९) यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी चार चाकीच्या चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### कॉटन मार्केटमधून दुचाकी चोरी

**अमरावती :** कॉटन मार्केटमध्ये भाजीपाला आणायला गेलेले श्रीकृष्ण आत्मारामजी ढोके (४२) यांची गेटच्या बाहेर असलेली दुचाकी (एमएच २७-एएल ८७६१) अज्ञाताने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत १० हजार रुपये होती. फिर्यादीच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### स्टंटबाजी करणाऱ्या दोन युवकांवर गुन्हा

**अमरावती :** भातकुली येथील आठवडी बाजारात स्टंटबाजी करणाऱ्या दोन युवकांविरुद्ध भातकुली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अब्दुल आरीफ अब्दुल वारीस (२८) व अब्दुल इरफान अब्दुल सत्तार (२८) अशी गुन्हा दाखल झालेल्या युवकांची नावे आहेत.

### विनापरवाना दारूची वाहतूक; पोलिसांची कारवाई

**अमरावती :** विना परवाना दारूची वाहतूक करताना नांदगाव पेठ पोलिसांनी कारवाई करीत एका दुचाकीसह ४४ हजार ६०० रुपयांची दारू जप्त केली. ही कारवाई जावर्डी ते जळका शहापूर मार्गावर करण्यात आली. कारवाईदरम्यान दुचाकी (एमएच २७-डीपी १३३९) चालक फरार झाला.

### दोघांच्या वादात मध्यस्ती करणाऱ्यावर चाकूहल्ला

**अमरावती :** दोघांचा वाद सुरू असताना कलीम खान इम्रान खान (४२) यांनी मध्यस्ती केली. त्या वेळी चिडलेल्या एका महिलेस दोन युवकांनी त्यांना चाकू मारून व लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत जखमी केले.

### घरासमोरून दुचाकी लंपास

**वरुड :** नेहमीप्रमाणे रात्री घरासमोर फिर्यादी निलेश ओंकरराव पुंड (४४) यांनी दुचाकी (एमएच २७-सीडी ७२८२) अंगणात उभी केली होती, ती सकाळी दिसून आली नाही. ही घटना बेनोडा येथे घडली.

# शेतात सुरु होता 'एक्का-बादशहा' जुगार!

## अंजनगाव सुर्जी पोलिसांचा छापा | १५ जुगाऱ्यांना अटक, साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. ५ :** शहरापासून काही अंतरावर असलेल्या शिरजगाव रस्त्यावरील एका शेतात सुरू असलेल्या 'एक्का-बादशहा' जुगाराच्या अड्ड्यावर अंजनगाव सुर्जी पोलिसांनी रविवारी रात्री छापा टाकत 15 जणांना रंगेहाथ अटक केली. या कारवाईत - रोख रक्कम, गंजिफा पत्ते आणि मोटारसायकली असा एकूण ३ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

३ ऑगस्ट रोजी अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी गस्त घालत असताना, त्यांना गोपनीय माहिती मिळाली की शिरजगाव रस्त्यावरील प्रेम रॉय यांच्या शेतात काही जण जुगार खेळत



आहेत. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ पथक रवाना करत घटनास्थळी धाव घेतली. तेथे पोहोचल्यावर पोलिसांना १० ते १५ जण शेतात जमिनीवर गोलाकार बसून 'एक्का बादशहा' जुगार खेळताना आढळले. पंचासमक्ष खात्री करून पोलिसांनी १५ जणांना अटक केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये प्रविण तायडे (हंतोड़ा), संतोष इंगळे (भीमनगर), आकाश राऊत (मातंगपुरा), हरविंद इंगळे (तहसील रोड), रोहित सपकाळ (सलीम नगर), ऋषिकेश नांदुरकर, प्रदीप विजयकर, जुबेर कोटेकर, शेख जाकीर, मनोज गौर, दीपक कनोजिया, शरीफ शफी खा, विवेक मोरे, प्रमोद इंगळे आणि अतुल इंगळे यांचा समावेश आहे. आरोपींच्या ताब्यातून रोख २६१०० रुपये, अंदाजे ५२ गंजिफा पत्त्यांचे संच, इतर साहित्य आणि पाच मोटरसायकली (एकूण किंमत - ३ लाख रुपये) असा एकूण ३,३१,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सूरज तेलगोटे यांच्या नेतृत्वात पार पडली. कारवाईत रवि राठोड, आकाश रंगारी, अमित घाटे, शुभम मारकड, प्रमोद चव्हाण, युवराज सोळंके, मोहसीन पठाण, तसेच चालक अक्षय शेळके व विलास रावते यांचा सक्रिय सहभाग होता. शहरापासून दूर असलेल्या शेतात सुरू असलेल्या जुगाराच्या अड्ड्यावर झालेली ही कारवाई गुन्हेगारीवर मोठा आघात ठरली आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.



## सय्यद नवेद यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. ५ :** अमरावती जिल्ह्यातील प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ते तथा संपादक सय्यद नवेद सय्यद बासित यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली होती. आज रोजी हा पुरस्कार युनिव्हर्सल टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्स मार्फत आयोजित नॅशनल विदर्भ आर्ट्स, सोशल कॉन्फरन्स आणि पुरस्कार सोहळा, नागपूर येथे प्रदान केला गेला हा गौरव त्यांना सामाजिक कार्य, संस्कृती आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दिला गेला.आज सकाळी १०.३० वा सदर कार्यक्रम मधुराम ऑडिटोरियम, विदर्भ हिंदी लिटरेरी कॉन्फरन्स, फत्तेचंद मोर हिंदी भवन, राणी झांसी चौक, वर्धा रोड, नागपूर येथे पार पडला.

सदर पुरस्कार सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आणि भारत सरकारचे 'पद्मश्री' पुरस्कार विजेते डॉ. रवींद्र कोल्हे (मेळघाट-अमरावती) यांच्या हस्ते प्रदान केला गेला.या सन्मानामुळे अमरावती जिल्ह्यातून समाजकार्यात सातत्याने झगडणाऱ्या व्यक्तींच्या कार्याला नवी ओळख आणि प्रेरणा मिळणार आहे. युनिव्हर्सल टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि नॅशनल विदर्भ टीम यांच्यातर्फे मा. सय्यद नवेद यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे.

## ७ हजारांचे साहित्य चोरी

**कुऱ्हा :** गेल्या काही दिवसापासून चोरीच्या घटनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. काही कामानिमित्त नागपूरला गेलेल्या महिलेच्या घरात चोरी करीत अज्ञाताने रोख ५ हजार रुपये व २ हजारांचे डोरले असा एकूण ७ हजारांचा ऐवज चोरून नेला. याबाबत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून कुऱ्हा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला. ही घटना चांदूर रेल्वे तालुक्यातील आमला विश्वेश्वर येथे घडली. या घटनेचा पुढील तपास कुऱ्हा पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहे.

## अमरावती जिल्ह्यातील बालगृहाचे अनुदान त्वरित मिळावे

### शिवसेना उबाठा नेत्यांना निवेदन

**दर्यापूर, दि. ५ :** अमरावती जिल्ह्यातील महिला व बाल विकास विभाग अंतर्गत चालणाऱ्या निराधार निराश्रीत बालकांचे संगोपन करणाऱ्या बालगृहांना गेल्या १८ महिन्यापासून शासनाचे अनुदान मिळाले नसल्याची बाब शिवसेना जिल्हाप्रमुख पराग गुळदे यांच्या लक्षात आले असता ते सुद्धा त्यांचे सहकारी नरेंद्र पडोळे मनोज कडू प्रफुल भोजने दर्यापूर तालुका प्रमुख प्रमोद धनोकार हे मुंबई येथे बैठकीच्या दरम्यान गेले असता त्यांनी युवा सेना प्रमुख माजी मंत्री आदित्य ठाकरे शिवसेना नेते पश्चिम विदर्भ प्रमुख भारतीय कामगार सेना अध्यक्ष खासदार अरविंद सावंत



साहेब यांना भेटून अशा आशयाचे निवेदन दिले व बालगृहांना त्वरित अनुदान मिळण्यासंदर्भात लेखी निवेदनाद्वारे विनंती केली बालगृहाच्या अनुदानाची दखल शिवसेनेने घेतली त्या प्रसंगी शिवसेना नेते, युवा सेना प्रमुख, आमदार आदित्य ठाकरे साहेब व शिवसेना नेते, पच्छीम विदर्भ सम्पर्क प्रमुख, भारतीय कामगार सेना अध्यक्ष, खासदार अरविंद सावंत साहेब यांना निवेदन दाखल केले नियोजन देते वेळी शिवसेना जिल्हा प्रमुख पराग गुळदे, नरेंद्र पडोळे, मनोज कडु, उपजिल्हा प्रमुख प्रफुल्ल भोजने, तालुका प्रमुख प्रमोद धनोकार दर्यापूर, शिवराज चौधरी, मयुर गव्हाणे आधी अमरावती जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते अमरावती जिल्ह्यातील बालगृहाचे अनुदान मिळावे म्हणून शिवसेनेने प्रयत्न केले निवेदन दिले त्याबद्दल महिला व बालविकास संस्था प्रमुख व कर्मचारी संघटना अमरावती जिल्हा प्रमुख यांनी सर्वांचे अभिनंदन केले

## अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'ओपन टू ऑल' फेरी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ५ :** केंद्रीय अकरावी प्रवेश प्रक्रियेअंतर्गत चौथ्या फेरीअंती ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाले नाही अशा विद्यार्थ्यांसाठी ओपन टू ऑल फेरी राबविली जात आहे. याकरिता बुधवारी गुणवत्तायादी प्रसिद्ध केली जाणार आहे. चौथ्या फेरीअंती अमरावती विभागात १,३२,५४ विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित झाला आहे. इयत्ता ११ वीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत चौथी फेरी संपल्याने अमरावती विभागातील विविध जिल्ह्यांमध्ये एकूण १,३२,५४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत, अशी माहिती ११ वी ऑनलाइन प्रवेश समितीचे समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी दिली. त्यामुळे आता ज्या विद्यार्थ्यांना अद्यापही प्रवेश मिळालेला नाही, त्यांच्याकरिता सर्व विद्यालयांमध्ये ओपन टू ऑल फेरीचे आयोजन ४ ते ५ ऑगस्ट दरम्यान करण्यात आले आहे. याची गुणवत्तायादी ६ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. सर्वाधिक प्रवेश अमरावती जिल्ह्यात तर सर्वात कमी वाशिम जिल्ह्यात झाले आहेत.

**उद्या होणार गुणवत्तायादी प्रसिद्ध**

## मानवतेचा नाजूक क्षण : पश्चिम बंगालच्या प्रवाशाचे धामणगावात अंत्यसंस्कार

### लहुजी शक्ती सेना व दत्तापूर पोलिसांचा पुढाकार



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

धामणगाव रेल्वे

**धामणगाव रेल्वे, दि. ५ :** आजच्या गतीशील युगात माणुसकी हरवत चाललेली असताना, धामणगावात घडलेली एक घटना मन हेलावून टाकणारी ठरली. वेस्ट बंगालमधील मालदा जिल्ह्याचा रहिवासी सुभाष संचो उराव (वय 45) हे रोजगाराच्या शोधात पुण्याकडे रेल्वेने प्रवास करत होते. दरम्यान, त्यांचा मृतदेह धामणगाव रेल्वे स्थानकाजवळील भडभड्या पुलाखाली आढळून आला.

घटनेची माहिती मिळताच दत्तापूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत चार किलोमीटरच्या अंधाऱ्या रस्त्यातून मृतदेह बाहेर काढला. मृतकाच्या खिशात सापडलेल्या एका चिठ्ठीच्या आधारे त्याच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यात आला. मात्र कुटुंब अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत असल्याने अंत्यसंस्कारासाठी प्रवास करणे अशक्य होते.

यावेळी लहुजी शक्ती सेनेचे तालुका अध्यक्ष विनोद तिरले, महाराष्ट्र उपाध्यक्ष रंजीत पाटेकर व समाजसेवक सुरज मेश्राम यांनी पुढाकार घेतला. पत्रकार संतोष वाघमारे यांच्यामुळे ही माहिती लहुजी शक्ती सेनेपर्यंत पोहोचली. महावीर ओसवाल ट्रस्टनेही अंतिम संस्कारासाठी लागणारी मदत दिली. दत्तापूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार गिरीश ताथोड, पोलीस कर्मचारी मनोज धोटे, संदीप तिरपुडे व अभिजीत जाधव यांनी नातेवाईकांना रेल्वे स्थानकापर्यंत आणण्याची जबाबदारी उचलली. त्यानंतर हिंदू रितीरिवाजांनुसार स्मशानभूमीत विधीवत अंतिम संस्कार करण्यात आले. या वेळी लहुजी शक्ती सेनेचे पदाधिकारी, दत्तापूर पोलिस, समाजसेवक अक्षय खळतकर, सोनू खान, सुरज मेश्राम यांच्या उपस्थितीत सामूहिकरीत्या सरण रचण्यात आले आणि मृतकाच्या कुटुंबियांच्या हस्ते अग्नी देण्यात आला.

## युवक कॉंग्रेसचे रहाटगाव परिसरात स्वच्छता अभियान

### साफसफाई सोबतच स्वच्छतेबाबत केली जनजागृती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ५ :** शहरात ठिकठिकाणी साचलेला कचरा, मनपाच्या दुर्लक्षामुळे वाढलेली अस्वच्छता व काही निवडक ठेकेदारांच्या मनमानी कारभारा विरुद्ध अमरावती शहर युवक कॉंग्रेसद्वारे 'गांधीगारी' पद्धतीने आवाज उठवत विशेष स्वच्छता अभियान राबविले आहे. स्वच्छतेच्या प्रश्नावर महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधणे, लोकसहभागातून परिसर स्वच्छता करणे तसेच स्वच्छते बाबत जनजागृती करणे हे या अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

जननायक राहुलजी गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १९ जून पासून या अभियानाची सुरुवात करण्यात आली होती. महिनाभरापासून सातत्याने शहराच्या




विविध भागांत युवक कॉंग्रेसतर्फे हा उपक्रम अविरतपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत दि. ३ ऑगस्ट, रविवार रोजी रहाटगाव येथील आनंद बौद्ध विहारामागील परिसराची साफसफाई करण्यात आली. या परिसरात मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग निर्माण झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. महापालिका प्रशासनाच्या भोंगळ कारभारावर यावेळी स्थानिक नागरिकांनी तीव्र रोष व्यक्त केला. यावेळी रहाटगाव येथील आनंद बुद्ध विहारामध्ये युवक कॉंग्रेसच्या वतीने परिसरातील लहान विद्यार्थ्यांना स्वच्छता आणि साफसफाई बाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना घरातील स्वच्छतेप्रमाणेच परिसराची स्वच्छता राखण्याचे महत्व समजावून सांगण्यात आले. यावेळी ओला व सुका कचरा यांचे योग्य प्रकारे वर्गीकरण कसे करावे, याबाबतही माहिती देण्यात आली. स्वच्छता ही प्रशासनाची जबाबदारी असून, नागरिकांचा मूलभूत अधिकारही आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. युवक कॉंग्रेसकडून लोकसहभागातून विविध प्रभागांमध्ये राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता उपक्रमांची माहितीही मुलांना देण्यात आली. याचे अनुकरण प्रत्येकाने करावे, असे आवाहन सुद्धा यावेळी करण्यात आले.

परिसरातील नागरिकांनीही युवक कॉंग्रेसच्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद दिला व युवक कॉंग्रेसच्या अभियानाचे स्वागत केले. यावेळी मनपाचे माजी शिक्षण सभापती गोपाल धर्माळे, शहर महिला कॉंग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, कपिल गिरी, बच्चु भालेराव, वंश मते, अक्षय वानखडे, सुरज इंगळे, सचिन मोहोड, अनिल हराळ, वैशाली खडसे, कोमल वानखडे, दिक्षा मेटांगे, प्राजक्ता गावंडे, प्रतिक्षा मेटांगे व परिसरातील इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मेळघाटच्या अतिदुर्गम भागातील शाळा कधी डिजीटल होणार?

## वसतिगृहांमध्ये भौतिक सुविधांची वानवा | आदिवासी विभागाचे दुर्लक्ष

दै. अजिंक्य भारत | भारत वरठे

**धारणी, दि. ५ :** एकीकडे शासनाकडून करोडो रूपये आदिवासी समाजाच्या विकासासाठी मिळत असलातरी या निधीचे योग्य नियोजन होत नसल्यामुळे आदिवासी भागाचा विकास पाहिजे तसा झाला नाही. शैक्षणिक बाबतीत मात्र फारच दुर्लक्ष होताना दिसत आहे. एरव्ही बहुतांश जिल्हा परिषद शाळा डिजीटल करण्यास शासनाकडून झालेल्या आहेत परंतु मेळघाटातील अतिदुर्गम भागातील शाळा मात्र अद्यापही डिजीटल झालेल्या दिसून येत नाही. त्या कधी होणार? याशिवाय निवासी बसतीगृहात सुविधांची वाणवा पाहायला मिळते. वचाच प्रत्यय नागापूर येथे एका आदिवासी आश्रम शाळेत घडला.

पाण्याची टाकीचे भिंत कोसळून विधील एका विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू आणि तीन विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

मेळघाट मधील अतिदुर्गम भागातील प्रत्येक विद्यार्थी शेवटचा घटक म्हणून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी विभाग विविध योजना राबवित आहे त्यात शासकीय आणि खासगी निवासी आश्रम शाळांवर भरपूर निधी खर्च होत



आहे. दिलेला निधी भौतिक सुविधांवर खर्च झाल्याची उपयोगीता प्रमाणपत्रानुसार आढावा घेणे आणि तपासणी करणे अत्यंत महत्त्वाची आहे.

### प्रमुख मागण्या

उत्कृष्ट व पौष्टिक आहार, पक्ष्या टिकाऊ दर्जा असलेल्या सुसज्ज सर्व सोईयुक्त सुरक्षित वातानुकूलित भव्य आणि मोकळया इमारती, प्रत्येक विद्यार्थ्यांला स्वतंत्र आणि वैयक्तिक कॉट गादी, स्वच्छ धुतलेले ब्लॅकेट आणि मच्छरदाणी, रात्रीच्या अभ्यासाकरिता प्रोजेक्टर, स्पर्धात्मक परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन, विद्यार्थ्यांच्या संख्येत मोकळी इमारत पिण्याच्या पाण्यासाठी पक्की टाकी आणि त्यातून स्वच्छ आणि भरपूर पाण्याचा पाणीपुरवठा, खेळण्यासाठी मोकळे मैदान आणि भरपूर खेळ साहित्य आदी मागण्यांबी पूर्तता करावी अशी मागणी, भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाचे अमरावती ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष सुखदेव पवार यांनी केली आहे.

### अन्यथा ती दुर्दैवी घटना टळली असती

काही दिवसापूर्वी चिखलदरा तालुक्यातील नागापूर येथे पाण्याच्या टाकीची भिंत कोसळून एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला तर बार विद्यार्थिनी जखमी झाल्या, वेळीच शाळा प्रशासनासह शासनाने लक्ष दिले असते तर ही घटना टाळता आली असती.

## महत्वाचे



## दिग्रसच्या बुटले महाविद्यालयात 'नशामुक्त भारत अभियान'

दिग्रस : दिग्रस येथील बा. बु. कला, ना. भ. वाणिज्य व बा. पा. विज्ञान महाविद्यालयात 'नशामुक्त भारत अभियान' आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त व्यसनमुक्तीपर व्याख्यान, प्रतिज्ञा आणि स्वाक्षरी अभियान राबवण्यात आले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. ए. आर. लाडोळे होते. त्यांच्या हस्ते 'नशामukt भारत' अभियानाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. ए. डी. जाधव यांनी व्यसनाधीनतेच्या दुष्परिणामांवर व्याख्यान देत विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. याच कार्यक्रमात, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या जीवनकार्यावर यावेळी प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. व्ही. डी. जाधव, प्रा. डॉ. एम. एम. जगताप आणि प्रा. पी. व्ही. गावंडे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## अणे महिला महाविद्यालयात विद्यार्थी विकास अधिका-यांची कार्यशाळा

**यवतमाळ :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मान्यवरांनी एका जिल्हास्तरीय कार्यशाळेत केले. स्थानिक लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयात ही कार्यशाळा पार पडली. विद्यार्थी विकास अधिकारी आणि समान संधी कक्ष समन्वयकांसाठी आयोजित या कार्यशाळेचे उद्घाटन अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र भांडवलकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी एज्युकेशन सोसायटीचे सचिव धनंजय पांडे होते. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी विद्यापीठाच्या विविध योजनांची माहिती दिली, तर जिल्हा समन्वयक डॉ. निखिलेश नलोडे यांनी विद्यार्थ्यांना युवा महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात धनंजय पांडे यांनी, विद्यापीठाने जिल्ह्यासाठी दिलेल्या एक कोटी रुपयांच्या निधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे सांगितले. दोन सत्रांत झालेल्या या कार्यशाळेत डॉ. प्रसाद खानझोडे आणि डॉ. राजीव बोरकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. दुर्गेश कुंटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर गटकर तर आभार प्रदर्शन डॉ. ज्वाला नागले यांनी केले. यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.



## यवतमाळात संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती उत्साहात साजरी

यवतमाळ : संत परंपरेतील थोर संत आणि शैव-वैष्णव भेद मिटवणारे संत शिरोमणी नरहरी महाराज यांची जयंती यवतमाळात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात सोनार समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विटभट्टी परिसरातील श्री नरहरी महाराज मंदिरात सकाळी श्रींच्या मूर्तीचा विधीवत अभिषेक, पूजा आणि आरती करण्यात आली. यावेळी त्यांच्या चरित्राचे स्मरण करून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला. कार्यक्रमानंतर तीर्थप्रसाद आणि काल्याचे वाटप करण्यात आले. तसेच, सोनार समाज भवनातही श्रींच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. संत नरहरी महाराजांची शिकवण अंगीकार करण्याचा संकल्प यावेळी समाज बांधवांनी केला. या कार्यक्रमाला सोनार सेवा महासंघ, संत नरहरी सोनार महाराज ट्रस्ट, सोनार कारागीर संघटना आणि भारतीय स्वर्णकार संघाचे पदाधिकारी यांच्यासह सोनार समाजातील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमामुळे शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

## 'कुत्रा बांधून ठेवा' म्हटल्याच्या रागातून जमावाचा हल्ला

**उमरखेड :** 'तुमचा कुत्रा बांधून ठेवा' असे म्हटल्याच्या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून सात जणांच्या जमावाने एका व्यक्तीला व त्याच्या भावाला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना २ ऑगस्ट रोजी दयानंद कॉलनी येथे घडली. याप्रकरणी पोलिसांनी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. भागोराव रघुनाथ मते यांच्या तक्रारीनुसार, आरोपी रघुनाथराव कदम यांचा कुत्रा त्यांच्या अंगावर धावून आल्याने त्यांनी त्याला बांधून ठेवण्यास सांगितले. याचा राग आल्याने आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून भागोराव आणि त्यांचे भाऊ शाम कदम यांना थापडाबुक्क्यांनी मारहाण केली व सायकल अंगावर फेकून जखमी केले. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये नियोजनाचा बोजवारा

## चिमुकले खेळाडू तळपत्या उन्हात खेळले कबड्डी, 'खेळा'च्या नावाखाली विद्यार्थ्यांचे हाल

आर्णी, दि. ०५ प्रतिनिधी

**आर्णी येथील तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धांमध्ये, क्रीडा संयोजकांच्या ठिसाळ नियोजनाचा फटका शेकडो विद्यार्थ्यांना बसला. तळपत्या उन्हात, गरम मॅटवर चिमुकल्या खेळाडूंना दिवसभर खेळावे लागले. पिण्याच्या पाण्याची आणि मंडपाचीही सोय नसल्याने, या स्पर्धेच्या आयोजनावर तीव्र संताप व्यक्त होत आहे.**





तालुका क्रीडा संकुल, आर्णी येथे मंगळवारी (दि. ५) १७ वर्षांखालील मुले व मुलींसाठी शालेय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये लोणबेहळ, महाळुंगी, अंजनखेड, जवळा, लोणी, म्हसोला, सुकळी आणि सावळी या गावांसह शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. मात्र, क्रीडा संयोजकांच्या ढिसाळ नियोजनामुळे या स्पर्धेचा खेळखंडोबा झाला. आयोजकांनी ऐनवेळी कागदपत्रांची तपासणी सुरू केल्याने, अनेक खेळाडूंना अपात्र ठरवण्यात आले, ज्यामुळे स्पर्धा उशिरा सुरू झाली. स्पर्धा भर उन्हात सुरू झाल्याने खेळाडूंचे प्रचंड हाल झाले. या संपूर्ण आयोजनात नियोजनाचा अभाव दिसून आल्याने, शेकडो विद्यार्थी आणि शिक्षकांना मनस्ताप सहन करावा लागला.

### तळपत्या उन्हात, गरम मॅटवर खेळ

क्रीडा स्पर्धांना उशिरा सुरुवात झाल्याने, खेळाडूंना भर उन्हात खेळावे लागले. सूर्यप्रकाशाने कबड्डीची मॅट प्रचंड तापली होती, तरीही चिमुकले खेळाडू त्यावर दिवसभर खेळत होते. आयोजकांनी साध्या मंडपाची किंवा पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था केली नव्हती. काही प्रेक्षक विद्यार्थ्यांनी तर मॅट डोक्यावर धरून उन्हापासून बचाव करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला.

### ग्रामीण खेळाडू संधीपासून वंचित

'ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना संधी मिळावी, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. मात्र, ऐनवेळी कागदपत्रांची तपासणी सुरू झाल्याने आणि नियम सांगितल्याने, अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांना अपात्र ठरवण्यात आले. कागदपत्रांची पूर्तता करू न शकल्याने, अनेक खेळाडूंना स्पर्धेपूर्वीच बाहेर पडावे लागले. यामुळे त्यांच्यात आणि शिक्षकांमध्ये मोठी नाराजी पसरली होती.

## पांढरकवड्याच्या रीनझेन शामकुंवरची राष्ट्रीय स्तरावर निवड

### साकारली शास्त्रज्ञाची भूमिका

पांढरकवडा. दि. ५ प्रतिनिधी



येथील गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलची आठव्या वर्गातील अतिशय हुशार विद्यार्थिनी असलेल्या रीनझेन अजय शामकुंवर हिने वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेची (सीएसआयआर) खडतर परीक्षा उत्तीर्ण करून राष्ट्रीय स्तरावर यश मिळवले आहे. तिची 'एक दिवसीय वैज्ञानिक' या राष्ट्रीय उपक्रमासाठी निवड झाली.

तिने नागपूर येथील राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेत (निरी) एक दिवस शास्त्रज्ञाची भूमिका साकारली. यावेळी तिला 'निरी'चे शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश कुंभारे यांनी जल, हवा, जमीन प्रदूषण आणि उपायांवर मार्गदर्शन केले. तसेच, डॉ. ए. के. भेलावे यांनी विमान कसे उडते याचे विज्ञान समजावले. तिने यशाचे श्रेय प्रिन्सिपल स्वप्नील कुलकर्णी, वर्गशिक्षक प्रवीण प्रधान व आपल्या आई-वडिलांना दिले असून तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## महिलांच्या सुरक्षेसाठी 'विशाखा समिती' कार्यान्वित

### कार्यस्थळी महिलांची सुरक्षितता आणि तक्रार निवारणासाठी विशेष यंत्रणा

पांढरकवडा. दि. ५ प्रतिनिधी



महिलांच्या कार्यस्थळी सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी पांढरकवडा येथील प्रादेशिक वनविभागात 'विशाखा समिती'ची स्थापना करण्यात आली आहे. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात असून, उपवनसंरक्षक यशवंत बहाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत या समितीची घोषणा करण्यात आली.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात बहाळे यांनी, 'महिला सुरक्षितता ही केवळ जबाबदारी नसून सन्मानाची शपथ आहे,' असे प्रतिपादन केले. या नवनियुक्त समितीमध्ये सहायक वनसंरक्षक संगीता कोकणे यांची अध्यक्षपदी, तर वनपरिक्षेत्र अधिकारी सुजाता विरकर यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. लेखापाल दुर्गा कवाडे सचिव म्हणून काम पाहतील, तर नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेच्या डॉ. प्रिती तोटावार यांची अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या समितीमध्ये सदस्य म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी सुनिता पाटील, वनपाल सपना वानखेडे, मनिषा दांडगे, लेखापाल वर्षा शिवपुरे, वनरक्षक रेणुका सोनी, वृषाली कोडापे, प्रेमिला सिडाम, नाईक सुरेखा पारधी, वनपाल सुरेखा कुंभेकर आणि कार्यालय अधीक्षक शरद बाविस्कर यांचा समावेश आहे. यावेळी उपस्थित सहायक वनसंरक्षक विशाल चव्हाण, विक्रांत खाडे, वनपरिक्षेत्र अधिकारी चेतन नेहारे, भारत वाघाडे, जी. आर. राठोड आणि शरद बाविस्कर यांनी नवनियुक्त समितीला शुभेच्छा दिल्या. ही समिती महिला सक्षमीकरणासाठी प्रभावी ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

## दिघी गावात सैन्यदलातील सेवेचा गौरव

### विविध दलांतील अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित




बाभुळगाव, दि. ५ प्रतिनिधी

भारतीय सैन्य दलात तब्बल ३७ वर्षांची प्रदीर्घ सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले दिघी येथील सुपुत्र अरुण आत्राम यांचा ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. त्यांच्या देशसेवेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित या सोहळ्याला विविध दलांतील अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

बाभुळगाव तालुक्यातील दिघी येथील समाज मंदिरात ३ ऑगस्ट रोजी हा गौरव सोहळा पार पडला. दिघी ग्रामस्थांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात, ३७ वर्षांच्या सेवेबद्दल अरुण आत्राम यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला आणि त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पॅरामिलिटरी फोर्सचे अध्यक्ष जगत चव्हाण, कृष्णा बनारसे (एसआय, सीआरपीएफ), ओंकार कुंभारे (बीएसएफ), जीवन कोवे (बीएसएफ) यांच्यासह सीआरपीएफ, बीएसएफ, आयटीबीपी आणि महाराष्ट्र पोलिसांतील अनेक जवान व अधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. गावातील युवक, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते. आपल्या गावातील सुपुत्राने देशासाठी दिलेल्या योगदानाचा ग्रामस्थांनी केलेला हा सन्मान अत्यंत प्रेरणादायी ठरला. या कार्यक्रमामुळे गावात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते.

## दिग्रसच्या सविता देशमुख महाविद्यालयातील प्रा. डॉ. तुकाराम कांबळे यांना भावपूर्ण निरोप



दिग्रस, दि. ५ प्रतिनिधी

दिग्रस येथील सविता देशमुख महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. तुकाराम कांबळे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. महाविद्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात त्यांना अत्यंत भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. त्यांच्या कार्याचे यावेळी सर्वांनी स्मरण केले.

प्राचार्य डॉ. दिपक कोटूरवार यांच्या अध्यक्षतेखाली हा निरोप समारंभ पार पडला. यावेळी प्रा. डॉ. दामोदर दुधे, प्रा. डॉ. विजय गावंडे आणि प्रा. डॉ. दीपक उलेमाले यांनी डॉ. कांबळे यांच्यासोबतच्या सोळा वर्षांच्या सौहार्दपूर्ण आठवणींना उजाळा दिला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. कोटूरवार यांनी, महाविद्यालयाला १०० टक्के अनुदान मिळवून देण्यासाठी डॉ. कांबळे यांनी केलेल्या अथक परिश्रमांची आठवण करून दिली. डॉ. कांबळे हे आता अकोला येथील पंचफुलाबाई काळे महाविद्यालयात प्राचार्य म्हणून रुजू होणार असल्याने, सर्वांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला डॉ. कांबळे यांच्या पत्नी प्रणिता आणि मुले सारीत व शाश्वत हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गोल्डी जांभुळकर यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. विजय गावंडे यांनी केले. यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**मार्गदर्शन शिबिर** | अधिकार जाणा, कर्तव्य पाळा - ॲड. देविदास काळे

# मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे कार्य कौतुकास्पद

वणी, दि. ५ प्रतिनिधी

**मानवी हक्क सुरक्षा परिषद सामान्य माणसाच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून देण्याचे महत्वपूर्ण सामाजिक कार्य करत आहे, असे प्रतिपादन रंगनाथ स्वामी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. देविदास काळे यांनी केले. मानवी हक्क सुरक्षा परिषदेतर्फे आयोजित मार्गदर्शन शिबिरात अध्यक्षीय भाषणातून ते बोलत होते.**



शनिवारी (दि. २) मानवी हक्क सुरक्षा परिषदेच्यावतीने या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून वर्धमान फाउंडेशनचे अध्यक्ष विजयबाबू चोरडीया, तर विशेष अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष पी. के. टोंगे, सामाजिक कार्यकर्ते विजय नगराळे आणि महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजू धावंजेवार उपस्थित होते. ॲड. काळे पुढे म्हणाले की, परिषदेचे कार्य असेच तेवत राहो. विजय चोरडीया यांनी, परिषदेने गेल्या १० वर्षांत अनेक प्रश्न मार्गी लावल्याचे सांगत, प्रत्येकाने अधिकारांसोबतच कर्तव्येही पार पाडावीत, असे आवाहन केले. या कार्यक्रमात शासकीय सेवेत नुकत्याच रुजू झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. तसेच, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजू धावंजेवार यांनी, संचालन सागर मुने यांनी, तर आभार प्रदर्शन सुरेश बन्सोड यांनी केले. या कार्यक्रमाला संघटनेचे अनेक पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मार्गदर्शन शिबिरात, शासकीय सेवेत नुकतेच रुजू झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे, या विद्यार्थ्यांसोबतच त्यांच्या आई-वडिलांनाही सन्मानित करून, त्यांच्या योगदानाची दखल घेण्यात आली. यासोबतच, मानवी हक्क सुरक्षा परिषदेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्याहस्ते नियुक्तीपत्र देऊन, त्यांच्यावर नवीन जबाबदारी सोपवण्यात आली. यातून संघटनेने युवाशक्तीला प्रोत्साहन देण्याचा संदेश दिला.

### मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन

या कार्यक्रमाला मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश संपर्कप्रमुख परशुराम पोटे, यवतमाळ जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत हनुमंते, जिल्हा महिला संपर्कप्रमुख मनिषा निब्रड, जिल्हा महिला उपाध्यक्षा सुमित्रा गोडे, वणी तालुका महिला अध्यक्ष सुनिता काळे, वणी शहर अध्यक्ष प्रेमिला चौधरी, वणी शहर अध्यक्ष अजय चन्ने, प्रदेश कार्यकारिणी सदस्य संजय चिंचोलकर, मारेगाव तालुका अध्यक्ष अमोल कुमरे, चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष विक्की बांगर आणि विदर्भ संपर्क प्रमुख मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती.

# प्रेमप्रकरणातून दगडाने ठेचून खून

## तलवार, कोयत्याने सपासप वार, वाघाडी येथील घटनेने तालुका हादरला

यवतमाळ, दि. ५ प्रतिनिधी

**प्रेमसंबंध आणि जुन्या वादातून वाघाडी (जांब) येथे एका ३२ वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून आणि धारदार शस्त्रांनी वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. मया उर्फ महेश नरेश कोल्हेकर असे मृताचे नाव आहे. या धक्कादायक घटनेनंतर, यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दोन्ही आरोपींना अटक केली आहे.**



यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वाघाडी (जांब) गावात सोमवारी (दि. ४) रात्री ही थरारक घटना घडली. पोलिस निरीक्षक सुनील नाईक आपल्या पथकासह घटनास्थळी पोहोचले असता, महेश कोल्हेकर हा देवीच्या ओट्याजवळ रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. त्याचा चेहरा दगडाने ठेचून छिन्नविच्छिन्न करण्यात आला होता. पोलिसांनी केलेल्या तपासात, रोशन उत्तम राऊत (वय २५) आणि उमेश सुखदेव शिरभाते (वय १९) या दोघांनी हा खून केल्याचे निष्पन्न झाले. घटनेनंतर फरार झालेल्या दोन्ही आरोपींना पोलिसांनी मोहा परिसरातून ताब्यात घेतले. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून, त्यांच्याविरुद्ध यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बेसाने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये पोनि. सुनील नाईक यांच्यासह सपोनि. प्रवीण मानकर, सपोनि. विजयमाला रिठे आणि पोउपनि. गजानन शेजूळकर यांनी महत्वाची भूमिका बजावली.

### असा रचला हत्येचा कट

मृत महेश कोल्हेकर याचे गावातील एका महिलेसोबत प्रेमसंबंध होते आणि तो तिच्याच घरी राहत होता. तो गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून, गावात त्याची दहशत होती. घटनेच्या दिवशी, दारूच्या नशेत त्याने आरोपी उमेशच्या आजीला मारहाण केली होती आणि आरोपी रोशनसोबतही भांडण केले होते. याच जुन्या वादाचा राग मनात धरून, दोन्ही आरोपींनी तलवार आणि कोयत्याने त्याच्यावर हल्ला करून त्याला ठार मारले.

### पोलिसांची तत्पर कारवाई

घटनेची माहिती मिळताच, पोलिस निरीक्षक सुनील नाईक यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन, आरोपींच्या शोधासाठी तात्काळ पथके तयार केली. पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेऊन, २४ तासांच्या आत दोन्ही आरोपींना मोहा (यवतमाळ) परिसरातून ताब्यात घेतले. अटक केलेल्या आरोपींनी आपला गुन्हा कबूल केला असून, त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

# महामार्ग कामाच्या कॅम्पमधून करोडोंच्या साहित्याची चोरी

## आयपीएस अधिका-यांकडे तपासाची सूत्रे

उमरखेड. दि. ५ प्रतिनिधी

बोरी-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी उभारलेल्या सद्भाव कंपनीच्या कॅम्पमधून झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या लूटमार प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन, जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या तपासाची सूत्रे आता आयपीएस अधिकारी हर्षवर्धन बीजे यांच्याकडे सोपवली आहेत. या प्रकरणात आतापर्यंत चोरीला गेलेला १ कोटी ६६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सद्भाव कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर यांनी २ ऑगस्ट रोजी दिलेल्या तक्रारीनुसार, कंपनीच्या कॅम्पमधून १ कोटी ६० लाख रुपये किमतीची वाहने आणि साहित्य चोरीला गेले होते. या तक्रारीवरून पोलिसांनी सुरुवातीला चौघांवर गुन्हा दाखल करून तपासात १०० टक्के मुद्देमाल जप्त केला. यामध्ये चार हायवा ट्रक, दोन मिक्सर ट्रक आणि एका पाण्याच्या टँकरचा समावेश होता. मात्र, ४ ऑगस्ट रोजी कंपनीचे व्यवस्थापक राजेंद्र मिना यांनी पुन्हा ७१ लाख रुपयांचे साहित्य चोरीला गेल्याची तक्रार दिली, ज्यापैकी पोलिसांनी ६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या मोठ्या लूटपाटीत एका वरिष्ठ अधिकाऱ्यासह काही बडे राजकीय नेते सामील असल्याची चर्चा संपूर्ण तालुक्यात सुरू झाल्याने, हे प्रकरण अधिकच गुंतागुंतीचे बनले आहे. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून, पोलीस अधीक्षकांनी हा तपास आयपीएस अधिकारी हर्षवर्धन बीजे यांच्याकडे सुपूर्द केला. बीजे यांनी आज उमरखेडला भेट देऊन जप्त केलेले साहित्य आणि घटनास्थळाची पाहणी केली. आता त्यांच्या तपासात या प्रकरणामागे नेमके कोण आहेत, हे उघड होण्याची शक्यता आहे.

## महत्वाचे

### भरधाव व्हेन्यू कारची स्विफ्टला धडक

**यवतमाळ :** येथील टी.बी. रुग्णालयासमोर सोमवारी (दि. ४) मध्यरात्री भरधाव वेगात असलेल्या एका चारचाकी वाहनाने दुसऱ्या कारला धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक जण जखमी झाला. याप्रकरणी शहर पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. क्षितीज शामराव मडकराम (वय २५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते त्यांच्या स्विफ्ट डिझायर (क्र. एमएच-३१ डीके-७५५७) कारने जात होते. यावेळी काळ्या रंगाच्या व्हेन्यू कारच्या (क्र. एमएच-२९ बीव्ही-११११२) अज्ञात चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांच्या गाडीला धडक दिली. यात कारमधील निखिल राठोड हे जखमी झाले, तर क्षितीज यांच्या गाडीचे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चालकाचा शोध सुरू केला आहे.

### प्लायवूड गोडाऊन फोडले

**यवतमाळ :** शहरातील लकडगंज येथील टिंबर मार्केटमधील एका प्लायवूडच्या गोडाऊनमध्ये अज्ञात चोरट्याने प्रवेश करून कार्यालयातून ६० हजार रुपयांची रोकड लंपास केली. ही घटना २ ऑगस्टच्या रात्री ते ३ ऑगस्टच्या सकाळच्या दरम्यान घडली. याप्रकरणी शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सोमेश सुरेश नथवाणी (वय ५१) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, चोरट्याने त्यांच्या अनंत प्लायवूड गोडाऊनच्या समोरील गेटच्या खुल्या जागेतून आतमध्ये प्रवेश केला.

# प्रकाश भूमकाळे यांची शालेय कर्मचारी पतसंस्थेच्या तज्ज्ञ संचालकपदी अविरोध निवड

## मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षावर पतसंस्थेने दाखविला विश्वास

यवतमाळ, दि. ५ प्रतिनिधी



यवतमाळ जिल्हा शालेय कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या तज्ज्ञ संचालकपदी जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश भूमकाळे यांची अविरोध निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या मासिक सभेत सर्व संचालक मंडळाने एकमताने हा निर्णय घेतला. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

रविवार, ३ ऑगस्ट रोजी झालेल्या पतसंस्थेच्या मासिक सभेत हा निर्णय घेण्यात आला. पतसंस्थेचे माजी सचिव अशोक पोले आणि उपाध्यक्ष प्रमोद देशमुख यांनी प्रकाश भूमकाळे यांचे नाव तज्ज्ञ संचालक पदासाठी सुचवले होते, ज्याला सर्व संचालकांनी अनुमोदन दिले. या निवडीसाठी सुकाणू समितीचे प्रमुख विजय विसपुते, मुकुंद पांडे यांच्यासह अनेकांनी विशेष प्रयत्न केले. निवडीनंतर भूमकाळे यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याच सभेत, अशोक पोले हे मुख्याध्यापक झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. तर, सेवानिवृत्त झालेले माजी अध्यक्ष नीरज डफळे आणि तज्ज्ञ संचालक पदाचा राजीनामा दिलेले हरीश डभारे यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी अध्यक्ष भारत गरघाटे, सचिव श्रीकांत बोरकर, अशोक पोले, गुलाब चव्हाण, सुजित ठाकरे यांच्यासह सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

# आर्णीतील उपोषणाची 20 दिवसांनी यशस्वी सांगता!

## पालकमंत्र्यांच्या कानउघडणीनंतर मुख्याधिकारी नरमले; कारवाईचे लेखी आश्वासन

आर्णी. दि. ५ प्रतिनिधी



गेल्या वीस दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणानंतर, आर्णीतील चिंतावार ले-आउटमधील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यास प्रशासनाने अखेर लेखी मंजुरी दिली आहे. पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्तक्षेपानंतर मुख्याधिकाऱ्यांनी सात दिवसांत कारवाईचे लेखी आश्वासन दिल्याने, नागरिकांनी सोमवारी (दि. ४) सायंकाळी उपोषण मागे घेतले.

चिंतावार ले-आउटमधील मुख्य रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. हा रस्ता मोकळा करावा, या मागणीसाठी १५ जुलैपासून परिसरातील नागरिक उपोषणाला बसले होते. मात्र, नगर परिषद प्रशासन याकडे दुर्लक्ष करत होते. अखेर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजूदास जाधव यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनाला पाठिंबा दिला आणि पालकमंत्री संजय राठोड यांच्याशी शिष्टमंडळाची भेट घालून दिली. पालकमंत्र्यांनी फोनवरून मुख्याधिकारी रवींद्र राऊत यांची कानउघडणी करत, तात्काळ कारवाईचे निर्देश दिले. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या मुख्याधिकाऱ्यांनी उपोषण मंडपात येऊन सात दिवसांत मागण्या पूर्ण करण्याचे लेखी पत्र दिले आणि दिरंगाईबद्दल दिलगिरीही व्यक्त केली. पालकमंत्र्यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेले राजूदास जाधव आणि मुख्याधिकारी राऊत यांच्या हस्ते लिंबूपाणी देऊन प्रकाश बोरा, कुणाल मनवर आणि राजू राऊत यांनी उपोषण सोडले. मात्र, सात दिवसांत अतिक्रमण न हटल्यास थेट मुख्याधिकाऱ्यांच्या चेंबरमध्ये उपोषण सुरू करू, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या यशस्वी आंदोलनामुळे एकजुटीने कोणताही लढा जिंकता येतो, असा संदेश शहरात गेला आहे.

# दोन महिन्यांपासून फरार आरोपीला तामिळनाडूतून अटक

## महिलेवर बलात्कार करून जीवे मारण्याचा केला होता प्रयत्न

दिग्रस. दि. ५ प्रतिनिधी



एका महिलेवर बलात्कार करून, तिला विष पाजून आणि दगडाने ठेचून जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला, दोन महिन्यांनंतर तामिळनाडूतून अटक करण्यात दिग्रस पोलिसांना यश आले आहे. वैभव अमृत दुथडे (रा. चिरकुटा, ता. दिग्रस) असे आरोपीचे नाव असून, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

याप्रकरणी पीडित महिलेने ७ जून २०२५ रोजी दिग्रस पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, आरोपी वैभव दुथडे याने १ जून रोजी फिर्यादीला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर, त्याने तिच्या इच्छेविरुद्ध लैंगिक अत्याचार केले आणि तिला जीवे मारण्याच्या उद्देशाने पिण्याच्या पाण्यात विषारी औषध मिसळून ते पाजले. एवढ्यावरच न थांबता, त्याने तिच्या डोक्यात दगडाने मारून तिला गंभीर जखमी केले होते. या गंभीर गुन्ह्यानंतर आरोपी फरार झाला होता. पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन आणि पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिग्रस पोलिसांनी तपास सुरू केला. तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी तामिळनाडू राज्यातील कृष्णगिरी जिल्ह्यात लपल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार, पोलीस उपनिरीक्षक दिलीप गिरी यांच्या पथकाने तामिळनाडूत जाऊन आरोपीला रायाकोट्टई गावातून अटक केली. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता, दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून, पुढील तपास दिग्रस पोलीस करत आहेत.

# मंदरमध्ये अवैध रेती वाहतूक

**वणी. दि. ५ :** येथील मंदर परिसरात रात्रीच्या वेळी अवैध रेती वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टरवर वणी पोलिसांनी कारवाई करून तो जप्त केला आहे. याप्रकरणी चालक दिनेश नानाजी गुहे (वय ३१) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार सचिन मरकाम यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, त्यांनी व पोलिस कॉन्स्टेबल श्रीनिवास गोंलावार यांनी मंगळवारी मध्यरात्री ही कारवाई केली. चक २९ उइ ७७४२ क्रमांकाच्या ट्रॅक्टरमधून एक ब्रास रेती (किंमत ७ हजार) विनापरवाना वाहतूक केली जात होती. पोलिसांनी ४.५० लाखांचा ट्रॅक्टर व रेती असा एकूण ४ लाख ५७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईत, दिनेश गुहेविरुद्ध भारतीय न्याय संहिता व जमीन महसूल कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# पोफाळीतील विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पतीला अटक

## अनैतिक संबंधांतून छळ केल्याचा आरोप

उमरखेड. दि. ५ प्रतिनिधी



तीन महिन्यांपूर्वी पोफाळी येथे झालेल्या विवाहितेच्या आत्महत्याप्रकरणी, पतीच्या त्रासाला कंटाळूनच तिने जीवन संपवल्याचा आरोप सिद्ध झाल्याने, पोफाळी पोलिसांनी अखेर तिच्या पतीला अटक केली आहे. पतीचे दुसऱ्या स्त्रीसोबत प्रेमसंबंध असल्याने तो बहिणीचा छळ करत होता, अशी तक्रार मृत विवाहितेच्या भावाने दिली होती.

पोफाळी येथील कल्पना अनिल टारफे या विवाहितेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. याप्रकरणी, तिचा भाऊ अनिल सुधाकर बेले (२७, रा. जवळा, ता. आर्णी) यांनी पोफाळी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, कल्पनाचा पती अनिल सखाराम टारफे याचे दुसऱ्या स्त्रीसोबत प्रेमसंबंध होते. याच कारणावरून तो कल्पनाला सतत मानसिक आणि शारीरिक त्रास देत होता, असे कल्पनाने अनेकदा आपल्या आईला फोनवरून सांगितले होते. पतीच्या याच त्रासाला कंटाळून आपल्या बहिणीने आत्महत्या केली असून, तिच्या मृत्यूस सर्वस्वी तिचा पतीच जबाबदार आहे, असे तक्रारीत म्हटले होते. या तक्रारीच्या आधारे, पोफाळी पोलिसांनी गुन्हा नोंदवून सखोल तपास सुरू केला होता. तपासात पती दोषी असल्याचे निष्पन्न झाल्याने, मंगळवारी (दि. ५) पोलिसांनी आरोपी पती अनिल सखाराम टारफे याला अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोफाळी पोलीस करत आहेत.

## राज्यमंत्री इंद्रनील नाईक आक्रमक, नाईक बंगल्यावर शिष्टमंडळाची धाव

# महागावातील दारू दुकान प्रकरण पोहोचले मंत्रालयात

महागाव, दि. ५ प्रतिनिधी



महागाव नगरपंचायतीने हरित क्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या तैलचित्राजवळ देशी दारू दुकानाला दिलेला 'ना हरकत दाखला' (एनओसी) रद्द करण्यासाठी, एका शिष्टमंडळाने राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी तात्काळ राज्य उत्पादन शुल्क आयुक्तांना दूरध्वनी करून हे प्रकरण रद्द करण्याचे आदेश दिले.

महागाव नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मध्ये, प्रभारी मुख्याधिकारी महेश जामनोद यांनी देशी दारू दुकानाला 'एनओसी' दिल्याने वाद पेटला होता. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि बंजारा समाजाच्या तीव्र विरोधामुळे प्रशासनाला अखेर हा दाखला रद्द करावा लागला होता. मात्र, हा प्रकार पुन्हा होऊ नये, यासाठी शनिवारी (दि. २) पुसद येथील 'नाईक' बंगल्यावर शिष्टमंडळाने राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. या शिष्टमंडळाचे नेतृत्व डॉ. पंजाबराव राठोड यांनी केले. यावेळी ज्येष्ठ नेते संभाजीराव नरवाडे, उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे, गटनेते शैलेश कोपरकर, माजी सभापती कॉ. डी.बी. नाईक, दीपक आडे, माजी जि.प. सदस्य दौलतराव नाईक, संचालक प्रा. शिवाजीराव राठोड, आत्माराम राठोड, हिरासिंग चव्हाण आणि बाबुलाल राठोड यांच्यासह अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या तैलचित्राजवळच देशी दारूचे दुकान देण्याचा प्रकार घडल्याने, बंजारा समाजाच्या भावना दुखावल्या होत्या. नगरपंचायतीच्या आंदोलनातही बंजारा समाजाने सिंहाचा वाटा उचलला होता. आता राज्यमंत्र्यांनी थेट हस्तक्षेप केल्याने, समाज बांधवांमधून समाधान व्यक्त होत आहे. नाईक साहेबांच्या प्रतिमेला धक्का लावण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा इशारा समाजाने दिला आहे.

### इंद्रनील नाईक यांची तात्काळ कारवाई

शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी तात्काळ राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांना दूरध्वनी केला. त्यांनी शुभम जयस्वाल यांना देशी दारू दुकानाचा परवाना देण्याचे प्रकरण नाकारण्याचे स्पष्ट आदेश दिले. तसेच, यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना आणि उत्पादन शुल्क अधीक्षकांनाही संपर्क साधून, या प्रकरणात लक्ष घालण्याचे निर्देश दिले. हा प्रकार निंदनीय असून, तो थांबलाच पाहिजे, अशी भूमिका त्यांनी घेतली.

# अनिल यादव यांची रेमंड कामगार संपात यशस्वी मध्यस्थी



यवतमाळ, दि. ५ प्रतिनिधी

यवतमाळ येथील रेमंड युको डेनिम कंपनीतील कामगारांचा संप यशस्वीपणे मिटवण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल, श्री अनिल यादव यांचे सर्व कामगारांनी जाहीर आभार मानले. त्यांच्या मध्यस्थीमुळे कंपनी पुन्हा सुरू झाल्याने कामगारांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

रेमंड कंपनीतील कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी संप पुकारला होता, ज्यामुळे कंपनीचे कामकाज ठप्प झाले होते. या संपावर तोडगा काढण्यासाठी अनिल यादव यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी कामगार आणि व्यवस्थापन यांच्यात यशस्वीपणे समन्वय साधून संप मिटवण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांमुळेच कंपनी पुन्हा सुरू होऊ शकली, ज्यामुळे हजारो कामगारांना मोठा दिलासा मिळाला. आपल्या या यशस्वी मध्यस्थीबद्दल, संगीत डोंगर, गणेश खेदरकर, आशिष धोगळे, प्रशांत रोकडे, सरवन जाट, ओमप्रकाश, लालमनी यादव, रोशन खडसे, भोला अवचारे, संतोष ठाकूर, सातपुते आणि शरद राऊत यांच्यासह अनेक कामगारांनी अनिल यादव यांचे जाहीर आभार मानले.